रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग | आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | वर्ष ८८ | अंक १३७ | पृष्ठे ८ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) www.krushival.in

## शाळकरी मुलं कालव्यात बुडाली?

**नागपूर :** रामटेक तालुक्यात बोरी गावाजवळ चार शाळकरी मुलं कालव्यात बुडाल्याची भीती व्यक्त केली जात आहे. बोरी गावाजवळ इंदिरा शाळा व कनिष्ठ महाविद्यालयातील आठ विद्यार्थी सोमवारी (दि.१४) दुपारी शाळेजवळच्या कालव्यावर पोहायला गेले होते. यावेळी ही घटना घडल्याची माहिती आहे. अधिकची माहिती अशी की, बोरी गावाजवळ इंदिरा शाळा व कनिष्ठ महाविद्यालयातील आठ विद्यार्थी शाळेजवळच्या कालव्यावर पोहायला गेले होते. आठपैकी चार मुलं पाण्यात उतरली. मात्र, तेव्हा कालव्यामध्ये पाण्याचा प्रवाह तीव्र असल्यामुळे ते स्वतःला सावरू शकले नाहीत.


# कृषीवल

रायगड, मंगळवार, दि. १५ ऑक्टोबर २०२४

किंमत ४ ₹


## उद्धव ठाकरेंची प्रकृती बिघडली

**मुंबई :** शिवसेना (ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांची तब्येत बिघडली असून, त्यांना विविध तपासण्या करण्यासाठी मुंबईतील रिलायन्स रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. उद्धव ठाकरे यांच्यावर काही वर्षांपूर्वी अँजिओप्लास्टी करण्यात आली होती. ते आता पुन्हा एकदा रुग्णालयात दाखल झाल्यामुळे शिवसैनिक चिंतेत आहेत. धमन्यांमधील ब्लॉकेज तपासण्यासाठी त्यांच्या चाचण्या केल्या जात असल्याचं सांगितलं जात आहे. उद्धव ठाकरे यांना बरं वाटत नसल्यामुळे रुग्णालयात नेण्यात आलं होतं. याआधी त्यांची अँजिओप्लास्टीदेखील झाली आहे.

# सुरक्षेसाठी महिलांनो एकजूट व्हा!

■ चित्रलेखा पाटील यांचे आवाहन
■ किहीम येथे 'लेक शिवबा'ची भव्य संवाद मेळावा
■ हजारो महिलांच्या उपस्थितीने कार्यक्रमाला रंगत




| अलिबाग | प्रतिनिधी |

अलीकडच्या काळात लाडकी बहीण योजना सुरु केली, महिलांच्या खात्यात पैसे दिले. परंतु, दुसरीकडे लसणासह अन्य पदार्थांच्या किमती भरमसाठ वाढविल्या आहेत. शिंदे सरकार लूटमार करणारे व फसवणारे सरकार आहे. निवडणूक जवळ आल्यावर त्यांना लाडक्या बहिणींची आठवण झाली. बदलापूर, उरणसारख्या घटना होत असताना महिला सुरक्षेचा प्रश्न निर्माण होत आहे. महिला सुरक्षेच्या दृष्टीने ठोस पावले उचलली जात नाहीत. त्यामुळे महिलांनी महागाईविरोधात आणि सुरक्षेसाठी एकजूट होण्याची गरज आहे, असे आवाहन शेकाप जिल्हा महिला आघाडी प्रमुख चित्रलेखा पाटील यांनी केले.

> मांडव्यामधून खूप पर्यटक येतात. स्थानिकांना रोजगार मिळावा, ही अपेक्षा आहे. या विभागासाठी स्थानिक माणूस मोठा होईल याकडे लक्ष दिले जाईल. पाण्याचा प्रश्न अनेक गावांत गंभीर आहे. एक संधी दिल्यास येथील पाण्याचा प्रश्न कायमस्वरुपी मार्गी लावण्याचा प्रयत्न केला जाईल.
> – चित्रलेखा पाटील

रायगड जिल्हा महिला बचत गट फेडरेशन पुरस्कृत लेक शिवबाची अंतर्गत भव्य संवाद महिला मेळावा सोमवारी (दि.१४) किहीम येथील प्रांगणात आयोजित करण्यात आला. यावेळी पाटील बोलत होत्या.

यावेळी रायगड जिल्हा परिषद माजी अध्यक्षा तथा अलिबाग अर्बन बँकेच्या अध्यक्षा सुप्रिया पाटील, रायगड जिल्हा महिला बचतगट फेडरेशनच्या उपाध्यक्षा तथा अलिबाग नगरपरिषदेच्या माजी नगरसेविका वृषाली ठोसर, शेकाप राज्य विद्यार्थी संघटना अध्यक्षा साम्या कोरडे, शेकाप तालुका महिला आघाडी उपाध्यक्षा रोशनी मोकल, •> पान २ वर

## विधानसभा निवडणुकीची तयारी अंतिम टप्प्यात

# प्रतीक्षा आचारसंहितेची

**सुयोग आंग्रे**
| रायगड |


विधानसभा निवडणुकीच्या दृष्टीने जिल्हा प्रशासनाची तयारी अंतिम टप्प्यात असून, वरिष्ठ अधिकाऱ्यांचे प्रशिक्षणदेखील पार पडले आहे. निवडणुकीसाठी लागणाऱ्या १७ हजार ४९७ कर्मचाऱ्यांची यादीही रायगड जिल्हा प्रशासनाने संकलित केली आहे.

मतदारसंघांची पुनर्रचना होण्यापूर्वी आता होणारी विधानसभेची निवडणूक शेवटची असू शकते, असे वरिष्ठ अधिकारी सांगत आहेत. २०२९ मध्ये मतदारसंघांची पुनर्रचना होईल, असा अंदाज यापूर्वीच वर्तविण्यात आला आहे. त्यामुळे अनेक राजकीय नेत्यांसाठी व पक्षांसाठी ही निवडणूक खूप महत्त्वाची असणार आहे. अनेकांनी या निवडणुकीत विजयी व्हायचेच यादृष्टीने तयारी केली आहे.

दरम्यान, प्रशासकीय तयारीदेखील अंतिम टप्प्यात असून, आता आचारसंहितेची शक्यता वर्तविली जात आहे.

विधानसभा निवडणुकीसाठी यंदा जिल्हाभरात २ हजार ७९० मतदान केंद्रे असणार आहेत. त्यामुळे प्रत्येक केंद्रांवर किमान पाच कर्मचारी लागणार आहेत. २० कर्मचारी प्रत्यक्षरित्या मतदानादिवशी कार्यरत असतील, पण त्यांना पर्याय म्हणून दोन ते अडीच हजार कर्मचारी अतिरिक्त असणार आहेत. पण, अनेकजण आतापासूनच इलेक्शन ड्यूटी रद्दसाठी फिल्डिंग लावून आहेत. निवडणुकीच्या कटकटीत पडायलाच नको म्हणून अनेकांनी ड्यूटी रद्दसाठी कारणेदेखील शोधून ठेवली आहेत. अनेकांनी अर्ज लिहून तयार केला असून, इलेक्शन ड्युटीचे पत्र हाती पडले की, तो अर्ज प्रशासनाला दिला जाईल. मात्र, खूपच गंभीर कारण असल्याशिवाय कोणाचीही इलेक्शन ड्यूटी रद्द होणार नाही, असे जिल्हा प्रशासनाकडून सांगण्यात आले आहे.

३० ऑगस्ट २०२४ रोजी प्रसिद्ध झालेल्या मतदार यादीनुसार रायगड जिल्ह्यात असणाऱ्या सात विधानसभा मतदारसंघात २०२४ च्या विधानसभा निवडणुकीसाठी तब्बल २४ लाख ४६ हजार १५३ मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहेत. यामध्ये १२ लाख ४० हजार ५६२ पुरुष मतदार, तर १२ लाख ५ हजार ५०० महिला मतदार आणि ९१ मतदार तृतीयपंथी असणार आहेत. पनवेल विधानसभा मतदारसंघात ६ लाख ३४ हजार १९७ मतदार, कर्जतमध्ये ३ लाख १३ हजार ८८४, उरणमध्ये ३ लाख ३४ हजार ४३१, पेणमध्ये ३ लाख ५ हजार ५१८, •> पान २ वर




**अलिबाग-रोहा-मुरुड मतदारसंघ**

| | |
|---|---|
| एकूण मतदार | 3,02,268 |
| पुरुष मतदार | 1,48,995 |
| महिला मतदार | 1,53,272 |

# दहा दिवसांत शेकडो शासन निर्णय जारी

## राज्य सरकारकडून मतदारांना आमिष

| मुंबई | प्रतिनिधी |

विधानसभा निवडणूक जाहीर होण्यापूर्वी प्रलंबित राहिलेले सर्व निर्णय जाहीर करण्याच्या मागे राज्य सरकार लागले आहे. मात्र, हे करीत असताना निधी उपलब्ध आहे का, याबाबत कोणताही विचार करण्यात आलेला दिसून येत नाही. आचारसंहिता लागेपर्यंत शासन निर्णयाचा राज्य सरकारकडून धडाका लावण्यात आला असून, गेल्या दहा दिवसांत बाराशेपेक्षा अधिक शासन निर्णय जारी करण्यात आले आहेत.

राज्य सरकारच्या या शासन निर्णयातून सर्वच समाजघटकांना निवडणुकीपूर्वी खुश करण्याचा राज्य सरकारचा प्रयत्न आहे. विविध समाज घटकांच्या नोकरदारांच्या मागण्यांचा विचार करत शासन निर्णयाचा सपाटा लावण्यात आला आहे. आचारसंहिता लागण्यापूर्वी राज्य सरकारकडून १ ऑक्टोबरला १४८ शासन निर्णय जारी करण्यात आले. तसेच २ ऑक्टोबरला शासकीय सुट्टी, •> पान २ वर

### मुंबईत टोलमाफी

मुंबईतील प्रवेश करणाऱ्या पाचही टोलनाक्यांवर हलक्या मोटर वाहनांना संपूर्ण टोलमाफी करण्यात आली आहे. सोमवारी रात्री बारा वाजल्यापासून अंमलबजावणी करण्यात येणार आहे. आनंदनगर टोलनाका, दहिसर, मुलुंड-एलबीएस, वाशी, ऐरोली या ठिकाणी वाहनांना टोल भरण्याची गरज नाही. याबाबतचा निर्णय सोमवारी (दि.१४) मंत्रीमंडळात घेण्यात आला. महायुती सरकारची ही शेवटची मंत्रिमंडळाची बैठक ठरण्याची शक्यता आहे. मंत्रिमंडळ बैठकीच्या संदर्भात मोठी गोपनीयता ठेवण्यात आली होती. मंत्रिमंडळ बैठकीचा अजेंडा मंत्र्यांना थेट बैठकीत देण्यात आला. बैठकीच्या आधी कोणत्याही मंत्र्यांना किंवा अधिकाऱ्यांना अजेंडा दिला नसल्याची चर्चा मंत्रालयात सुरु होती.

## वेधक

### सदनिकेत भीषण आग

**नवी मुंबई :** नवी मुंबईतील सर्वात उच्चभ्रू वसाहत समजल्या जाणाऱ्या नेरुळ येथील एनआरआय कॉम्प्लेक्समधील ४७ व्या इमारतीच्या १७ व्या मल्यावरील सदनिकेला सोमवारी (दि. १४) भीषण आग लागली. अग्निशमन दलाने दिलेल्या माहितीनुसार, येथे कोणी राहात नसल्याने आग कशामुळे लागली तसेच नेमकी किती वाजता लागली, याबाबत माहिती मिळाली नाही. दरम्यान, आगीची माहिती वाशी अग्निशमन दलास मिळताच तात्काळ अग्निशमन बंबाच्या मदतीने आग आटोक्यात आणण्यात आली. दरम्यान, आजूबाजूच्या सदनिका रिकाम्या करण्यात आल्या आहेत.

### बालिकेवर अत्याचार

**पनवेल :** चॉकलेटचे आमिष दाखवून कळंबोलीमध्ये रविवारी (दि.१३) सकाळी साडेअकरा वाजता एका दुकानदाराने नऊ वर्षांच्या बालिकेवर अत्याचार करण्याचा प्रयत्न केला. या घटनेची तक्रार पालकांनी कळंबोली पोलीस ठाण्यात नोंदविली आहे. पीडित बालिका ही कळंबोलीत राहणारी असून, तिच्या आईने दिलेल्या तक्रारीनंतर या घटनेला वाचा फुटली. दुकानामध्ये चॉकलेटचे आमिष दाखवून संशयित ४८ वर्षीय आरोपीने बालिकेला दुकानात घेतले. त्यानंतर तिच्यावर अत्याचार करण्याचा प्रयत्न केला. याबाबत बालिकेने घरी पालकांना सांगितल्यावर पोलीस ठाण्यात तक्रार दिली.

# उरणमध्ये समाजमंदिराचे भूमीपूजन

## शेकापचे सरचिटणीस जयंत पाटील यांची प्रमुख उपस्थिती



| उरण | वार्ताहर |

आवरे येथे श्री विठ्ठल रखुमाई मंदिर परिसरामध्ये प्रादेशिक पर्यटन विकास योजनेंतर्गत मंजूर झालेल्या समाज मंदिराचा भूमीपूजन सोहळा शेकापचे सरचिटणीस जयंत पाटील यांच्या हस्ते दसऱ्याच्या शुभमुहूर्तावर शनिवारी (दि.१२) पार पडला.

यावेळी आ. जयंत पाटील यांनी आपल्या मनोगतामध्ये पुढच्या दसऱ्यापर्यंत उर्वरित कामासाठी निधी उपलब्ध करून मंदिराचं काम पूर्ण करण्यासाठी प्रयत्न करू, असे सांगितले.तसेच आवरे गावातील सावकाराकडील असलेली जमीन शेतकऱ्यांना परत मिळवून देऊ, असे सांगून आवरे गावातील शेतकऱ्यांनी दलालापासून सावध राहा, जमिनी विकू नका, असा मोलाचा सल्ला शेतकऱ्यांना दिला आहे. यावेळी पनवेल महानगरपालिकेचे विरोधी •> पान २ वर

## विमानात बॉम्ब ठेवल्याची धमकी

| मुंबई | प्रतिनिधी |

मुंबईहून उड्डाण करणाऱ्या तीन विमानांमध्ये बॉम्बची धमकी देण्यात आल्याने एकच खळबळ उडाली. एअर इंडियाचे पहिले विमान मुंबईहून न्यूयॉर्कला जात होते. माहिती मिळताच विमान दिल्लीकडे वळवण्यात आले. हे विमान सध्या दिल्लीतील इंदिरा गांधी आंतरराष्ट्रीय विमानतळावर आहे. विमानात २३९ प्रवासी होते. दुसरी फ्लाइट इंडिगोची असून, ती मुंबईहून मस्कतला जात होती. तर तिसरी इंडिगोची फ्लाइट मुंबईहून जेद्दाहला जात होते. या दोन्ही विमानांना विलगीकरणात ठेवून त्यांची तपासणी केली. मुंबई-हावडा मेललाही बॉम्बने उडवण्याची धमकी देण्यात आली होती.

# गेल प्रकल्पग्रस्त, शेतकऱ्यांचे आंदोलन

## स्थानिकांना प्राधान्याने नोकरीत सामावून घ्या

| अलिबाग | प्रतिनिधी |

कंपनीत स्थानिकांना प्राधान्याने नोकरीत सामावून घेण्यात यावे, अशा अनेक मागण्यांसह प्रकल्पग्रस्त व स्थानिकांवर होणाऱ्या अन्याविरोधात गेल कंपनीसमोर सोमवारी (दि.१४) कामबंद आंदोलन करण्यात आले. संयुक्त प्रकल्पग्रस्त कामगार आंदोलन समितीचे अध्यक्ष तथा खानावचे उपसरपंच निलेश गायकर यांच्या नेतृत्वाखाली हा लढा देण्यात आला. दरम्यान, महसूल प्रशासन, कंपनी प्रशासन व प्रकल्पग्रस्त यांच्यासमवेत झालेल्या सकारात्मक चर्चेनंतर शेतकरी व प्रकल्पग्रस्तांनी आंदोलन मागे घेतले.

यावेळी सरपंच अजय नाईक, संयुक्त प्रकल्पग्रस्त कामगार आंदोलन समितीचे •> पान २ वर

### परिसराला छावणीचे स्वरूप

गेल कंपनीच्या समोर प्रकल्पग्रस्तांनी आंदोलन पुकारले होते. कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पोलिसांचा कडेकोट बंदोबस्त ठेवण्यात आला होता. अलिबागचे पोलीस उपविभागीय अधिकारी विनीत चौधरी यांच्या नेतृत्वाखाली अलिबाग, रेवदंडा व मुरुड पोलीस ठाण्यातील अधिकाऱ्यांसमवेत पोलीस कर्मचारी दाखल झाले होते. त्यामुळे परिसराला पोलीस छावणीचे स्वरूप निर्माण झाले होते.

> प्रकल्पग्रस्तांच्या मागणीसाठी आंदोलन पुकारले होते. वरिष्ठांच्या सूचनेनुसार आंदोलनकर्त्यांची भेट घेतली. स्थानिकांना नोकरीत घेण्यासाठी प्राधान्य देण्याबाबत चर्चा झाली. गेल कंपनीचे काम चालू आहे. इतर कामांसाठी कंत्राटी कामगार घेतले जातील. त्यांची कंपनी प्रशासनाने यादी मागितली आहे.
> – संदीप जाधव, निवासी नायब तहसीलदार

## एसटीची हंगामी भाडेवाढ रद्द

# प्रवाशांची दिवाळी होणार गोड

| मुंबई | प्रतिनिधी |

दिवाळीची चाहूल लागताच पर्यटनाचे, आप्तस्वकीयांकडे गावी जाण्याचे वेध लागतात. सुट्टीमध्ये फिरावयास बाहेर पडणाऱ्यांना एसटीकडून मोठा दिलासा मिळणार आहे. एसटी महामंडळाकडून दरवर्षी दिवाळीत दहा टक्के भाडेवाढीचा निर्णय यंदा रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे प्रवाशांकडून आनंद व्यक्त करण्यात येत आहे.

ऐन थंडीत प्रवासाचा थकवा कमी जाणवत असल्याने दिवाळीच्या सुट्टीत तीर्थाटन आणि पर्यटन वाढते. दिवाळीचा हंगाम सुरू झाल्यानंतर डिसेंबरपर्यंत पर्यटनाचा हंगाम मानला जातो.त्यामुळे एसटी महामंडळाकडून दरवर्षी दिवाळीत १० टक्के भाडेवाढ केली जाते. मात्र, प्रवाशांची गर्दी लक्षात घेता एसटी महामंडळाने मोठा निर्णय घेतला आहे. महामंडळाने जाहीर केलेली १० टक्के हंगामी भाडेवाढ रद्द करण्यात आली आहे. दिवाळीत केली जाणारी हंगामी भाडेवाढ रद्द केल्यामुळे एसटी महामंडळाला मिळणारी अतिरिक्त रक्कम यंदा मिळणार नाही. मात्र, या निर्णयाचा प्रवाशांना फायदा होणार आहे. या भाडेवाढीमुळे एसटीचा लांब पल्ल्याचा प्रवास महागणार होता. परंतु, आता एसटीच्या तिकिटाचे दर जैसे थे अवस्थेत राहतील. •> पान २ वर

### सर्वसामान्य प्रवाशांना दिलासा

दरवर्षी एसटी महामंडळाकडून १० टक्के हंगामी भाडेवाढ केली जाते. यंदाही ही भाडेवाढ २५ ऑक्टोबर ते २४ नोव्हेंबरदरम्यान करण्याचे परिपत्रक काढण्यात आले. परंतु, विधानसभा निवडणुकीमुळे राज्यातील जनतेची नाराजी निर्माण होऊ नये म्हणून भाडेवाढ रद्द करण्यात आली. यामुळे सर्वसामान्य प्रवाशांना दिलासा मिळाला आहे.

### कोणत्याच बसमध्ये भाडेवाढ नाही

एसटीने हंगामी भाडेवाढ रद्द करण्याचा निर्णय घेतल्यामुळे महामंडळाच्या तिजोरीत जमा होणारी अतिरिक्त रक्कम यंदा जमा होणार नाही. एसटीला दिवाळीच्या काळात चांगले उत्पन्न मिळते. यावर्षीही उत्पन्नवाढीसाठी हा मार्ग स्वीकारला होता. परंतु, आता भाडेवाढ करण्याचा निर्णय रद्द करण्यात आला आहे. आता विठाई, शिवशाही, निमआराम बसेससाठी भाडेवाढ लागू असणार नाही.



# जोरदार वाऱ्याने बॅनर पडला

| रसायनी | वार्ताहर |

सोमवारी (दि. १४) सायंकाळी अचानक सुसाट वेगाने सुटलेल्या वादळी वाऱ्यामुळे चौक-कर्जत फाटा येथे मोठा बॅनर कोसळल्याची दुर्घटना घडली. या दुर्घटनेत सुदैवाने कोणतीही जीवितहानी झालेली नाही. पण, जोखीम पत्करुन लावल्या जाणाऱ्या होर्डिंगचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

शासनाने बॅनर, होर्डिंग काढून टाकण्याचे आदेश देऊनदेखील स्थानिक पातळीवर प्रशासन लक्ष देत नाही, याचा प्रत्यय आज पुन्हा एकदा आला आहे. याबाबत नागरिकांकडून नाराजी व्यक्त करण्यात येत आहे.



राष्ट्रीय महामार्ग क्रमांक चार चौक येथे चौककडून कर्जतला जाणाऱ्या चौक फाट्यावर होर्डिंगचे साम्राज्य पसरले आहे. तरीही तिथे स्थानिक पातळीवर असणाऱ्या अधिकारी, कर्मचारी यांचे लक्ष नाही. आज जोरदार •> पान २ वर

## सुरक्षेसाठी महिलांनो एकजूट व्हा!

सुकन्या साखरकर आदी मान्यवर, पदाधिकारी, शेकाप महिला आघाडीच्या पदाधिकारी, सभासद, महिला वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता.याप्रसंगी चित्रलेखा पाटील यांनी सांगितले की, महिलाच समाजाचे परिवर्तन करू शकते. महिलाच समाजाला पुढे नेऊ शकते. त्यासाठी महिलांना एकत्र केले पाहिजे. त्यांना चांगले विचार दिले पाहिजेत. त्यांचे प्रश्न जाणून घेतले पाहिजेत. ही भूमिका शेतकरी कामगार पक्षाचे नेते जयंत पाटील यांची आहे. त्यांच्या मार्गदर्शनातून 'लेक शिवबा'ची हा मेळावा आयोजित केला आहे. या मेळाव्यातून महिलांना एकत्र आणून विचारांचे आदान-प्रदान करण्याचे काम सुरू केले आहे. महिलांकडून मेळाव्याला चांगला प्रतिसाद मिळत असल्याचा आनंद आहे. शेतकरी कामगार पक्ष कायमच शेतकरी, कष्टकरी, गोरगरीबाला केंद्रबिंदू ठेवून काम करीत आला आहे. कोरोना काळात शेकापच्या माध्यमातून मदतीचा हात दिला. मुलींना शिक्षणाचा मार्ग मोकळा व्हावा म्हणून त्यांच्यासाठी मोफत सायकल देऊन बांधिलकी जपण्याचे काम केले. अलिबाग मुंबईच्या अगदी जवळ आहे. अलिबागला पर्यटनातून चालना मिळावी यासाठी शेकापचे नेते जयंत पाटील यांच्या प्रयत्नाने मांडवा जेट्टीचे अस्तित्व निर्माण केले. पर्यटनातून स्थानिकांना रोजगार मिळावा यासाठी कायमच प्रयत्न केले जात आहे.

स्व. मीनाक्षी पाटील यांनी राज्यमंत्री असताना तालुक्यासह जिल्हा, राज्यासाठी काम केले आहे. त्यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून या विभागातील प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी प्रयत्न केले जाणार आहेत.

## प्रतीक्षा आचारसंहितेची

अलिबागमध्ये ३ लाख २ हजार २६८ मतदार, श्रीवर्धनमध्ये २ लाख ६३ हजार ७१ मतदार आणि महाडमध्ये २ लाख ९२ हजार ७८४ मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहेत.रायगड जिल्ह्यातील सात विधानसभांपैकी अलिबाग, श्रीवर्धन आणि महाड या विधानसभा मतदारसंघात उमेदवारांची मदार महिला मतदारांवर असणार आहे. या तिन्ही मतदारसंघात पुरुष मतदारांपेक्षा महिला मतदार अधिक आहेत. मतदार यादीतील आकडेवारीनुसार, अलिबाग विधानसभा मतदारसंघात पुरुषांच्या तुलनेत महिला मतदार ४ हजार २७७ अधिक आहेत. श्रीवर्धन मतदारसंघात ४ हजार ७०९ महिला मतदारांची संख्या पुरुष मतदारांपेक्षा अधिक आहे. महाड विधानसभा मतदारसंघात पुरुष मतदारांपेक्षा महिला मतदार १ हजार ४०४ ने अधिक आहेत. यामुळे अलिबाग, श्रीवर्धन आणि महाड मतदारसंघात महिला मतदार आमदार ठरविणार आहेत.

## उरणमध्ये समाजमंदिराचे भूमीपूजन

पक्षनेते प्रीतम म्हात्रे, शिवसेना ठाकरे गटाचे तालुकाप्रमुख, माजी जि.प.

### पान १ वरून

सदस्य संतोष ठाकूर, काँग्रेसचे माजी जि.प. सदस्य महेंद्र ठाकूर, माजी सभापती नरेश घरत, सागर कडू, समिधा म्हात्रे, आवरे गावचे माजी सरपंच भार्गव गावंड, निराबाई पाटील, प्रगती म्हात्रे तसेच मंदिराचे डिझाईन करणारे श्रीशैल गायकवाड हे उपस्थित होते.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक विठ्ठल रखुमाई मंदिराचे उपाध्यक्ष संदीप गावंड यांनी केले. त्यांनी या मंदिराच्या जीर्णोद्धारासाठी संपूर्ण गावाने एकत्र येऊन कोणीही या कामात पक्षभेद न करता सर्वांनी सहकार्य करावे, असे आवाहन केले.

यावेळी महेश गावंड, कौशिक ठाकूर, नित्यानंद म्हात्रे, मंदिराचे संस्थापक स्व. दत्ता पाटील यांचे नातू प्रवीण पाटील यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करताना मंदिरातील जुन्या आठवणींना उजाळा दिला. जयंत पाटील यांच्याकडून हे काम मंजूर करण्यासाठी गावातील शेकापचे कार्यकर्ते संदीप गावंड, संजय गावंड, मनोज गावंड, प्रभाकर गावंड यांचे ग्रामस्थांनी आभार मानले. मंदिराचे कमिटी अध्यक्ष संजय गावंड आणि खजिनदार अशोक पाटील यांनी सर्वांचे स्वागत केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्याधर गावंड यांनी केले, तर आभार संदेश गावंड यांनी केले.

## ...शेकडो शासन निर्णय जारी

३ ऑक्टोबरला २०३, ४ ऑक्टोबरला १८८, ५ ऑक्टोबरला २, ६ ऑक्टोबरला शासकीय सुट्टी, ७ ऑक्टोबरला २०९, ८ ऑक्टोबरला १५०, ९ ऑक्टोबरला १९७, १० ऑक्टोबर १९४ असे एकूण दहा दिवसांत १२९१ शासन निर्णय जारी करण्यात आले आहेत.

## गेल प्रकल्पग्रस्त, शेतकऱ्यांचे आंदोलन

पदाधिकारी, निखिल पाटील, गजानन पाटील, अनंत शिंदे, जगदीश ठाकूर, उदय पाटील, गणेश ठाकूर, रवींद्र शिंदे, आत्माराम थळे, वैभव खंडागळे, रामदास शिंदे, संदेश पडवळ, सतीश म्हात्रे आदी पदाधिकारी, सदस्य, प्रकल्पग्रस्त व शेतकरी सहभागी झाली होते.

उसर येथील गेल कंपनी प्रशासनाने गॅस सयंत्रसाठी २४७ शेतकऱ्यांची ४७५ एकर जमीन अल्प दरात अधिग्रहण केली. कायमस्वरुपी नोकरी मिळेल म्हणून शेतकऱ्यांनी जमिनी दिल्या. परंतु, व्यवस्थापनाने फक्त २१ प्रकल्पग्रस्तांना कायम नियुक्ती केली. उर्वरित प्रकल्पग्रस्तांची फसवणूक केली असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

गेल कंपनीच्या नवीन पॉलीमर प्रकल्पाचे काम सुरू आहे. या प्रकल्पाच्या उभारणीसाठी साडेतीन हजार हंगामी कामगार कार्यरत आहेत. त्यामध्ये बोटावर मोजण्याइतके कामगार स्थानिक आहेत. गेल कंपनी स्थानिकांनी रोजगारापासून वंचित ठेवत आहे. त्यामुळे आर्थिक अवस्था बिकट झाली आहे. तसेच खोट्या गुन्ह्यात अडकविले जात आहे, असे त्यांच्याकडून सांगण्यात आले आहे.

प्रकल्पग्रस्त व स्थानिकांवर होणाऱ्या अन्याविरोधात गेल कंपनीसमोर सोमवारी कामबंद आंदोलन करण्यात आले. या आंदोलनात शासन निर्णयानुसार प्रस्ताव सादर करून प्रकल्पग्रस्तांना नोकरी देण्यात यावी, उच्च शिक्षित व तांत्रिक शिक्षण घेतलेल्या प्रकल्पग्रस्तांना कायमस्वरुपी नोकरी देण्यात यावी, स्थानिकांची मशीनरी, वाहने भाडेतत्त्वावर घेण्यास प्राथमिकता द्यावी, अशा अनेक मागण्यांसाठी आंदोलन करण्यात आले. या आंदोलनात मोठ्या संख्येने प्रकल्पग्रस्त व शेतकरी, महिला वर्ग सहभागी झाले होते.

दरम्यान, महसूल विभागाचे निवासी नायब तहसीलदार संदीप जाधव यांच्या उपस्थितीत प्रकल्पग्रस्त व गेल कंपनीच्या अधिकारी यांच्यासोबत दुपारी चर्चा झाली. या चर्चेत स्थानिकांना कंपनीत घेण्यात यावी. शासन स्तरावरील प्रश्न मार्गी लावण्यात यावे, अशी मागणी करण्यात आली. यावेळी शासन स्तरावरील प्रश्न जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयात बैठक घेऊन प्रश्न मार्गी लावण्याचा प्रयत्न करू, असे महसूल प्रशासनाकडून आणि कंपनीत स्थानिकांना घेण्यासाठी यादी देण्यात यावी, असे कंपनी प्रशासनाने आश्वासन दिले. त्यानंतर आंदोलन थांबविण्यात आले.यावेळी अलिबागचे पोलीस उपविभागीय अधिकारी विनीत चौधरी, अलिबागचे पोलीस निरीक्षक किशोर साळे, रेवदंड्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक श्रीकांत किरवले, मुरूडचे सहाय्यक पोलीस निरीक्षक अनिल देशमुख, गेल कंपनीचे अधिकारी अनुप गुप्ता, जतिन सक्सेना, अलिबागचे निवासी नायब तहसीलदार संदीप जाधव, मंडळ अधिकारी, तलाठी व प्रकल्पग्रस्त उपस्थित होते.

**जिल्हाधिकारी कार्यालयात बैठक घेऊन प्रश्न मार्गी लावू. कंत्राटी स्वरूपात कंपनीत घेण्यात येईल. स्थानिकांना प्राधान्याने नोकरी देणार असे आश्वासन प्रशासनाकडून देण्यात आले आहे. स्थानिक बेरोजगार आहेत. त्यांना रोजगार दिले जातील. असे कंपनी प्रशासनाने आश्वासन दिले. त्यानंतर आंदोलन मागे घेण्यात आले.**

**- निलेश गायकर, अध्यक्ष, संयुक्त प्रकल्पग्रस्त कामगार आंदोलन समिती**

## जोरदार वाऱ्याने बॅनर पडला

वारा सुटल्याने तेथील एक होर्डिंग पडून ते पोलीस चौकीवर कोसळले. सुदैवाने तिथे कुणीच नव्हते, त्यामुळे सर्वच प्रकारची हानी वाचली आहे. संबंधित प्रशासनाने आता तरी लक्ष द्यावे, अशी मागणी होत आहे. कुणाचा जीव गेल्यावर प्रशासनास जाग येईल का, असाही प्रश्न विचारला जात आहे.

## प्रवाशांची दिवाळी होणार गोड

मुंबई-पुणे मार्गावर धावणाऱ्या एसटीच्या ई-शिवनेरी बसमध्ये प्रवाशांना मदत करण्यासाठी हवाई सेवेप्रमाणेच आदरादिथ्य आणि व्यवस्थापनाची सेवा देणारी परिचारिका (शिवनेरी सुंदरी) नेमण्यात येणार आहे. प्रवाशांच्या तिकिटावर कोणताही अधिभार न लावता प्रवाशांना चांगल्या सेवा-सुविधा देऊन गुणात्मक सेवेचा दर्जा उंचावेल, अशी अभिनव योजना भविष्यात सुरू करण्यात येणार आहे. एस.टी. महामंडळाच्या प्रत्येक बसस्थानकांवर त्या परिसरातील महिला बचतगटांना आपले स्थानिक पदार्थ विकण्यासाठी चक्रीय पद्धतीने नाममात्र भाडे आकारुन १० बाय १० आकाराचा स्टॉल उपलब्ध करून दिला जाणार आहे. उपरोक्त निर्णयाबरोबरच नवीन २५०० साध्या बसेस खरेदी करण्याची निविदा प्रक्रिया सुरू करणे, तसेच १०० डिझेल बसेसचे प्रायोगिक तत्त्वावरील इलेक्ट्रिक बसमध्ये रूपांतर करणे, अशा विविध विषयांना बैठकीमध्ये मान्यता देण्यात आली.


MAHAGENCO
Maharashtra State Power Generation Co. Ltd.

### ETENDER NOTICE

**E-Tenders are invited on line from experienced and reputed Manufacturers/Suppliers/Contractors for the supply/ works of following at Gas Turbine Power Station, Uran:**

| e-Tender / RFx No. | Description | Estimated Cost/EMD (Rs) | Sale Period | Last date of submission (up to 15.00 hrs) |
|---|---|---|---|---|
| RFx No. 3000052373 | Supply of Compressor rotor blades for all 16th stages along with installation material for 108 MW GT V 94.2 Unit No. 7 at GTPS, Uran. | 831.04 Lakhs 5,00,000/- | 11.04.2024 To 30.10.2024 | 31.10.2024 |

**Tender Cost Rs. 1180/- for all tenders.** Tender cost and EMD to be paid online only. Tenders are available for sale on our website from dt. **11.10.2024** for more details, Please visit our website **https://eprocurement.mahagenco.in** **Contact Details:** EE (P&C) - 91-9167007841.
Vendors are requested to register their firms for E-Tendering. Please log on to our website **https://eprocurement.mahagenco.in**,

**Sd/-**
**Chief Engineer**
**GTPS Uran**


## दोघा सोनसाखळी चोरांना बेड्या

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

पेण शहरातील एका वयोवृद्ध महिलेच्या गळ्यातील सोन्याची साखळी खेचून पल्सर गाडीवरून दोन तरुण पेण शहरातून पळाले होते. त्या तरुणाचा पाठलाग स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाच्या टीमने केला आणि त्या टीमला नेरळ पोलिसांच्या पथकाची मदत मिळाली. शेवटी नेरळ गावातील खांडा भागातील ते दोघे तरुण सोन्याच्या साखळीसह पोलिसांच्या हाती लागले आहेत.

नेरळ पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक शिवाजी धावले तसेच पोलीस शिपाई सचिन वाघमारे,बविनोद वांगणेकर यांच्यासह स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाचे उप निरीक्षक लिंगाप्पा सरगर पोलीस हवालदार झेमसे,आशु बेंद्रे आणि होमगार्ड राहुल पाटील यांनी पळून जाण्याच्या तयारीत असलेल्या चोरट्यांच्या मुसक्या आवळल्या. हे दोन्ही तरुण नेरळ गावातील खांडा भागात राहणारे आहेत. पेण शहरात सोन्याची साखळी चोरणारे हे नेरळ गावातील खांडा भागातील राहणारे असून, त्यांची नावे कैलास कमल बहादूर नेपाळी (२४) आणि गुलाम अब्बास ईराणी (२४) अशी आहेत. या आरोपींकडून अंदाजे १० ग्रॅम वजनाची चेन, दोन मोबाईल व पल्सर मोटारसायकल ताब्यात घेण्यात आली.

सदर कामगिरी पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अपर पोलीस अधीक्षक अभिजीत शिवथरे, उपविभागीय पोलीस अधिकारी टेळे तसेच नेरळ पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी शिवाजी ढवळे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण पथकाचे पोलीस उपनिरीक्षक श्रीरंग किसवे, पोलीस उपनिरीक्षक समीर लोंढे, पोलीस उपनिरीक्षक नितीन मंडलिक, सफौ/बाळासाहेब धायगुडे, पोलीस हवालदार लोखंडे, सचिन वाघमारे आदींनी केली.


### ग्रामपंचायत चेंढरे, ता.अलिबाग, जि.रायगड
### जाहीर नोटीस

दि.१४/१०/२०२४
जा.क्र.    /२०२२

महाराष्ट्र ग्रामपंचायत कर व फी नियम १९६० नुसार १६ अ अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे खालील मालमत्तेच्या हस्तांतरणासंबंधाने ग्रामपंचायत चेंढरेस प्राप्त झालेल्या मालमत्ता धारकांच्या प्रकरण परत्वे अनुसूची २ व ३ मधील नोटिसीनुसार सदर हस्तांतरण संदर्भाने कोणाच्याही हितसंबंधाने हरकत अगर आक्षेप असल्यास सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत हितसंबंधाच्या व हरकतीच्या लेखी पुराव्यासह ग्रामपंचायत चेंढरे कडे लेखी स्वरूपात हरकत नोंदवावी. अन्यथा करवसूलीच्या सोयीसाठी सदर हस्तांतरण करून ग्रामपंचायत दप्तरी याची नोंद घेतली जाईल.

| अ. नं. | प्रभाग क्रमांक | मालमत्ता क्रमांक | मालमत्तेचे ठिकाण | मालमत्तेचे वर्णन | ज्यांचे नावे मालमत्ता आहे त्यांचे म्हणजे मालमत्ता विकणाऱ्यांचे किंवा अभिहस्तांकन कर्त्याचे नाव | खरेदीदाराचे किंवा अभिहस्तांकन कर्त्याचे नाव |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | ४ | १९१९/५ | मोरया टॉवर हौ.सोसा | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम २ रा मजला ६३० चौ.फूट | प्रकाश अशोक पाटील | अक्षता श्रीकांत रानवडे |
| २ | २ | २०६० | पार्वती नंदन रेसिडेन्सी | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम ३ रा मजला ६५३ चौ.फुट | साहिल बिल्डर्स तर्फे रेणुका नामदेव पवार | सागर बाळाराम सकपाळ, राजेश बाळाराम सकपाळ, बाळाराम गजानन सकपाळ |
| ३ | ४ | १७२५/८ | सिगल रेसिडेन्सी | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम दुसरा मजला ६४७ चौ.फुट | स्वप्निल विश्वनाथ परकर | सृष्टी स्वप्निल परकर |
| ४ | ६ | १०१२/४ | प्रभात दर्पण सोसायटी | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम तळमजला ३८० चौ.फुट | किरण मधुकर परळकर, वर्षा किरण परळकर | मनिषा सुर्यकांत म्हात्रे |
| ५ | २ | १२०१-१२ सोसायटी | जयभवानी | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम २ रा मजला ११२५ चौ.फुट | अरूण चांगदेव पाटील | मिना नंदकुमार मोडखरकर |
| ६ | ५ | ९००/३ ते ७ | तुलसी सोसायटी | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम दुकानगाळे चौ.फुट | भगाणी बिल्डर्स तर्फे प्रोप्रायटर साहिब गोविंदरावम पेसवानी | सहयोग व्यापारी नागरी, सहकारी पतसंस्था मर्या, अलिबाग |
| ७ | ५ | १११२/३ | स्वामी समर्थ नगर, पिंपळभाट | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम चौ.फुट | नंदाबाई धर्मा जांभळे | धर्मा नारायण जांभळे |
| ८ | ४ | १६८२/५ | सिगल रेसिडेन्सी | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम १ ला मजला सदनिका चौ.फुट | सुनिल बाळाराम लिगम | अरूण महादेव माळी |
| ९ | ६ | ९५१/२ | एकता नगर | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम दुकानगाळा चौ.फुट | पुजा दिनेश कुसाळकर | बाळकृष्ण यशवंत म्हात्रे शुभांगी बाळकृष्ण म्हात्रे |
| १० | ६ | ९५१/१ | एकता नगर | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम दुकान गाळा चौ.फुट | पुजा दिनेश कुसाळकर | बाळकृष्ण यशवंत म्हात्रे शुभांगी बाळकृष्ण म्हात्रे |
| ११ | २ | १६६१/२ | अमोघ पार्क | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम १ ला मजला सदनिका ६१७ चौ.फुट | प्रशांत प्रकाश पाटील, प्राची प्रशांत पाटील | सुजित बळीराम पाटील साक्षी सुजित पाटील |
| १२ | ४ | १४७५/११ | गौरनंदन सोसायटी | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम २ रा मजला सदनिका ४८० चौ.फुट | चेतक पिटर चावीस | किमया प्रशांत वरळीकर |
| १३ | ३ | १६४०/९ | जय गजानन सोसायटी | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम २ रा मजला सदनिका ५७५ चौ.फुट | महेश मधुकर बोडस, माधवी मधुकर बोडस | मोहिनी मनोहर पाटील |

**सही/-**
**ग्रामविकास अधिकारी**
**ग्रामपंचायत चेंढरे**
**ता.अलिबाग जि.रायगड**

**सही/-**
**सरपंच**
**ग्रामपंचायत चेंढरे**
**ता.अलिबाग जि.रायगड**



### ग्रुप ग्रामपंचायत हरकोल, ता. माणगाव, जि. रायगड

| अ. क्र. | कामाचे नाव | योजनेचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | इसारा रक्कम | निविदा फॉर्म फी | निविदा स्वीकारण्याची दिनांक | निविदा उघडण्याची दिनांक | काम पूर्ण करण्याची मुदत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | हरकोल येथे पायऱ्या बांधणे | १५ वित्त आयोग | ६१४१४/- | ६१४/- | २००/- | १५/१०/२०२४ | १५/१०/२०२४ | १ महिने |
| २ | हरकोल येथे बंधिस्त गटार बांधणे | १५ वित्त आयोग | ४१२७३/- | ४१२/- | २००/- | १५/१०/२०२४ | १५/१०/२०२४ | १ महिने |
| ३ | हरकोल येथे बंधिस्त गटार बांधणे | १५ वित्त आयोग | ५११७८/- | ५११/- | २००/- | १५/१०/२०२४ | १५/१०/२०२४ | १ महिने |
| ४ | अलसुदे बौद्धवाडी समाज मंदिरासमोर सुशोभिकरण करणे | १५ वित्त आयोग | ६७३५६/- | ६७३/- | २००/- | १५/१०/२०२४ | १५/१०/२०२४ | १ महिने |

**अटी व शर्ती**
१) कामाचे अंदाजपत्रकीय व आराखडे कार्यालयीन वेळेस पहावयास मिळतील. आवश्यक फी भरून त्याची प्रत उपलब्ध केली जाईल.
२) निविदा भरणाऱ्या ठेकेदाराने आपले रजिस्टेशनचे दाखले हे सत्यप्रत केलेले असावेत व चालू आर्थिक वर्षात केलेल्या कामाचा सक्षम प्राधिकाऱ्याचा दाखला असावा.
३) कोणतेही एक अथवा अनेक निविदा कोणतेही कारण न देता नाकारण्याचा अधिकार सरपंच पळसप यांनी राखून ठेवला आहे.
४) प्रत्येक देयकातून शासन नियमावली प्रमाणे रक्कम कपात केल्या जातील.
५) नोंदणीकृत ठेकेदार उपलब्ध न झाल्यास स्थायिक ठेकेदाराचे निविदाचा विचार केला जाईल.

सरपंच
ग्रुप ग्रामपंचायत हरकोल
ता. माणगाव, जि. रायगड

ग्रामसेवक
ग्रुप ग्रामपंचायत हरकोल
ता. माणगाव, जि. रायगड



### महाराष्ट्र शासन
### महाड मार्ग प्रकल्प विभाग, महाड (रायगड)
Email :-rpddivision@gmail.com Ph.No. (02145) 222243
**निविदा सुचना क्रमांक १४ सन २०२४-२५**

कार्यकारी अभियंता, महाड (मा. प्र.) विभाग, महाड, जिल्हा रायगड, पिन - ४०२३०१, दुरध्वनी क्रमांक ०२१४५ - २२२२२४३ महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडे योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदार यांचेकडुन खालील प्रमाणे बी-१ नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाच्या :https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावरुन डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, महाड (मा.प्र.) विभाग महाड, जिल्हा रायगड, यांनी राखून ठेवला आहे.

| अनु क्रमांक | कामाचे नांव | कामाची अंदाजित किंमत | इसारा/बयाना रक्कम | ई निविदा संचाची किंमत | काम पुर्ण करण्याचा कालावधी (पावसाळा धरुन) | नोंदणी वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | बिरवाडी मांघरुण वाघेरी रस्ता तयार करणे, ता. महाड, जि. रायगड. | ९,८२,५३,००३.०० | ४,९२,०००.०० | ३५४०/- | १२ महिने | खुला |

**ई निविदेचे वेळापत्रक**

| | | |
|---|---|---|
| १ | निविदासंच डाऊनलोड व ऑनलाईन निविदा सादर करण्याचा दिनांक व वेळ | दिनांक ०७/१०/२०२४ (सकाळी १०.०० पासुन) ते दिनांक १४/१०/२०२४ वेळ १८.०० वाजेपर्यंत |
| २ | निविदा पुर्व बैठक | मा. मुख्य अभियंता, सा. बां. प्रादेशिक विभाग, कोकण यांचे कार्यालयात दिनांक ११/१०/२०२४ वेळ १५.०० वाजता. |
| ३ | ऑनलाईनद्वारे तांत्रिक व आर्थिक देकार उघडण्याचा दिनांक व ठिकाण (शक्य असल्यास) | अधीक्षक अभियंता, रायगड (सा. बां.) मंडळ, कोकण भवन, नवी मुंबई यांचे कार्यालयात दिनांक १६/१०/२०२४ वेळ ११.०० वाजता. |

टिप:- परिपुर्ण निविदा या संकेतस्थळांवर पाहता किंवा विकत घेता येतील व ऑनलाईन निविदा सादर करता येतील. सदर निविदांचे सविस्तर वेळापत्रक, शुध्दिपत्रके तसेच इतर काही दुरुस्त्या, शर्ती व अटी या वरील संकेत स्थळांवरच पहाता येतील.

जा.क्र.मवि/लेशा/ निविदा/५११
दिनांक : ०४.१०.२०२४

सही/-
**(श्रीम. सलोनी स. निकम)**
**कार्यकारी अभियंता**
**महाड (मा. प्र.) विभाग, महाड,**



### जाहीर नोटीस

माझे अशिलांनी खाली नमूद केलेली जमिन मिळकत जमिन मिळकतीचे मालक मितेश नविनचंद्र शहा यांचेकडून कायमस्वरूपी विकत घेण्याचे निश्चित केले आहे.

| गावाचे नाव | भुमापन क्र. व उपविभाग | क्षेत्रफळ हे.आर.चौ.मी | आकार रू.पै. |
|---|---|---|---|
| मौजे- गणेगाव चिंचवली, ता. कर्जत, जि. रायगड | ७२/१० | ०.७४.०० | ०.५३ |
| | ७२/१२/अ/२ | ०.२५.०० | ०.१९ |

वरील वर्णनाच्या जमीन मिळकतीबाबत कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, वहिवाट व इतर अन्य कोणतेही हक्क हितसंबंध असेल तर संबंधित व्यक्ति किंवा संस्थांनी आपली हरकत पुराव्यासह लेखी स्वरूपात खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ दिवसांत कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही असे समजून विक्रीचा व्यवहार पूर्ण केला जाईल याची नोंद घ्यावी. येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

दिनांक : १५/१०/२०२४

**ॲड. यज्ञेश अनंत भागवत**
अधिवक्ता
राहणार : पाल टॉवर भिसेगाव
ता. कर्जत जि. रायगड
मो.नं. ९३०७८८५७११



### Anjuman Islam Janjira Murud
### Murud Janjira, Dist.Raigad

| Sr. No. | Name of the Post | Subject | Required Qualification | No.of Post | Status | Class |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Assistant Teacher | Chemistry | M.SC.B.Ed Chemistry | 1 | | XI-XII Non Granted |
| 2 | Assistant Teacher | Botany/ Zoology | M.Sc. B.Ed Botany/ Zoology | 1 | | XI-XII Non Granted |
| 3 | Assistant Teacher | Physics | M.SC B.Ed Physics | 1 | | XI-XII Non Granted |

apply within 7 days to the Gen Secretary Anjuman Islam Janjira Murud Pin Code 402401.
Phone -02144-274058, Mobile No. 8007495489
Email Id aijheadoffice1907@gmail.com
**Note :-**
1. Candidate whose name have appeared in BOGUS passed list of MAHA-TET Exam (Maharashtra) issued by Maharashtra Prishad Pune are not allowed to apply for the said post.
2) After scrutiny of all applications received only those candidate will be informed of the "Walk in Interview" who satisfy of all the noms and qualification.

**Gen Secretary**
**Anjuman Islam Janjira Murud**



### Anjuman Islam Janjira Murud
### Murud Janjira, Dist.Raigad

| Sr. No. | Name of the Post | Subject | Required Qualification | No.of Post | Status | Class |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Assistant Teacher (Shikshan Sevak) | English & Social Science | B.A.B.Ed | 1 | | IX-X |
| 2 | Assistant Teacher (Shikshan Sevak) | Maths & Science | B.Sc. B.Ed TET/CTET Paper 2nd | 1 | | VI-VIII |
| 3 | Assistant Teacher (Shikshan Sevak) | Any Subject | HSC. D.Ed TET/CTET Paper 1st | 3 | | V |
| 4 | Assistant Teacher (Shikshan Sevak) | Maths & Science | B.Sc. B.Ed | 1 | | IX-X |

apply within 7 days to the Gen Secretary Anjuman Islam Janjira Murud Pin Code 402401.
Phone -02144-274058, Mobile No. 8007495489
Email Id aijheadoffice1907@gmail.com
**Note :-**
1. Candidate whose name have appeared in BOGUS passed list of MAHA-TET Exam (Maharashtra) issued by Maharashtra Prishad Pune are not allowed to apply for the said post.
2) After scrutiny of all applications received only those candidate will be informed of the "Walk in Interview" who satisfy of all the noms and qualification.

**Gen Secretary**
**Anjuman Islam Janjira Murud**

# प्रदूषणामुळे आरोग्य धोक्यात

## माजी आ. पंडित पाटील यांचा आरोप

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

**पेण तालुक्यातील डोलवी येथील जेडब्ल्यू कंपनीमुळे प्रदूषणाचा धोका वाढला आहे. यामुळे परिसरातील गावांमधील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. स्थानिक तरुणांना नोकरीतून डावलले जात असून कंपनीच्या अवजड वाहतूकीमुळे रस्ते खराब होऊ लागले आहेत. असा आरोप शेकापचे माजी आ. पंडित पाटील यांनी केला आहे. याबाबत सोमवारी (दि.१४) पुनर्वसन उपजिल्हाधिकारी भरत वाघमारे यांची भेट घेऊन योग्य ती कार्यवाही करण्यात यावी, अशी मागणी निवेदनाद्वारे केली आहे.**



डोलवी येथील जेएसडब्लू कंपनीचे दुषित सांडपाणी खाडीत सोडले जात आहे. कंपनीमधून दूषित वायू व धूळ सोडल्याने येथील नागरिकांना मोठ्या प्रमाणावर त्रास सहन करावा लागत आहे. धरमतर खाडीत खोदकाम करण्यात येत असल्याने भविष्यात बांध बंधिस्ती तुटण्याचा धोकाही नाकारता येत नाही. कंपनी प्रशासनाकडून स्थानिक तरुणांना नोकरीमधून डावलले जात आहे. तसेच, कंपनीच्या अवजड वाहतुकीमुळे रस्ते खराब होत आहेत. अलिबाग-पेण मार्गावरून प्रवास करणाऱ्या प्रवाशांना तसेच चालकांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. कंपनी प्रशासनाकडून सीएसआर निधी वापरताना वाटाण्याच्या अक्षदा दाखवल्या जातात. सांबरी येथील बंधाऱ्याची झालेली नुकसान भरपाईचा प्रश्न अजूनही मार्गी लावण्यास कंपनी प्रशासन उदासीन आहे. कंपनीची लेबर कॉलनी नसल्यामुळे आजूबाजूच्या ग्रामपंचायतींवर प्रचंड ताण पडत आहे. नागरिकीकरण वाढल्याने ग्रामपंचायतीला सुविधा पुरवताना तारेवरची कसरत करावी लागत आहे, अशा अनेक समस्यांसंदर्भात कंपनीच्या दालनात वेळोवेळी बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. परंतु, कंपनी प्रशासनाकडून फक्त गोड बोलून वेळ मारून घेतली जाते. कंपनीचे अधिकारी या समस्यांकडे गांभीर्याने लक्ष देत नाही, असा आरोप माजी आ. पंडित पाटील यांनी केला आहे.

पेण व अलिबाग तालुक्यातील शेतकरी, उपविभागीय अधिकारी, खारभूमी अधिकारी, कंपनीच्या जबाबदार व निर्णयक्षम अधिकारी यांना मागील पाच वर्षात कंपनीने सीएसआर फंडातून केलेल्या कामांची माहिती व किती स्थानिक तरूणांना रोजगार उपलब्ध करून दिला त्याची यादीसह बैठकीचे आयोजन करण्यात यावे, अशी मागणी पंडीत पाटील यांनी निवेदनातून केली आहे.

# बळीराजावर परतीच्या पावसाचे विघ्न

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

यावर्षी ऐन बहरात असलेल्या भाताच्या शेतांमधून चांगले पीक मिळण्याची आशा शेतकऱ्यांना होती. मात्र, परतीच्या पावसाने गेली चार दिवस झोडपून काढले आहे. यामुळे कर्जत तालुक्यातील भाताच्या शेतीचे प्रचंड नुकसान होत असून शेतकरी हवालदिल झाला आहे.

भाताचे कोठार म्हणून ओळखल्या जाणाऱ्या कर्जत तालुक्यात यंदा तब्बल १० हजार हून अधिक हेक्टर जमिनीवर भाताची शेती फुलली आहे. या भागातील शेतकरी समाधानकारक पावसामुळे आपल्या शेतीची चांगली वाढ झाल्यामुळे सुखावले होते. सर्वत्र पिवळे सोने शेतात बहरलेले दिसत असून यावर्षी बळीराजा खुश होता. परंतु, या वर्षीच्या परतीच्या पावसामुळे मोठ्या अडचणीत सापडला आहे. अचानक आलेल्या अवकाळी पावसामुळे शेतीचे प्रचंड नुकसान झाले आहे. कर्जत तालुक्यातील वारे, कुरुंग, कळंब, पोशिर, वरई आणि आदिवासी भागातील भात शेतीवर या पावसाचा भयावह परिणाम दिसून येत आहे. भाताचे पीक जोमात असतानाच अचानक आलेल्या या पावसाशुळे शेतकऱ्यांच्या हाता तोंडाशी आलेला घास हिरावला गेला आहे. शेतात उभे असलेले पीक वादळी वाऱ्याने शेतात आडवे झाल्याने मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून शेतकरी हवालदिल झाले आहेत.



> **शासनाने हवामान खात्याच्या माध्यमातून परतीच्या पावसाची घोषणा करायला हवी होती. मात्र, परतीच्या पावसाबद्दल कोणतेही भाकीत हवामान खात्याकडून वर्तवण्यात आले नाही. आणि यामुळे भाताचे पीक शेतकऱ्यांनी कापून ठेवल्याने ते पीक शेतात कुजून जाण्याची भीती आहे.**
> **– शशिकांत मोहिते, प्रगत शेतकरी, कर्जत**

# नागोठणे आठ तास अंधारात

**। नागोठणे । वार्ताहर ।**

सर्वत्र सध्या ऑक्टोबर हिटचा तडाखा सहन करावा लागत आहे. अशातच काही ठिकाणी परतीच्या पावसाने धुमाकूळ घातला आहे. आता हा पावसाचा जोर वाढणार की ओसरणार, हा प्रश्न अनेकांना पडलेला असतानाच नागोठणेसह संपूर्ण रोहा तालुक्यात शनिवारी (दि.१२) दुपारनंतर जोरदार वाऱ्यासह विजेच्या कडकडाटासह आलेल्या मुसळधार पावसाने नागोठणे शहर व विभागासह संपूर्ण रोहा तालुक्याला अक्षरशः झोडपून काढले. यावेळी विद्युत वाहिनीवरील इलेक्ट्रीकल पिन इन्सूलेटरमध्ये बिघाड झाल्याने नागोठणे शहर व विभागातील वीज पुरवठा खंडित झाल्याने नागरिकांना दसरा विजयादशमीच्या मंगलदिनी तब्बल आठ तास अंधारात चाचपडत राहावे लागले. मात्र, सहाय्यक अभियंता नितीन जोशी यांनी आपल्या सर्व कर्मचाऱ्यांसह युद्ध पातळीवर दुरुस्तीचे काम पूर्ण करुन दसऱ्याच्याच रात्री साडेअकरा वाजता वीज पुरवठा सुरळीत करुन नागोठणेकरांना दिलासा दिला.



> **विजांमुळे वीज पुरवठा करणाऱ्या विद्युत वाहिनीवरील पिन इन्सूलेटर डोंगराळ भागासह बऱ्याच ठिकाणी पंचर झाल्याने वीज पुरवठा खंडित झाला. मात्र, त्याचा शोध घेत माझ्या सर्व कर्मचाऱ्यांच्या अथक परिश्रमाने पिन इन्सूलेटर बदलून संपूर्ण वीज पुरवठा सुरळीत करण्यात यश आले आहे.**
> **–नितीन जोशी, सहाय्यक अभियंता, नागोठणे**

# कोप्रोली प्राथमिक शाळेची दुरवस्था

## विद्यार्थ्यांच्या जीवाला धोका

**। उरण । वार्ताहर ।**

कोप्रोली ग्रामपंचायत हद्दीतील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेची दुरवस्था झाली आहे. यात शाळेचा पायाच ढासळू लागल्याने शिक्षण विभागाच्या दुर्लक्षित पणामुळे जीव मुठीत धरून विद्यार्थ्यांना शिक्षणाचे धडे गिरवावे लागत आहेत. तरी या शाळेचे स्ट्रक्चरल ऑडिट करून विद्यार्थ्यांच्या जीवीतास धोका निर्माण होणार नाही ना याची खातरजमा करावी, अशी मागणी पालक वर्गाकडून करण्यात येत आहे.





काप्रोलीतील मुलांना दर्जेदार शिक्षण मिळावे यासाठी ब्रिटीश सरकारच्या काळात या ठिकाणी दगडी शाळेच्या इमारतीची उभारणी केली होती. मात्र, सुसज्ज अशा दगडी शाळेच्या इमारतीचे बांधकाम पाडून सर्व शिक्षण अभियान व आँल काँर्गो ग्लोबल लाँ.पा. या प्रकल्पाच्या अंतर्गत प्राथमिक शाळेची इमारत नव्याने उभी करण्यात आली होती. मात्र, निकृष्ठ दर्जाच्या कामामुळे या इमारतीच्या स्लँबला गळती लागली असून प्लॅस्टर गळू लागले आहे. यावर उपाय म्हणून पुन्हा लाखो रुपये खर्च करून शाळेच्या इमारतीवर पत्र्यांची छेड बांधण्यात आली आहे.

मात्र, शिक्षण विभागाच्या 'आंधळं दळतंय आणि कुत्र पिट खातंय' या म्हणी प्रमाणे सध्या इमारतीचा पाया, भिंती जिर्ण झाल्या असून पडण्याच्या स्थितीत आहेत. यामुळे विद्यार्थ्यांना शिक्षण घेताना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. शाळेची इमारत पडली तर शाळेत अभ्यासाचे धडे गिरविणाऱ्या विद्यार्थ्यांच्या जीवितास धोका निर्माण होऊ शकतो, अशी भीती रहिवासी व्यक्त करत आहेत. तरी या शाळेच्या इमारतीचे स्ट्रक्चरल ऑडिट करण्याची मागणी जोर धरू लागली आहे.

> **या संदर्भात कोणत्याही प्रकारची तक्रार आलेली नाही. शाळेचे बांधकाम जिर्ण झाले असून दुरुस्तीसाठी निधी मिळविण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत. –प्रियांका पाटील, प्र. गटशिक्षण अधिकारी पं.स., उरण**



# करंजाडे येथे टँकरला आग

**। पनवेल । वार्ताहर ।**

एलएचएस ब्लॅक ऑइलने भरलेल्या टँकरला अचानकपणे आग लागल्याची घटना पनवेलजवळील करंजाडे परिसरात सोमवारी (दि.१४) सकाळच्या सुमारास घडली आहे.

ऑईल टँकर (एमएच-१५-ईजी-७६३४) १८ हजार लिटर एलएचएस ब्लॅक ऑईल भरून जेएनपीटी महामार्गाने खोपोली येथे जात असताना सकाळी साडेअकरा वाजताच्या सुमाराला करंजाडे याठिकाणी टँकरमधील चालकाच्या केबीनमधून आग लागली. या घटनेची पनवेल वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय पाटील, पोहवा योगेश भोईर, पोलीस अंमलदार रुपेश ठाकूर, निलेश ठाकूर, विनोद घोडे, निकम, प्रकाश भोरे यांना मिळताच त्यांनी घटनास्थळी पोहोचले. महानगरपालिका फायर ब्रिगेड टँकरची आग विझवत असताना तांत्रिक बिघाड झाल्याने वपोनि संजय पाटील यांनी पीटर मोबाईलमधून फायर एक्सटेंशन काढून आग विझवण्याचा प्रयत्न केला. तसेच, थोड्या वेळात सिडको फायर ब्रिगेड आल्यानंतर पूर्णपणे आग विजवण्यात आली. या आगीमध्ये टँकर चालकाच्या केबिनचे नुकसान झाले असून या आगीमुळे कोणतीही जीवितहानी झाली नाही.

# दहा तोळे सोन्याचा हार लंपास

**। पनवेल । वार्ताहर ।**

पनवेल येथील दीपक महाजन हा नोकरीच्या शोधात होता. त्याला पैशांची आवश्यकता असल्याने दहा तोळे वजनाचा सोन्याचा हार कोणी गहाण ठेऊन पैसे देतो का, असे त्याचा मित्र गौरव भेंडे यांना विचारले होते. यावेळी गौरव याने त्याला ओरीयन मॉल येथे बोलावून घेतले होते. ५ ऑक्टोबर रोजी ओरीयन मॉल येथे पोहोचल्यानंतर गौरव सोबत आलेले सौरभ, प्रवीणा सावंत आणि अनोळखी इसम यांच्या ताब्यातील गाडीत दीपक बसला. यानंतर लबाडीने सोन्याचा हार घेऊन प्रवीणा सावंत व सौरभ गाडीतून खाली उतरले. यानंतर दीपकही त्याच्या कामानिमित्त निघून गेला. यानंतर दिपकने गौरव आणि प्रवीणा यांना सोन्याच्या हाराबाबत अनेकदा विचारपूस केली. मात्र, दिलेला हार खोटा असल्याचे बोलून सोन्याचा हार परत देखील केलाच नाही. याबाबत पनवेल ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.




# कुणबी समाजाचे तहसीलदारांना निवेदन

**। आगरदांडा । प्रतिनिधी ।**

मराठा समाजाच्या ओबीसीकरणासाठी त्यांच्या सगेसोयऱ्यांना कुणबी जातीचे प्रमाणपत्र देण्याची अधिसूचना अंतिम करण्याच्या शासनाच्या निर्णयाविरोधात मुरुड तालुका कुणबी समाजोन्नती संघ मुंबईच्यावतीने राज्य सरकारच्या विरोधात मुरुड तहसीलदार कार्यालयात निवेदन देण्याकरिता आले होते. यावेळी सगे सोयरे अधिसूचना रद्द करा. मराठ्यांना कुणबी दाखाले देऊ नका, जातनिहाय जनगणना झालीच पाहिजे, अशा घोषणा देण्यात आल्या.

यावेळी मुरुड पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक उदय झावरे, उपपोलिस निरीक्षक अविनाश पाटील, पोलिस उपनिरीक्षक दिपक राऊळ, किशोर बठारे, पोलिस उपनिरीक्षक बळीराम केद्रे आदिंसह पोलीस कर्मचारी घटनास्थळी येऊन भेट घेतली. यावेळी पाच प्रमुखांनी तहसीलदार यांच्या दालनात जाऊन मुरुड नायब तहसीलदार संजय तवर यांच्याकडे निवेदन देण्यात आले.

यावेळी कुणबी समाज अध्यक्ष किरण डिके, उपाध्यक्ष अशोक बामुगडे, सचिव भावेश भुवड, सल्लागार हरिश्चंद्र पाटील, खजिनदार महेंद्र कदम, नवगाव अध्यक्ष निलेश खामकर, नितिन भुवड, मधुकर भुवड, नथुराम भेकरे, रामदास पानगळे, संदेश मोहिते, परशुराम कावणकर, संतोष सावंत आदींसह कोणबी समाजांचे पदाधिकारी उपस्थित होते.

# तहसिल कार्यालयाची इमारत धोकादायक

**। श्रीवर्धन । वार्ताहर ।**

श्रीवर्धन बाजार पेठेतील तहसिल कार्यालय नव्या प्रशासकीय भवनात स्थलांतरित झाल्याला सुमारे सात ते आठ वर्षे झाली आहेत. परंतु, तहसिल कार्यालयाची ही जुनी इमारत अत्यंत धोकादायक झालेली असून मोडकळीस आलेली आहे. परंतु, इतक्या वर्षात ही इमारत जमिनदोस्त करण्यात आलेली नाही. या इमारतीच्या जिन्यासह एकेक भाग हळूहळू कोसळू लागला आहे. तसेच, या जागेच्या समोरच पंचायत समिती कार्यालय असल्यामुळे तेथे तालुक्यातील नागरिकांचा सतत राबता असतो. यामुळे कधीतरी तहसिलची जुनी इमारत अचानक कोसळून एखादा मोठा अपघात होण्याची दाट शक्यता वर्तविण्यात येत आहे. ही गंभीर बाब कृषीवलच्या माध्यमातून अनेकदा प्रसिद्ध करून याचे गांभीर्य दर्शविले होते.



# माथेरान प्रवेशद्वारावरच कचऱ्याचे ढीग

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

माथेरान शहरात येणारा पर्यटक हा दस्तुरी नाका येथे स्वतःच्या वाहनाने किंवा प्रवासी वाहनाने येत असतो. यामुळे दस्तूरी परिसराला माथेरानचे प्रवेशद्वार समजले जाते. मात्र, याच प्रवेशद्वारावर कचऱ्याचे ढीग आढळून येत असून जागोजागी पडून राहिलेला कचरा पाहिला की या भागातील कचरा उचलण्यासाठी नेमलेले तीन कर्मचारी काय करतात, असा प्रश्न निर्माण झाला आहे.




माथेरान शहराचे प्रवेशद्वार असलेल्या दस्तुरी नाका येथे वाहनतळ आहे. खासगी वाहनाने त्या ठिकाणी येणारा प्रत्येक पर्यटक हा आपले वाहन येथे पार्क करून माथेरान शहरात जात असतो. तर, नेरळ-माथेरान प्रवासी वाहतूक करणाऱ्या टॅक्सीमधून येणारा पर्यटक देखील याच दस्तूरी नाका येथे उतरून माथेरान शहरात जात असतो. याच ठिकाणी माथेरान पालिकेने प्रवासी आणि स्वच्छता कर संकलन केंद्र उभारले असून प्रती व्यक्ती ५० रुपये कर पालिका आकारते. तर, वाहनांसाठी कर हे वन विभाग आकारत असत्ते. यामुळे पालिकेच्या माध्यमातून हा परिसर स्वच्छ व कचरा मुक्त दिसावा, असा प्रयत्न असतो. म्हणून माथेरान नगरपरिषदकडून तीन सफाई कर्मचारी हे दस्तुरी ते अमन लॉज स्थानक या भागातील कचरा संकलन कामासाठी नेमले आहेत.

असे असूनही वाहनतळ परिसरात मोठ्या प्रमाणात कचरा आढळून येत आहे. याबद्दल माथेरान वन व्यवस्थापन समितीचे माजी अध्यक्षांनी पालिकेकडे तक्रार केली असून पर्यटकांवर माथेरान मधील उद्योग व्यवसाय सुरू आहेत. परंतु, शहराच्या प्रवेशद्वारावर कचरा आढळून येत असेल पर्यटक देखील नाराजी व्यक्त करू लागले आहेत. याचवेळी स्वच्छ आणि सुंदर शहर अशी बिरुदावली घेऊन मिरवणाऱ्या माथेरान नगरपरिषदेकडून माथेरान स्वच्छ ठेवण्यावर कोणत्याही प्रकारची कार्यवाही होत नसल्याने पर्यटक नाराजी व्यक्त करतात. यात पालिकेचे तीन कर्मचारी कायम स्वरूपी तैनात असताना कचरा साठून राहतोच कसा, असा प्रश्न देखील उपस्थित केला जात आहे.

## चिल्हे येथे पालखी सोहळा संपन्न

# धाक्सुद महाराज ग्रामस्थांचे श्रद्धास्थान

**। कोलाड । वार्ताहर ।**

रायगड रोहा तालुक्यातील चिल्हे येथील ग्रामस्थांचे श्रद्धास्थान आराध्यग्रामदैवत धाक्सुद महाराज यांचा नवरात्रोत्सव धावीर महाराज यांच्या प्रमाणेच साजरा केला जातो. नवरात्रीचे नऊ दिवस येथील ग्रामस्थ व धाक्सुद क्रीडा मंडळाचे युवक विविध कार्यक्रम व उपक्रम करत दसराउत्सव साजरा करत असतात.

यावेळी अकराव्या दिवशी श्री धावीर महाराज यांच्या पालखी सोहळ्याबरोबरच धाक्सुद देवाचा पालखी सोहळा येथील ग्रामस्थांनी साजरा केला. रविवारी (दि.१३) धाक्सुद महाराज यांच्या पालखीवर फुलांची उधळण करत तसेच फटाक्यांची आतषबाजीत लेझीम पथक, फुगडी, नाच गाणे, धार्मिक तथा आध्यत्मिक संत महातम्यांच्या अभंगाने नामघोष करत पालखी सोहळा आनंदात साजरा करण्यात आला.



या उत्सवानिमित्त मंदिर व संपूर्ण गाव परिसर विविध रंगी फुलांच्या सजावटीने, रोषणाई व सडा रांगोळ्यांनी सजविण्यात आले होते. दुपारी तीन वाजता गोंधळ्यांच्या पारंपरिक वाद्याने ग्रामदैवताची महाआरती करत धाक्सुद महाराजांचा जयघोष करत पालखी पारंपारिक टाळ मृदुंग व वाद्यांच्या गजरात मंदिरातून गावात मार्गस्त झाली. आराध्य ग्राम दैवतेची पालखी गावातील प्रत्येकाच्या दारात जाऊन दर्शन देत रात्री नऊ वाजता मंदीरात परतली. या उत्साही वातावरणात नवरात्रोत्सव, विजयादशमी व दसरा उत्सव सोहळ्यात नारायण नागोरगोजे यांनी कीर्तन रुपी सेवा दिली.

> **गावचे ग्राम दैवत धाक्सुद महाराज यांचा नवरात्रोत्सव हा रोह्याचे आराध्यदैवत धावीर महाराज यांच्या प्रमाणेच साजरा केला जातो. नऊ दिवस युवक विविध खेळ व उपक्रम करत आनंद लुटतात. नवरात्र उत्सवात जागर पहारा करत नवमीला महापूजा, दहाव्या दिवशी दसराउत्सव व अकराव्या दिवशी श्री धावीर महाराज यांच्या पालखी बरोबरच या देवाची पालखी संपूर्ण गावात फिरून सहकुटुंब सह परिवारात दर्शन घडते.**
> **– धनाजी लोखंडे, माजी सरपंच**

# झेपत नसेल तर सोडा

आमचे चोवीस तास काम करणारे मुख्यमंत्री व अतिहुशार व भलतेच कार्यक्षम गृहमंत्री देवेंद्र फडणवीस हे लाडकी बहीणच्या कार्यक्रमांमध्ये अडकल्यामुळे बहुदा राज्यातील खूनबाजीसारख्या 'छोट्या-मोठ्या' घटना वाढत चालल्या असाव्यात. बाबा सिध्दिकी यांची हत्या हे त्याचे ताजे उदाहरण होय. सिध्दिकी यांनी अलिकडेच काँग्रेसमधून अजितदादांच्या राष्ट्रवादीमध्ये प्रवेश केला होता. त्यांचा मुलगा झिशान सिध्दिकी हा वांद्रे पूर्वचा आमदार आहे. खुद्द सिध्दिकी हे तीन वेळा आमदार व मंत्री होते. त्यांच्यावर भर रस्त्यात आणि पोलिस स्टेशनपासून जवळच गोळीबार झाला. संशयित आरोपी अनेक दिवसांपासून सिध्दिकी यांच्यावर पाळत ठेवून होते. हे आरोपी खुनाची सुपारी मिळालेले किरकोळ तरुण आहेत. त्यांना जेमतेम लाख दीड लाख रुपये मिळणार होते असे म्हणतात. सामान्य माणसाची तर सोडाच पण सत्ताधारी माणसाच्या जिवाची किंमत ही इतकीच उरली आहे. मुंबई हे सुमारे दोन कोटी लोकसंख्येचे शहर झाले आहे. येथे कोण कोठून येतो याच्यावर नियंत्रण वा लक्ष ठेवणे हे कठीण आहे हे खरे आहे. हे तरुण उत्तर प्रदेशातील आहेत. भंगार गोळा करणे वगैरे उद्योग ते करीत होते. यातल्या एकाने आपल्या सोशल मिडियातील पोस्टमध्ये आपण गँगस्टर आहोत असे अभिमानाने सांगितले आहे. विशेष म्हणजे त्याचे शंभर-दोनशे फॉलोअरही आहेत. अशाच बेकार आणि भरकटलेल्या तरुणांना हाताशी धरून टोळीचे सूत्रधार पूर्वापार आपले उद्योग करीत आले आहेत. अलिकडच्या काळात उघड टोळीयुध्दे वा खंडणीच्या धमक्या कमी झाल्या आहेत. याचा अर्थ हे सर्व बंद झाले आहे असे नाही. शक्यतो खूनखराबा होऊ दिला जात नाही. अनेकदा गुन्हेगारी टोळीवाल्यांनाच भागीदारी दिली जाते. यातून वरवरची शांतता निर्माण केली जाते सिध्दिकी यांच्या हत्येसारख्या घटनांमुळे ही शांतता किती फसवी किंवा बोगस आहे हे लक्षात येते.

### साबरमतीचा बिश्नोई

गुन्हेगारी टोळ्या आता पडद्याआडून व लोकांच्या नजरेस येणार नाही अशा रीतीने काम करतात. मुंबईत जी हजारो बांधकामे सध्या चालू आहेत तेथे आजही खंडणी वसूल केली जाते. पोलिसांनाही याची कल्पना असते. काही ठिकाणी खुद्द पोलिसच मांडवली करण्यात सामील असतात. या हत्येची जबाबदारी लॉरेन्स बिश्नोई गँगने घेतल्याची एक पोस्ट व्हायरल झाली आहे. ती किती खरी याचा तपास चालू आहे. या गँगचा प्रमुख लॉरेन्स हा सध्या गुजरातच्या साबरमती तुरुंगात आहे. तेथे राहूनही तो देशभर खंडण्या आणि खूनबाजी कशी करू शकतो हा खरा प्रश्न आहे. साबरमती हे देशाचे गृहमंत्री अमित शाह यांच्या मतदारसंघात येते. विरोधकांना खोट्या आरोपांमध्ये अडकवून त्यांचा छळ करण्याबद्दल शाह यांच्या अखत्यारीतील इडी व सीबीआय या यंत्रणा कुख्यात झाल्या आहेत. आता बिश्नोईसारख्या टोळीवाल्यांनाही मुक्त हैदोसाला वाव दिला आहे काय असा प्रश्न या निमित्ताने उपस्थित होईल. विरोधकांनी या घटनेबद्दल देवेंद्र फडणवीस यांच्या राजीनाम्याची मागणी केली आहे. ती रास्त आहे. मात्र या हत्येमागे बिश्नोई टोळी असल्याचे निष्पन्न झालेच तर अमित शाह यांना देखील विरोधकांनी जाब विचारायला हवा. बिश्नोई टोळीवाले गेले काही दिवसांपासून मुंबईत घुसू पाहत आहेत. १४ एप्रिलला त्यांनी सलमान खानच्या घराबाहेर गोळीबार केला होता. हा नुसता इशारा आहे असे पत्रक नंतर प्रसिध्द केले होते. या प्रकरणात अटक करण्यात आलेला अनुज थापन याने तुरुंगात गळफास लावून आत्महत्या केली होती. हा सर्वच प्रकार संशयास्पद आहे. सलमानविरुध्द राजस्थानात काळविटांची शिकार केल्याचे एक प्रकरण प्रलंबित आहे. ही शिकार म्हणजे बिश्नोई समाजाच्या भावनांचा अपमान असल्याचे सांगून त्याला लक्ष्य बनवण्यात येत आहे. मात्र याच्या आडून मुंबईत आणि बॉलिवूडमध्ये दहशत निर्माण करण्याचा हा प्रकार आहे असे पोलिसांचे म्हणणे आहे.

### राजकारणापायी बट्ट्याबोळ

या टोळीने पंजाब, दिल्ली, राजस्थानात हैदोस घातला आहे. गायक मूसेवाला, कर्णी सेनेचा प्रमुख अशांच्या हत्या केल्या आहेत. योगी आदित्यनाथांच्या हिंदुत्ववादी राज्यात इतका काही जबर विकास झाला आहे की तिथली बेकार पोरे सहज या टोळीसाठी काम करायला तयार होत आहेत. पण त्यांना रोखण्यासाठी आमच्या फडणवीसांचे पोलिस काही करीत आहेत की नाहीत हा खरा प्रश्न आहे. या प्रकरणात बिश्नोई टोळीचा खरोखरच हात असेल तर एप्रिलमधल्या गोळीबारानंतर तिच्यावर पोलिसांना लक्ष का ठेवले नव्हते? दुसरीकडे समजा हा प्रकार झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पाच्या भानगडीतून झाला असेल तर तिचीही माहिती पोलिसांना आधीपासून असलीच पाहिजे. सिध्दिकी यांनी पोलिस संरक्षणाची मागणी केली नव्हती असे म्हणून सरकारला यातून आपली सुटका करून घेता येणार नाही. अर्थात, ज्या फडणवीसांच्या राज्यात पुण्यासारख्या मध्यमवर्गीय शहरात भर दिवसा कोयते नाचवत येऊन लोकांच्या सर्रास हत्या होतात ते मुंबईतील खुनांची खंत बाळगतील असे समजणे जरा धाडसाचेच आहे. फेब्रुवारीमध्ये त्यांच्याच पक्षाच्या गणपत गायकवाड या आमदाराने कल्याणला भर पोलिस ठाण्यात शिंदे गटाच्या महेश गायकवाड यांच्यावर गोळीबार केला. त्याहीवेळी त्यांना सांभाळून घेण्याचा प्रयत्न झाला. त्याच महिन्यात बोरीवलीला अभिषेक घोसाळकरांची हत्या झाली तेव्हा राज्यात कुत्रे मेले तरी विरोधक माझा राजीनामा मागतील असे उद्दाम उद्गार या राज्याच्या गृहमंत्र्यांनी काढले होते. बदलापूर अत्याचार प्रकरणातील शाळा व्यवस्थापक किंवा मालवण पुतळ्याचा शिल्पकार हे बराच काळ फरारी राहून आपल्या सोईने नंतर आरामात पोलिसांपुढे हजर झाले होते. हे दोन्ही आरोपी संघ परिवाराशी संबंधित आहेत. तसे ते नसते व त्यातला एखादाही समजा मुस्लिम असता तर फडणवीसांनी मोठा रुद्रावतार धारण केला असता. आता कुठे गेले ते फडणवीस, असा प्रश्न विचारावा लागेल. विरोधी पक्ष फोडणे आणि ठाकरे-पवारांवर टीका करणे इत्यादी कार्यभारामुळे सवड होत नसेल तर फडणवीसांनी आपले गृहमंत्रिपद सोडलेलेच बरे.

विचार

# 'उत्क्रांती'वाद्यांचा सन्मान

***कृत्रिम न्यूरॉन्सवर आधारित मशीन लर्निंगशी संबंधित नवीन तंत्र विकसित केल्याबद्दल जेफ्री ई. हिंटन आणि अमेरिकन शास्त्रज्ञ जॉन जे. होपफिल्ड यांना यंदाचे भौतिकशास्त्रातले नोबेल घोषित झाले. व्हिक्टर अ‍ॅम्ब्रोस आणि गॅरी रुवकुन यांना 'मायक्रो आरएनए' च्या शोधासाठी यंदाचे वैद्यकशास्त्रातील नोबेल पारितोषिक जाहीर करण्यात आले. त्यांच्या संशोधनाचा आणि कारकिर्दीचा हा परिचय.***



ऑक्टोबर महिना उजाडला, की एक आठवडाभर नोबेल पुरस्कारांची घोषणा होत असते. हे पुरस्कार कुणाला मिळतात आणि कुणाच्या संशोधनावर या पुरस्कारांची मोहोर उमटते, याकडे जगाचे लक्ष लागलेले असते. यंदाचे वैद्यकशास्त्र आणि भौतिकशास्त्राचे नोबेल पुरस्कार जाहीर झाले आहेत. 'एआय'चे गॉडफादर म्हणून ओळखले जाणारे जेफ्री ई. हिंटन आणि अमेरिकन शास्त्रज्ञ जॉन जे. होपफिल्ड यांना यंदाचे भौतिकशास्त्रातले पुरस्कार घोषित झाले. कृत्रिम न्यूरॉन्सवर आधारित मशीन लर्निंगशी संबंधित नवीन तंत्र विकसित केल्याबद्दल त्यांना हा सन्मान देण्यात आला. हॉपफिल्ड आणि हिंटन यांना त्यांच्या 'मूलभूत शोधांसाठी' हा पुरस्कार देण्यात आला आहे. हे असे शोध आहेत, जे कृत्रिम 'न्यूरल नेटवर्क'सह मशीन शिक्षण सक्षम करतात. संगणक विचार करू शकत नसले, तरी यंत्रे आता स्मृती आणि शिकणे यासारख्या कार्यांचे अनुकरण करू शकतात. हिंटन हे ब्रिटिश-कॅनेडियन संगणक शास्त्रज्ञ आणि संज्ञानात्मक मानसशास्त्रज्ञ आहेत. ते कृत्रिम 'न्यूरल नेटवर्क'वरील त्यांच्या कार्यासाठी प्रसिद्ध आहेत. यामुळे त्यांना 'गॉडफादर ऑफ एआय' ही पदवी मिळाली आहे. डेटामधील गुणधर्म आपोआप शोधू शकतील, अशा पद्धतीचा शोध लावल्याबद्दल त्यांना नोबेल पारितोषिक मिळाले. या संशोधनामुळे प्रतिमांमधील विशिष्ट घटक ओळखले जाऊ शकतात. हिंटन यांचे शिक्षण लंडन येथील क्लिफ्टन कॉलेज, ब्रिस्टल आणि किंग्ज कॉलेज, केंब्रिज येथे झाले. नैसर्गिक विज्ञान, कला इतिहास आणि तत्त्वज्ञान यासारख्या विविध विषयांमध्ये पदव्या घेतल्यानंतर त्यांनी १९७० मध्ये प्रायोगिक मानसशास्त्रात कला शाखेची पदवी मिळवली.

ससेक्स विद्यापीठात आणि ब्रिटनमध्ये निधी मिळवण्यात अडचणी आल्यावर हिंटन यांनी कॅलिफोर्निया विद्यापीठ, सॅन दिएगो आणि कार्नेगी मेलॉन विद्यापीठात काम केले. लंडन येथील युनिव्हर्सिटी कॉलेजमधील 'गॅटस्बी चॅरिटेबल फाउंडेशन कॉम्प्युटेशनल न्यूरोसायन्स युनिट'चे ते संस्थापक संचालक होते. २०१३ ते २०२३ दरम्यान हिंटन यांनी 'गूगल' आणि टोरंटो विद्यापीठासाठी काम केले. मे २०२३ मध्ये त्यांनी 'गूगल'चा राजीनामा देण्याची घोषणा केली. राजीनामा देताना त्यांनी 'आर्टिफिशियल इंटेलिजन्स' (एआय) तंत्रज्ञानाच्या धोक्यांबाबत चिंता व्यक्त केली. त्यांनी टोरंटोमधील वेक्टर संस्थेची सह-स्थापना केली आणि त्याचे मुख्य वैज्ञानिक सल्लागार बनले. ते सध्या टोरंटो विद्यापीठात संगणकशास्त्र विभागात प्राध्यापक आहेत. हिंटन यांना २०१८ मध्ये ट्युरिंग पुरस्कार मिळाला. या

**मधुरा कुलकर्णी**

पुरस्काराला योशुआ बेनगिओ आणि यान लॅकन यांच्या सखोल शिक्षणावरील कार्यासाठी 'संगणनाचे नोबेल पारितोषिक' म्हणून संबोधले जाते. त्याला कधी कधी 'गॉडफादर ऑफ डीप लर्निंग' म्हटले जाते. नोबेल पारितोषिक मिळाल्यानंतर हिंटन म्हणाले, की हा पुरस्कार मिळाल्याने मला आश्चर्य वाटले. 'एआय' तंत्रज्ञान शारीरिक ताकदीत लोकांना मागे टाकण्याऐवजी बौद्धिक क्षमतेत लोकांना मागे टाकणार आहे. हे तंत्रज्ञान आरोग्य सेवेसारख्या गोष्टींमध्ये क्रांती घडवून आणेल. त्यामुळे उत्पादनात मोठ्या प्रमाणात सुधारणा होईल; परंतु आम्हाला अनेक संभाव्य वाईट परिणामांची चिंता करावी लागेल. कारण या बाबी नियंत्रणाबाहेर जाण्याचा धोका असल्याचा इशारा त्यांनी दिला होता.

हिंटन आणि होपफिल्ड या दोन्ही शास्त्रज्ञांना 'एआय' आणि 'मशीन लर्निंग'शी संबंधित नवीन तंत्रज्ञानाच्या विकासासाठी हा पुरस्कार संयुक्तपणे देण्यात आला आहे. ही तंत्रे कृत्रिम न्यूरॉन्सवर आधारित आहेत. यामुळे आजच्या शक्तिशाली 'मशीन लर्निंग' तंत्राचा पाया घातला गेला आहे. सोप्या शब्दात सांगायचे तर त्यांनी भौतिकशास्त्राच्या मदतीने आर्टिफिशियल न्यूरल नेटवर्क प्रशिक्षित केले आहे, जेणेकरुन ते आपल्यासारखे विचार करू शकेल आणि शिकू शकेल. हे लक्षात घेण्यासारखे आहे की हॉपफिल्ड यांनी एक सहयोगी मेमरी तयार केली आहे, जी संगणक डेटामध्ये उपस्थित प्रतिमा आणि नमुने लक्षात ठेवण्यास आणि पुन्हा तयार करण्यात मदत करू शकते. हिंटन यांनी एक तंत्र विकसित केले आहे, जे डेटामधील गुणधर्म आपोआप ओळखू शकते. त्याचे तंत्र डेटामधील महत्त्वाची माहिती शोधण्यात मदत करते. प्रतिमांमधील विशिष्ट वस्तू ओळखण्यास हे तंत्रज्ञान मदत करू शकते. हे नेटवर्क मेंदूच्या कार्यपद्धतीने प्रेरित आहे. कृत्रिम 'न्यूरल नेटवर्क'मध्ये मेंदूच्या पेशी (न्यूरॉन्स) वेगवेगळ्या मूल्यांसह बिंदू (नोडस्) म्हणून दर्शवले जातात. हे बिंदू एकमेकांवर कनेक्शनद्वारे प्रभाव पाडतात. मेंदूच्या पेशी सायनॅप्सद्वारे जोडतात. नेटवर्क एकाच वेळी उच्च मूल्यांसह बिंदूंमधील मजबूत कनेक्शन विकसित करू शकते. हॉपफिल्ड यांनी एक नेटवर्क तयार केले आहे, ते पॅटर्न जतन करू शकते आणि ते पुन्हा तयार करू शकते. ते इमेजमधील पिक्सेलप्रमाणे नेटवर्कमधील नोड्सचा विचार करू शकतात.

हॉपफिल्ड नेटवर्क भौतिकशास्त्रावर आधारित आहे. ते अणूंमधील लहान चुंबकासारखे वागते. हिंटन यांच्या कार्याने आज 'मशीन लर्निंग'च्या जलद विकासात खूप मोठे योगदान दिले आहे. याच्या मदतीने यंत्रांना मानवी मेंदूप्रमाणे विचार करायला आणि समजून घ्यायला शिकवले जाते. शास्त्रज्ञांना आपल्या शोधाचा अभिमान असतो. तो असणे स्वाभावीक आहे; परंतु अणुबॉंबच्या संशोधकाला त्याचे दुष्परिणाम समजल्यानंतर झाला तसाच पश्चाताप आता 'एआय'च्या दुरुपयोगाच्या भीतीने हिंटन यांना होत आहे. 'एआय'मुळे मोठ्या प्रमाणात नोकऱ्या जाणार आहेत. चुकीची माहिती समाजात वेगाने पसरेल. ती थांबवणे शक्य होणार नाही. त्यांनी 'एआय'च्या धोक्यांबद्दल स्वतःला जबाबदार धरत खेद व्यक्त केला होता. नोबेल पारितोषिकाची घोषणा करताना समितीने म्हटले आहे, की या दोन्ही शास्त्रज्ञांनी जगाला नव्या पद्धतीने संगणक वापरायला शिकवले आहे.

व्हिक्टर अ‍ॅम्ब्रोस आणि गॅरी रुवकुन यांना यंदाचे वैद्यकशास्त्रातील नोबेल पारितोषिक जाहीर करण्यात आले. 'मायक्रो आरएनए' (रिबोन्यूक्लिक अ‍ॅसिड) च्या शोधासाठी त्यांना हे पारितोषिक देण्यात आले आहे. 'मायक्रो आरएनएचा शोध आणि लिप्यंतरणानंतर जीन अभिव्यक्ती नियंत्रित करण्यात त्यांची भूमिका' या संशोधनासाठी त्यांना या वर्षी वैद्यकशास्त्रातील नोबेल पारितोषिक देण्यात आले. 'मायक्रो आरएनए' हे जनुकांच्या क्रियाकलापांचे नियमन करण्यात महत्त्वाची भूमिका बजावते. आपल्या शरीरातील सर्व पेशींची जनुके सारखीच असली, तरी स्नायू आणि चेतापेशी यांसारख्या विविध प्रकारच्या पेशींची कार्ये वेगवेगळी असतात. जनुकांच्या नियमनामुळे हे शक्य होते. हे नियमन पेशींना फक्त त्यांना आवश्यक असलेल्या जनुकांना 'चालू' करण्यास अनुमती देते. अ‍ॅम्ब्रोस आणि रुवकुन यांच्या 'मायक्रो आरएनए'च्या शोधामुळे त्याचे नियमन करण्याचा एक नवीन मार्ग दिसून आला. नोबेल समितीने पुरस्काराची घोषणा करताना सांगितले की, त्यांचा शोध मानव कसा आहे हे समजून घेण्यासाठी महत्त्वपूर्ण आहे. आपल्या क्रोमोझोममध्ये साठवलेल्या माहितीची तुलना आपल्या शरीरातील सर्व पेशींसाठी निर्देश पुस्तिकेशी केली जाऊ शकते. प्रत्येक पेशीमध्ये गुणसूत्रांचा समान संच असतो. म्हणूनच प्रत्येक पेशीमध्ये तंतोतंत समान जनुके आणि सूचना असतात. एकूण संच समान असले, तरी स्नायू आणि मज्जातंतू पेशींसारख्या भिन्न पेशी प्रकारांमध्ये खूप भिन्न वैशिष्ट्ये आहेत.

अ‍ॅम्ब्रोस आणि रुवकुन या दोघांनाही वेगवेगळ्या पेशींचे प्रकार कसे विकसित होतात हे जाणून घेण्यात रस होता. त्यांच्या अभूतपूर्व शोधाने जगासमोर जनुक नियमनाचा एक पूर्णपणे नवीन सिद्धांत मांडला आहे, जो मानवाव्यतिरिक्त बहुपेशीय जीवांसाठी प्रभावी ठरेल. 'मायक्रो आरएनए' जीवांच्या विकासासाठी आणि कार्य करण्याच्या पद्धतीसाठी मूलभूतपणे महत्त्वपूर्ण असल्याचे सिद्ध होत आहे. अ‍ॅम्ब्रोस यांनी १९७९ मध्ये 'मॅसॅच्युसेट्स इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी' (एमआयटी)मधून पीएचडी प्राप्त केली. तिथे त्यांनी १९७९-१९८५ मध्ये पोस्टडॉक्टरल संशोधन केले. १९८५ पासून ते केंब्रिज येथिल हार्वर्ड युनिव्हर्सिटीमध्ये संशोधक आहेत. रुवकुन यांनी १९८२ मध्ये हार्वर्ड विद्यापीठातून पीएच. डी प्राप्त केली. ते मॅसॅच्युसेट्स इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी येथे पोस्टडॉक्टरल फेलो होते. ते जेनेटिक्सचे प्राध्यापक आहेत. अ‍ॅम्ब्रोस यांनी पोलिओव्हायरस जीनोमची रचना आणि प्रतिकृतीचा अभ्यास केला. त्यांच्या प्रयोगशाळेने सी. एलेगन्समध्ये लिन-४ जनुकापासून बनवलेले पहिले 'मायक्रो आरएनए' शोधून काढले. त्यामुळे उत्क्रांतीमधील 'मायक्रो आरएनए'च्या भूमिकेवर चालू असलेल्या संशोधनाला आकार देता आला.

आजकाल

# ज्येष्ठ पत्रकार जतीन देसाई यांना शांती सद्भाव पुरस्कार

गेल्या काही वर्षात भारतासह देशातील सामाजिक वातावरण बिघडविण्याचा प्रयत्न काही प्रवृत्ती करीत आहे. नफरतचा माहोल संपुष्टात आणून जगभरातील संभाव्य अणुयुद्धाचे सावट रोखण्यासाठी महात्मा गांधी यांच्या विचारांची गरज आहे. अहिंसेचा विचार आणि अखिल विश्वातील माणुसकी वृद्धींगत करणे यासाठी महात्मा गांधी यांच्या विचारांचा वारसा नव्या पिढीने पुढे नेण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करावे लागतील. यात प्रसारमाध्यमे, चित्रपट, साहित्य व कला क्षेत्राची भूमिका महत्वाची आहे. गांधीयन पत्रकारितेचा वारसा जोपासावा लागेल असे आवाहन ज्येष्ठ पत्रकार जतीन देसाई यांनी केले.

जगभर महात्मा गांधींचा विचार हा हिंसा रोखण्यासह अणुयुद्ध रोखण्यासाठी स्वीकारला जातो आहे भारतात मात्र शांती सदभाव रुजू नये, धर्माधर्मात हिंसा वादळे यावीत म्हणून संघाच्या मुशीत घडलेल्या गोडसे प्रवृत्तीच्या मूलतत्त्ववाद्यांचा गांधी विचारांना विरोध वाढत चालला आहे. यासाठी भारतात शांती सदभावाचा विचार प्रसार करुनच गांधींच्या विचाराचा द्वेष मोडून काढण्यासाठी नागरिकांनी प्रयत्न करण्याची गरज आहे. मानवतावादी गांधी विचार सर्व क्षेत्रातील माध्यमे, नाटक, सांस्कृतिक कलेच्या माध्यमातून तळापर्यंत नेणे आवश्यक आहे, असे आग्रही मांडणी ज्येष्ठ पत्रकार जतीन देसाई यांनी शांती सदभाव पुरस्काराच्या उत्तरादाखल केलेल्या भाषणात नुकतीच केली आहे.

सातारा जिल्हा महात्मा गांधी स्मारक समिती, पाचगणी पत्रकार संघ यांच्या संयुक्त विद्यमाने गांधी जयंतीला ०२ ऑक्टोबर २०२४ रोजी शांती सदभाव पुरस्कार चार दशकांची वैचारिक विश्वातील ज्येष्ठ पत्रकार जतीन देसाई यांना समारंभपूर्वक देण्यात आला. सन्मानचिन्ह, मानपत्र असे या पुरस्कार स्वरुप आहे. मॅप्रो उद्योग समूहाचे प्रमुख मयूर वोरा यांच्या हस्ते पाचगणी गिरीस्थान नगरपरिषदेच्या सभागृहात दिमाखदार सोहळा झाला. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक असलम तडसरकर यांनी केले. गांधी विचारांची आजच्या काळातील गरज याविषयी झालेल्या परिसंवादात मान्यवरांनी आपली मते मांडली.माझ्या गुजराती, मराठी व इंग्रजी पत्रकारितेत मी सातत्याने भारत पाक शांतता सुसंवाद या आंतरराष्टीय फोरमचा कार्यकर्ता म्हणून कार्यरत आहे. भारत व पाकिस्तान या दोन शेजारी देशातील मच्छिमारांच्या सुटकेसाठी सातत्याने कायदेशीर मार्गाचा प्रयत्न करण्यास संबंधित यंत्रणांना भाग पाडले. दोन राष्ट्राच्या वैरभावाची भिंती कमी करण्यासाठी दोन्ही बाजूंनी शांतता, सदभावाच्या प्रयत्नांची आवश्यकता आहे. आखाती राष्ट्रातील अशांत बलुचिस्तान, अफगानिस्तान, सिरीया या अनेक राष्ट्रांच्या बदलेली परिस्थिती पूर्ववत करण्याचा भाग म्हणून गांधीजी यांच्या विचारांची पेरणी व मांडणी करण्याचे काम पत्रकारितेतून करीत

**समीर मणियार**

आहे. हे काम गांधी विचाराच्या ऐक्य एकात्मतेचे काम आहे. दोन शेजारी राष्ट्रातील शांतता प्रेमींच्या जीवनासाठी या कार्याची नितांत गरज आहे. इस्त्रायल पॅलेस्टाईन, रशिया युक्रेन, अमेरिका, फ्रान्स, ब्रिटन, इराण इराक देशातील आंतरराष्टीय घडामोडीवर जतीन देसाई यांनी व्यासंगी अभ्यासपूर्ण विवेचन केले.

सातारा जिल्हा महात्मा गांधी स्मारक समितीने शांती सदभाव पुरस्कार देऊन या विचाराला मान्यता दिलेली आहे असे मी समजतो. भारतीय प्रसारमाध्यमातून गांधी विचार गायब करण्याचा काहींचा मनसुबा आहे. याबद्दल सुजाण लोकशाहीप्रेमी नागरिक, शिक्षण क्षेत्रातील सर्वच शिक्षक, विद्यार्थ्यांनी सतर्क राहून महात्मा गांधी हे मानवजातीच्या भल्यासाठी बहुआयामी भूमिका करीत जीवन जगले ते सतत समजावून घेण्याची गरज आहे. पत्रकारितेत महात्मा गांधी हे मोठे होते. नव्या पिढीतील पत्रकारांनी गांधीजींची हरिजन, नवयुग यामधील पत्रकारिता समजावून घेऊन घेण्याची आवश्यकता आहे. ती आजच्या काळाची गरज आहे असे जतीन देसाई यांनी आवर्जून सांगितले.

शतकभरापूर्वी महात्मा गांधी यांच्यासारखे व्यक्तीमत्व होऊन गेले यावर जगाचा विश्वास असणार नाही अशी भविष्यवाणी आइन्स्टाईन यांनी ने नमूद केले होते. तथापि, महात्मा गांधी, आचार्य विनोबा ही भारताच्या एकात्मतेची आदर्श व्यक्तिमत्व आहेत हा विचार आजही जगभर रुजतो आहे. जग गांधी विचाराच्या मार्गाने पुढे जाऊ पाहते आहे अशा वेळेला भारतात सर्व क्षेत्रात गांधी विचारांची साक्षरता रुजवण्याची गरज आहे. महात्मा गांधी स्मारक समिती गांधीजींच्या पाचगणीच्या वास्तव्याची दरवर्षी व आठवण करुन देत असते, असे उद्योजक मयूर वोरा यांनी स्पष्ट केले. स्वातंत्र्याच्या आंदोलनातील अनेक महत्त्वाचे निर्णय पाचगणी शहरातील वास्तव्यात राष्ट्रपिता महात्मा गांधी यांनी घेतले होते याचा इतिहास आहे. म्हणूनच बापूजींचे प्रार्थना स्थळ, कस्तुरबांच्या यांच्यावरील आरोग्य उपचाराचा दवाखाना ही सर्व पाचगणीची गांधी विचाराची केंद्रे झाली पाहिजेत यामध्ये सर्व समाजाने सहभागी होऊन गांधी विचार हाच शांती सदभावाचा विचार म्हणून अंगीकारला पाहिजे, त्यासाठी जतीन देसाई या ज्येष्ठ पत्रकाराच्या दीर्घ पत्रकारितेचा गांधी जयंतीदिनी गौरव होत आहे ही गोष्ट आनंददायी आहे, त्यांच्या ध्येयनिष्ठ मानवतावादी पत्रकारितेचा आदर्श इतरांनी घ्यावा, गांधीयन पत्रकारिता नव्या पिढीने करावी असे मत मयूर वोरा यांनी मांडले.

गेल्या दशकभरात देशातील सामाजिक सौहार्दाचे वातावरण बिघडविण्याचा प्रयत्न केंद्रातील सत्ताधारी पक्षाची मंडळी करीत असल्याचा आरोप ज्येष्ठ पत्रकार समीर मणियार यांनी परिसंवादात बोलताना केला. महात्मा गांधी यांची मानवतेच्या भल्यासाठी असलेल्या वैश्विक विचारांची मांडणी शतक साजरे करणाऱ्या संघाला अडचणीची आहे. विशिष्ट जातसमुदायासाठी नफरत पेरणाऱ्या मंडळीची मनसुबे कधीच यशस्वी होणार नाहीत. भारतीय संविधान आणि महापुरुषांच्या विचारांची वीण भारतीय समाजात रुजली आहे. यामुळे महात्मा गांधी यांच्या विचारांना संपुष्टात आणण्यासाठी गांधी यांची हत्या करणाऱ्या प्रवृत्तीचे बीज रुजणार नाही. गांधी विचार हे चिरंतन व शाश्वत आहेत याचे प्रबोधन करावे लागेल असे मणियार यांनी स्पष्ट केले.

समाजवादी प्रबोधिनीचे सरचिटणीस प्रसाद कुलकर्णी, विद्रोही सांस्कृतिक चळवळीचे नेते, डाव्या पुरोगामी विचारांचे खंदे पुरस्कर्ते सुबोध मोरे यांनी जगाला गांधी विचारांची आवश्यकता असल्याचे आग्रही प्रतिपादन करुन प्रतिगामी मूलतत्ववादी राजकारण व संघाच्या मनसुब्यावर काही उदाहरणे देत टीकेची झोड उठविली. पाचगणी शहरातील महात्मा गांधीजी व कस्तुरबा गांधी यांचे वास्तव आणि १९४२ ते १९४५ या काळातील त्यांचे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील भूमिका व लेखन पाहता पाचगणीत महात्मा गांधी आणि कस्तुरबा गांधी उचित स्मारक होण्याची आवश्यकता आहे असे सर्वच उपस्थितांनी सांगितले. ज्येष्ठ पत्रकार व माहिती अधिकार चळवळीतील बिनीचे कार्यकर्ते शिवाजीराव राऊत, डाव्या विचारांचे हाडाचे कार्यकर्ते असलम तडसरकर, ज्येष्ठ पत्रकार रवि बेलोसे, भारत पुरोहित, विक्रांत पवार, सचिन भिलारे, गणेश गोळे, अरुण शेळके, गणेश कदम, सईद कुरेशी, जालिंदर पाटील, गणेश कदम, राजेश भिलारे, सचिन ननावरे आदींनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मेहनत घेतली.

## मराठी साहित्यिक दिनविशेष

**१५ ऑक्टोबर**

**१९०६ :-** इतिहास, मानसशास्त्र आदी विषयांवर लेखन करणारे दत्तात्रय विवनाथ केतकर यांचा जन्म. 'आपली घडण' या ग्रंथातून वैयक्तिक जीवनाच्या सर्वांगीण विकासाची जडण घडण कषी होते याची मानसशास्त्रीय चर्चा तर 'इतिहासातील अंत:प्रवाह' मधून वरवर दिसणाऱ्या ऐतिहासिक घटनामागील आंतरिक शक्तीप्रवाहाचा धावता आढावा घेतला आहे. **१९०६ :-** लेखक प्रा. शंकर गणेष दवणे यांचा जन्म. 'जेजुरीचा खंडोबा','वेरुळचे कैलास लेणे' आणि 'साहित्य सम्राट न. ची. केळकर' यांचे चरित्र त्यांनी लिहिले. **१९२४ :-** लेखक, वर्तमानपत्रातून नाट्यविषयक लेखन आणि 'मौजा मराठी रंगभूमीच्या' हा कार्यक्रम सादर करणारे गोपाळ रामचंद्र जोशी यांचा जन्म. 'नावाचे मोठे' ह्या नाटकासह 'नाट्यपंढरी' हा मराठी रंगभूमीविषयक आठवणीवजा ग्रंथ त्यांच्या नावावर आहे. **१९२६:-** श्रमाला आणि संघर्षाला प्रतिष्ठा देणारी कविता लिहिणारे कविवर्य नारायण गंगाराम सुर्वे यांचा जन्म. 'ऐसा गा मी ब्रह्म', 'माझे विद्यापीठ', 'जाहीरनामा', 'सनद' हे त्यांचे गाजलेले काव्यसंग्रह. पद्मश्री, जन्मस्थान पुरस्कार, 'कबीर सन्मान' हे बहुमान त्यांना मिळालेच आणि अ. भा. मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपदही (१९९५, परभणी) प्राप्त झाले. 'डोंगरी शेत माझं गं, मी बेणू किती...' या लोकप्रिय गीताचे कवी सुर्वेच, पण गाणी त्यांनी फार लिहिली नाहीत. 'मर्ढेकर', 'तुमचेच नाव लिवा मास्तर','हा माझाही देश आणि त्यातील हे ओकेबोकेसे लोक', 'कामगार आहे मी तळपती तलवार आहे' अषा त्यांच्या अनेक कविता गाजल्या. सुर्वे यांचे गद्यलेखन हे मुख्यत: अनुवादित आहे. उदा. 'दादर पुलाखालची मुले', 'तीन गुंड व सात कथा' तसेच 'माणुस','कलावंत आणि समाज' हे वैचारिक व व्यक्ति चरित्रात्मक लेख आणि मुलाखती स्वरुपाचे पुस्तकासह सुर्वे आपल्या काव्यवाचनाच्या शैलीने महाराष्ट्रात गाजले. **१९३८:-** बालसाहित्यिका लता गोविंद काळे यांचा जन्म. ह्यांचा 'जमाडी-जम्मत' हा बालगीत संग्रह प्रसिध्द झाला आहे. **१९३९:-** विविध नियतकालिकातून व्यक्तिचित्रे, समीक्षा, काव्य, प्रवासवर्णने आदी स्वरुपाचे लेखन करणारे डॉ. गोविंद नारायण देशपांडे यांचा जन्म. वामन नारायण देशपांडे यांच्या साहित्यावर पीएच डी करणाऱ्या डॉ. देषपांडे यांनी 'आजचे साहित्य' (डॉ. प्रभुदेसाई गौरवग्रंथ) महाराष्ट्राचे वसंत वैभव (कै. वसंतराव नाईक)', 'स्मृतीधन' हा लोकनायक अणे यांच्या आठवजी वजा ग्रंथ' अशी साहित्य संपदा. **१९४४:-** दै. सकाळचे सर्वेसर्वो उद्योजक प्रतापराव पवार यांचा जन्म. शरद पवारांचे बंधू ही त्यांची आणखी एक ओळख. 'वाटचाल' या आत्मचरित्रातून त्यांच्या अनेक पैलूंचा उलगडा होतो. **१९५१:-** लेखक अरविंद पांडुरंग उतखेडे यांचा जन्म. ह्यांनी 'शांतता शाळा सुरु आहे' ही एकांकिका तसेच 'तुका म्हणे' हा अभंग विशेषांक, 'बळीचंद्र' हा काव्यसंग्रह, 'आकाशगंगा' हा प्रातिनिधिक काव्यसंग्रह आणि 'उपहार' हा स्मरणिका अशी साहित्य संपदा. **१९५१:-** लेखक अ‍ॅड. मोहन वसंतराव डो ंगरे यांचा जन्म. ह्यांच्या साहित्य संपदेत 'फौजदारी खटला', 'भाडेकरुंचा संरक्षक' असे कायदेविषयक ग्रंथ आहेत. **१९६१:-** लेखक गौतम विश्वनाथ दारुंडे यांचा जन्म. 'विष्वसुत', 'आक्रोश' हा काव्यसंग्रह. 'थोरांच्या स्मृतींना उजाळा' हे चरित्र आणि 'प्रतिबंध' हा चारोळी संग्रह अशी साहित्य संपदा प्रसिध्द. **२००२:-** 'लोकनाट्यकार', 'ग्रामीण कथेला विनोदी बाज देणारे कथाकार, नाटककार आणि पटकथालेखक वसंत सबनीस यांचे निधन. त्यांच्या 'विच्छा माझी पुरी करा', 'अदपाव सुतार...'आदी लोकनाट्यांनी मराठी रसिकांतला शहरी-ग्रामीण भेद मिटवला. 'गेला माधव कुणीकडे', 'सौजन्याची ऐशीतैशी', 'घरोघरी ही बोंब', 'कार्टी श्रीदेवी' ही त्यांची नाटके गाजली. याखेरीज कथासंग्रह, ललित लेखसंग्रह, बालकथा, बालनाटयेही त्यांनी लिहिली. **२०१३:-** ख्यातनाम चरित्रकार सविता भावे यांचे निधन. लो. टिळक, वालचंद हिराचंद, शंतनुराव किर्लोस्कर, विनोबा भावे इ. चरित्रे त्यांनी लिहिला. 'माणसातील माणूस' हे त्यांचे आत्मचरित्र प्रसिद्ध.

**- संजय वझरेकर**
**९७५५७६६७५**

### अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

**१५ ऑक्टोबर**

१) श्री. गोविंद दत्तात्रेय नाईक १५-१०-१९४२
२) श्री. सुधाकर जनार्धन म्हात्रे १५-१०-१९४५
३) श्री.(डॉ.) भालचंद्र किसन लोंढे बायपास रोड, अलिबाग, १४-१०-१९५१
४) श्री.हरिश्चंद्र शंकर मगर मु.पो. वेश्वी, १५-१०-१९५०
५) श्री.प्रभाकर गोविंद पाटील चेंढरे-अलिबाग, १५-१०-१९४४
६) श्री.(डॉ.) प्रमोद रामराव कुमठेकर श्रीबाग-२, अलिबाग १५-१०-१९५६


## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क- ८०५५३२५६७८ बीपीन राठवा)**
**९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**
**- मुख्य संपादक, कृषीवल**

**आजचे अन्नदाते**

**सुशीला नवीनचंद्र देढीया, मुंबई**


# पोषण अभियानात उल्लेखनीय कामगिरी

## ■ सलग तीन वर्ष रायगड जिल्हा राज्यात पहिल्या पाच क्रमांकात

**। रायगड । खास प्रतिनिधी देशातील कुपोषणावर नियंत्रण मिळविण्यासाठी सरकारतर्फे दरवर्षी सप्टेंबर महिन्यात पोषण महिना अभियान राबविण्यात येत आहे. रायगड जिल्हा परिषदेने या अभियानात उत्कृष्ट कामगिरी बजावली आहे. जिल्ह्यात या अभियानाला उत्तम लोकसहभाग मिळाल्याने मागील सलग तीन वर्ष रायगड जिल्हा राज्यात पहिल्या पाच क्रमांकामध्ये राहिला आहे.**



या कामगिरीबद्दल रविवारी (ता.१३) मुंबई मलबार हिल येथील सह्याद्री अतिथी गृह येथे रायगड जिल्हा परिषदेला पुरस्कार देऊन राज्याच्या महिला व बालविकास मंत्री अदिती तटकरे यांच्या हस्ते गौरविण्यात आले. जिल्हाधिकारी डॉ. किशन जावळे व जिल्हा परिषदेच्या महिला व बालकल्याण विभाग उपमुख्य कार्यकारी अधिकारी निर्मला कुचिक यांनी पुरस्कार स्वीकारला.

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भरत बास्टेवाड यांनी पोषण महिना अभियान यशस्वी होण्यासाठी योग्य नियोजन व मार्गदर्शन केल्याने हे यश प्राप्त झाले आहे.

माता आणि बालके सदृढ राहावीत यासाठी सरकारतर्फे विविध उपक्रम राबविले जातात. या उपक्रमांतर्गतच माता व बालकांना सशक्त करण्यासाठी पोषण महिना अभियान दरवर्षी सप्टेंबर महिन्यात राबविण्यात येते. या अभियानांतर्गत महिनाभरात रायगड जिल्हा परिषदेच्या माध्यमातून सर्व अंगणवाडी केंद्रात विविध उपक्रम राबविण्यात येतात. यामध्ये मातेला पोषक आहार व चांगली आरोग्यसेवा मिळण्यासाठी व त्यांचे योग्यपणे पोषण होण्यासोबतच कुपोषण दूर होण्यासाठीच्या विविध उपायांचा व उपक्रमांचा त्यात समावेश आहे.

तसेच या अभियानांतर्गत जिल्ह्यातील विद्यार्थ्यांना मध्यान्ह भोजन कालावधी दरम्यान हात स्वच्छ धुण्याचे महत्व पटवून देण्यात येते. तसेच गावांमध्ये प्रभातफेरी काढून आरोग्य व पोषण विषयक संदेशाचा प्रचार व प्रसार करण्यात आला. त्याचप्रमाणे अनेमिया मुक्त भारत कार्यक्रमाअंतर्गत नियुक्त केलेल्या शाळांच्या नोडल अधिकाऱ्यांच्या मदतीने पोषण माहमध्ये नियमितरीत्या शाळेतील मुलांना मध्यान्ह भोजन दरम्यान लोहयुक्त गोळ्यांचे वाटप व सेवन होईल या पद्धतीने काटेकोर नियोजन करण्यात येत आहे.

प्राथमिक आरोग्य केंद्रांच्या माध्यमातून जिल्हा परिषद शाळांमध्ये पोषण माह कालावधी दरम्यान एक टी-३ कॅम्पचे आयोजन करून विद्यार्थ्यांची हिमोग्लोबिनची तपासणी करण्यात येते. तसेच पोषण माहमध्ये एएनएम आणि आशा स्वयसेविका यांनी गृहभेटी देऊन जनजागृती करण्यात आली. पोषण महिना कालावधीमध्ये अंगणवाडी स्तरावर एक समुदाय आधारित कार्यक्रम, ग्राम आरोग्य स्वच्छता पोषण दिवस व बालक संगोपन आधारित पालक मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. त्याचप्रमाणे आरोग्य विभागाच्या समन्वयाने पोषण माह कालावधीमध्ये सॅम बालकांच्या व्यवस्थापणासाठी अंगणवाडी स्तरावर ग्राम बाल विकास केंद्राचे आयोजन करण्यात आले. या सर्व उपक्रमात लोकसहभाग घेण्यात आला.

पोषण महा अंतर्गत जिल्ह्यातील ३ हजार १२३ अंगणवाड्यांमध्ये राबविण्यात आलेल्या उपक्रमांमध्ये मोठ्या प्रमाणात लोकसहभाग मिळाला. त्यामुळे मागील तीन वर्ष रायगड जिल्हा राज्यात प्रथम पाच क्रमांकामध्ये राहिला आहे. २०२२ मध्ये द्वितीय, २०२३ मध्ये तृतीय तर २०२४ मध्ये रायगड जिल्ह्याने चतुर्थ क्रमांक पटकाविला. या तीनही वर्षांचा पुरस्कार वितरण सोहळा रविवारी पार पडला. यावेळी राज्याच्या महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांच्या हस्ते महिला व बालविकास विभाग सचिव डॉ.अनुपकुमार यादव, एकात्मिक बालविकास सेवा योजना आयुक्त कैलास पगारे यांच्या उपस्थितीत रायगड जिल्हा परिषदेला गौरविण्यात आले. जिल्हाधिकारी डॉ. किशन जावळे व जिल्हा परिषदेच्या महिला व बालकल्याण विभाग उपमुख्य कार्यकारी अधिकारी निर्मला कुचिक यांनी पुरस्कार स्वीकारला. पनवेल बालविकास प्रकल्प अधिकारी प्रविण पाटील, उरण बालविकास प्रकल्प अधिकारी स्नेहा चव्हाण उपस्थित होते.

# परतीच्या पावसाने मुरूडला झोडपले

**। मुरूड । वार्ताहर ।**

रविवारी सायंकाळी उशिरा विजेच्या प्रचंड कडकडाटासह आलेल्या परतीच्या पावसाने मुरूड परिसराला झोडपून काढले. त्यामुळे नागरिकांची प्रचंड तारांबळ उडाली. विद्युत पुरवठा खंडित झाल्याने परिसर अंधारात बुडून गेला. नवरात्रोत्सव संपल्याने रविवार मोकळा वार होता. त्यामुळे सायंकाळी बाजारहाट करण्यासाठी बाजार पेठमध्ये मोठी वर्दळ होती.



सायंकाळी उशिरा सुरू झालेल्या पावसाने नागरिक भयभीत झाले. सायंकाळी साडेसात वाजल्यानंतर पाऊस सुरू झाला. रात्री साडेआठपर्यंत पाऊस सुरूच होता. खंडित झालेला वीज पुरवठा पाऊस थांबल्याने रात्री पूर्ववत सुरू झाला. पावसामुळे तयार झालेल्या भात शेतीस धोका निर्माण झाल्याचे शेतकरी बांधवानी सांगितले.

मुसळधार पावसामुळे मुरुड शहरात अनेक मार्गावर पाण्याचे ओहोळ वाहत होते. सर्वत्र पाणीच पाणी झाले होते. विद्युत पुरवठा खंडित झाल्याने मुरूड तालुका दोन तास अंधारात बुडाला होता.

# जरांगेच्या उपोषणाला बळी पडू नये

## ■ म्हसळा तालुका कुणबी समाजाचा तीव्र विरोध

**। म्हसळा । वार्ताहर।**

२६ जानेवारी २०२४ रोजी जातींचे प्रमाणपत्र देण्याचे व त्यांच्या पडताळणीचे विनियमन नियम २०१२ यात सुधारणा करणारी अधिसूचना काढू नये, असे निवदेन कोकणातील कुणबी व अन्य ओबीसी यांनी तहसीलदार सचिन खाडे यांना दिले.

१६ फेब्रुवारी २०२४ पर्यंत हरकती मागविण्यात येऊन सुमारे १० लाखापेक्षा अधिक हरकती नोंदविल्या गेल्या होत्या. सगेसोयरे अधिसूचनेच्या मसुद्याला अनुसरून तयार केलेला कृती अहवाल प्रसिद्ध व्हावा, गणगोत, सगे सोयरे असे ढोबळ शब्द कायद्यात बसविणे हे बेकायदेशीर, अयोग्य आणि अन्यायकरक ठरेल, वरील सर्व वर्गांसाठी मूळ नियम २०१२ मध्ये कोणतीही सुधारणा किंवा जोड फक्त एकाच जातीला नजरेसम ोर ठेऊन करता येणार नाही, यापूर्वी दाखले देताना नियमांमध्ये स्वतंत्र व विशेष सुधारणा केलेली नाही. तर सरसकट मराठ्यांना कुणबी जातींचे प्रमाणपत्र देण्याचा मार्ग सुकर होईल.



सगेसोयरे अधिसूचनेच्या मसुद्याला मुंबई उच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले आहे, यापूर्वीच शासनाने स्वतंत्र कायदा करून म्हणून १०% स्वतंत्र आरक्षण दिलेले आहे. या सर्व गोष्टींचा विचार करावा, असे निवेदनात नमुद केले आहे. याप्रसंगी तालुका उपाअध्यक्ष लहुजी तुरे, सरचिटणीस राजाराम तिलटकर , उपाध्यक्ष धोंडू चव्हाण, महिला अध्यक्षा मिना टिंगरे, विभाग अध्यक्षा मंदीनी धाडवे, प्रगती धोकटे, प्रभाकर बोले, महेश पवार, प्रमोद घोलप, हर्षद जाधव, मंगेश मुंडे, सुनील शेडगे, संदीप चाचले, अल्पेश अगबुल, राजेंद्र भोगल, अर्प्रिता पवार, प्रिति घोलप, दिपेश जाधव, सौजन्य पोटले, तनुजा चव्हाण, ज्योती कासरुंग, शंकर घोलप, दिलीप कोंबनाक आदी मान्यवर उपस्थित होते.

दरम्यान, सदरचे निवेदेन तहसिदार यांनी सरकारला पाठवावे अशी विनंती उपस्थितांनी केली.

# फातिमा मातेची ८९ वी तीर्थयात्रा उत्साहात

## ■ हजारो भाविकांनी घेतले दर्शन

**। कर्जत । वार्ताहर ।**

तालुक्यातील ख्रिश्चन धर्मियांचे प्रार्थना मंदिर (चर्च) गेल्या काही दशकांपासून फातिमा माऊलीच्या नावाने प्रसिद्ध आहे. प्रत्येक वर्षी १३ ऑक्टोबर किंवा त्यानंतर येणाऱ्या रविवारी या मातेची तीर्थयात्रा असते. यंदा १३ तारीख रविवारी आल्याने ८९ वी फातिमा मातेची तीर्थयात्रा उत्साहात संपन्न झाली. देश विदेशांतून आलेल्या भाविकांनी मातेचे दर्शन घेतले. तसेच अन्य धर्मियांनी देखील उपस्थिती दर्शवून दर्शन घेतले. कर्जत रेल्वे स्थानकानजीक असलेल्या चर्चच्या परिसरात अक्षरशः जत्रेचे स्वरूप आले होते. सकाळी फातिमा मातेच्या पुतळ्याचे पूजन करण्यात आले. चर्चचे प्रमुख फादर जॉय डिसिल्वा यांच्या उपस्थितीत फादर नेईल दोस संतोस यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. बँड पथकाच्या तालावर फातिमा मातेची मिरवणूक काढण्यात आली. या वेळी ख्रिश्चन धर्मियांबरोबरच अन्य धर्मीय भाविकांनीही जागोजागी मातेच्या पुतळ्यावर फुलांचा वर्षाव केला.



त्यानंतर व्यासपीठावर दीप प्रज्वलित करून एका विशेष समारंभाचे उद्घाटन करण्यात आले. फादरजॉयडिसिल्वायांनीउपस्थितांचे स्वागत करून प्रास्ताविकात चर्चची महती सांगितली. त्यानंतर प्रमुख व्याख्याते नेईल डोस संतोस यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करताना, मारिया सर्वसामान्य व्यक्ती होती, देवाने निवडलेली व्यक्ती होती. करुणायुक्त हृदय, धैर्यवान, वचनबद्ध व्यक्ती होती. तिच्या जीवनाचे महत्व आपण जाणून घेतल्यास आपल्या मध्ये नक्की आध्यत्मिक परिवर्तन शक्य आहे, असे स्पष्ट केले. दिवसभरात अन्य समाजाच्या भाविकांनी फातिमा मातेचे मनोभावे दर्शन घेतले. दुपारी आरोग्य दान प्रार्थना, ख्रिश्त शरीर आराधना व प्रार्थना केली. या यात्रेसाठी सकाळपासूनच आदिवासींनी काकड्या, आळकुंड्या, टरबूज, चिंभोऱ्या आदी तसेच ग्रामीण भागात पिकणाऱ्या भाज्या आणल्याने मुंबईकर ख्रिश्चन बांधवांनी ते घेण्यासाठी गर्दी केली होती. यावेळी सिल्व्हर फ्रान्सिस, पॉल फ्रान्सिस, ॲड. सनी डिमेलो, विल्सन पानपाटील, विक्टर मास्करेन्स, जेम्स जेकब, पेन्सर, नेल्सन फ्रांसिस, सुरेंद्र अंची, फ्रान्सिस जेनिफर, शाविओ फ्रान्सिस, जेनिफर फ्रान्सिस, संगीता भोईर, सिमरन फ्रान्सिस, देश विदेशातून असंख्य ख्रिश्चन बांधव-भगिनी उपस्थित होते.

# सुधाकर राठोड यांचा गौरव

**। रसायनी । वार्ताहर ।**

इर्शाळवाडी दुर्घटनेत जीवाची बाजी लावत रात्रंदिवस मेहनत करणाऱ्या निवासी नायब तहसीलदार सुधाकर राठोड यांचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी कौतुक करून त्यांना प्रशस्ती पत्र दिले.

नवी मुंबई येथील एका कार्यक्रमात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी इर्शाळवाडी दुर्घटनाग्रस्तांना नवीन घरांच्या चाव्या दिल्या. एका वर्षात इरसाल वाडीतील नागरिकांचा सर्व सुविधांनी सुसज्ज अशा घरात गृहप्रवेश झाला. कोणत्याही नैसर्गिक अथवा मानव निर्मित आपत्तीमध्ये बचाव कार्यासाठी धैर्य आवश्यक असते, तर पुनर्निर्माणासाठी इच्छा शक्ती, प्रयत्नांची पराकाष्ठा करून अनेकांना जीवदान दिले, आणि पुनर्वसन करण्यासाठी जीवाचे रान केले. म्हणूनच एका वर्षात आपण हे पुनर्वसन करू शकलो,असे मुख्यमंत्री यांनी आपल्या प्रशस्तीपत्रात नमूद करून नायब तहसीलदार सुधाकर राठोड यांचे कौतुक केले आहे.तत्कालीन उपविभागीय अधिकारी अजित नैराळे, तहसीलदार आयुब तांबोळी आणि नायब तहसीलदार सुधाकर राठोड यांनी चोवीस तास कार्यरत राहून काम केले आहे. नायब तहसीलदार सुधाकर राठोड हे दुर्घटना घडली तेव्हापासुन इर्शाळवाडी वर लक्ष ठेऊन होते. शोध मोहीम आटोपली की काळोखी संध्याकाळी डोंगरावरून खाली यायचे आणि पहाट झाली की पुन्हा मोहिमेवर जायचे. पोलीस, मदतकार्य करणारी टीम, वैद्यकीय पथक यांच्या अगोदर ते जायचे, या दरम्यान त्यांच्या पायाला जखमा देखील झाल्या होत्या. रात्री कार्यालयात बसून पाच दिवस त्यांनी पुनर्वसनाबाबतचे काम केले. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी इरसाल वाडी दरडग्रस्तांना घराच्या चाव्या प्रदान करण्याच्या कार्यक्रमात हे प्रशिस्त पत्र दिले. हे पत्र पाठविल्यावर निवासी नायब तहसीलदार सुधाकर राठोड यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# कर्जत-मुरबाड महामार्गावर अपघातांची मालिका

## ■ रस्त्यावर गतिरोधक बसवण्याची ग्रामस्थांची मागणी

**। नेरळ । वार्ताहर ।**




**कर्जत मुरबाड राष्ट्रीय महामार्गावर मोठ्या संख्येने अवजड वाहनांची वर्दळ सुरु असते. कर्जतकडून सुसाट वेगाने येणारी वाहने कळंब नजीक असलेल्या पोंही येथील त्रिकोनी ठिकाणी येतात. तसेच कळंबकडून नेरळकडे वळण घेऊन जाणाऱ्या प्रवासी वाहनांना त्यामुळे मोठा धोका संभावतो. गतीरोधक नसल्याने अपघात होत आहेत, तरी संबंधित अधिकाऱ्यांनी तातडीने लक्ष देणे गरजेचे आहे.**

कर्जत-मुरबाड महामार्गावर कळंब ते पोही दरम्यानच्या त्रिकोणी रस्त्यावर गतिरोधकांच्या अभावामुळे अपघातांचे प्रमाण वाढले आहे. विशेषतः कर्जतहून सुसाट वेगाने येणाऱ्या वाहनांमुळे या रस्त्यावर वारंवार अपघात घडत आहेत. काही दिवसांपूर्वी बोरगाव येथील एका रिक्षाचा अपघातात चक्काचूर झाला होता, तर पोशीर येथील प्रवासी वाहतूक करणाऱ्या एका इको गाडीला टँकरने धडक दिली. तर आज रिक्षा आणि गॅस टाकी वाहतूक करणाऱ्या वाहनाचा अपघात घडला आहे. यात सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नसली, तरी वाहनांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.

या अपघातानंतर स्थानिक ग्रामस्थांकडून या रस्त्यावर गतिरोधक बसविण्याची मागणी करण्यात येत आहे. महामार्गावरील कळंब ते नेरळ या मार्गावर मोठ्या प्रमाणात वाहतूक सुरू असते. परंतु, गतिरोधक नसल्यामुळे कर्जतहून येणाऱ्या मालवाहू ट्रक आणि इतर वेगवान वाहनांच्या धडकांमुळे अपघात घडत आहेत. गेल्या अनेक दिवसांपासून स्थानिकांनी या मुद्द्यावर आवाज उठवला आहे. परंतु, अद्याप उपाययोजना झालेल्या नाहीत. एमएसआरडीच्या सिमेंट काँक्रीट महामार्गावरील या त्रासदायक स्थितीमुळे रस्त्यावरील सुरक्षितता धोक्यात आली आहे.

# पाली येथे महिलांकरीता उद्योजकता प्रशिक्षण

**। रायगड । खास प्रतिनिधी ।**

भारतीय उद्योजकता विकास संस्था (ईडीआयआय) व टाटा कम्युनिकेशन्स मुंबई यांच्याद्वारा सुधागड पाली येथे अनुसूचित जाती, अनुसुचित जमाती प्रवर्गातील महिला व दिव्यांग व्यक्तीं करीता निःशुल्क महिला उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रमाचे २१ ऑक्टोबर २०२४ रोजी आयोजन करण्यात आले आहे.

टाटा कम्युनिकेशन्सच्या सामाजिक दायीत्व विभागाअंतर्गत पुरस्कृत हा प्रशिक्षण कार्यक्रम असून यामध्ये उद्योग संधी व निवड, बाजारपेठ सर्वेक्षण, विपनण व्यवस्था, व्यवसायाचे व्यवस्थापन, सिध्दी प्रेरणा, क्षेत्र भेट, शासकीय कर्ज योजनांची माहीती, उद्योगासाठी लागणारे विविध परवाने, संवाद कौशल्य, उद्योगाची हिशोब पध्दती आदी विषयांवर तज्ञ प्रशिक्षकाद्वारे मार्गदर्शन करण्यात येईल.

हे प्रशिक्षण निःशुल्क स्वरुपाचे असून सुधागड-पाली तालुक्यातील महिलांकरीता ही संधी निर्माण झाली आहे. या प्रशिक्षणामध्ये सहभागी होण्याकरीता शिक्षण ७ वी पास ते पुढे, वय १८ वर्षे पूर्ण ४५ वर्षापर्यंत असावे. तसेच प्रशिक्षणामध्ये नियमीत हजर राहण्याची तयारी असावी. प्रशिक्षण प्रवेश अर्जासोबत शाळा सोडल्याचा दाखला, आधार कार्ड, रेशनकार्ड,१ फोटो आदी कागदपत्राची झेरॉक्स प्रत जोडावी.सहभागींना प्रमाणपत्र देण्यात येणार आहे.

# रोहा कोलाड रस्त्यावर अपघात

## कारची रिक्षाला धडक, तिघे जखमी

**। कोलाड । वार्ताहर ।**

पाले बुद्रक गावच्या हद्दीत रविवारी १३ ऑक्टोबर रोजी दुपारी ३:१५ च्या सुमारास कारची रिक्षाला धडक लागून अपघात झाला. या धडकेत तिघेजण जखमी झाल्याची घटना रोहा-कोलाड मार्गावर घडली आहे.



याबाबत अधिक माहिती अशी की, पाले बु. बस स्टॉप पुढे, रोहा येथे फिर्यादी ( रा. पाले बु. आदीवासी वाडी, रोहा) हे कोलाड ते पाले बु. असा प्रवास रीक्षाने करत होते. रोहा बाजुकडुन आरोपी (रा. कोथरूड पुणे) हा आपल्या ताब्यातील कार भरधाव वेगात चालवुन चुकीच्या बाजुला जाऊन रीक्षाला ठोकर दिली. फीर्यादी व साक्षीदार यांना लहान मोठया गंभीर स्वरूपास दुखापत करून व दोन्ही गाडीचे नुकसानीस कारणी भुत झाला.या अपघातात दोन प्रवाशी व रिक्षा वाहन चालक जखमी झाला असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. तरी याबाबत कोलाड पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला असून सपोनि नितीन मोहिते यांच्या मार्गदर्शनाखाली अधिक तपास पोह गायकवाड हे करीत आहेत.

दरम्यान, गेल्या काही दिवसांपासून या मार्गावर अपघातांचे प्रमाण वाढले आहे, वाहन चालक नियम धाब्यावर बसवून वाहन चालवतात. त्यामुळे अपघात होत आहेत.

### गणित संबोध परीक्षेत सर्व विद्यार्थी उत्तीर्ण

# नेणवली शाळेचा गौरव !

**। पाली/बेणसे । वार्ताहर । रायगड जिल्ह्यातील सुधागड तालुक्यातील नेणवली शाळेतील विद्यार्थ्यांनी रायगड गणित संबोध परीक्षा २०२३-२४ मध्ये उल्लेखनीय कामगिरी केली आहे. या परिक्षेत सर्व विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. शाळेने ऐतिहासिक विक्रम प्रस्थापित केला आहे. याचबरोबर इयत्ता पाचवीची विद्यार्थिनी संस्कृती कृष्णा खराडे ही सुधागड तालुक्यात प्रथम आली असून तिला शिष्यवृत्ती मिळाली आहे.**



आज झालेल्या सुधागड गणित मंडळामार्फत बक्षीस वितरण सोहळ्यात सुधागड तालुका गटशिक्षणाधिकारी साधुराम बांगारे व सर्व गणित अध्यापक मंडळ सदस्यांमार्फत संस्कृतीला तिच्या या यशासाठी अभिनंदन करण्यात आले. तसेच उत्तीर्ण सर्व विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र समारंभपूर्वक देण्यात आले.

नेणवली शाळेचे हे यश शाळेच्या शिक्षकांच्या कठोर मेहनतीचे आणि विद्यार्थ्यांच्या निष्ठावान प्रयत्नांचे फळ आहे. शाळेने गणिताच्या अभ्यासासाठी विविध उपक्रम राबवले होते.

> **"रायगड गणित संबोध परीक्षेत प्रथमच नेणवली शाळेने सहभाग घेऊन उज्वल यश मिळवले, शिष्यवृत्ती देखील प्राप्त केली. त्याबद्दल अभिमान वाटतो.**
> **राजेंद्र अंबीके,**
> **मुख्याध्यापक-नेणवली"**

ज्यामुळे विद्यार्थ्यांना गणित विषय अधिक प्रभावीपणे समजून घेण्यास मदत झाली. सुधागड तालुक्यात प्रथम संस्कृती कृष्णा खराडे ही सुधागड तालुक्यात प्रथम आल्याबद्दल तिचे विशेष अभिनंदन केले. तिच्या या यशाने संपूर्ण तालुक्याचे नाव उंचावले आहे, असे उपस्थितांनी सांगितले.

# धाविर महाराजांना दिमाखदार सशस्त्र मानवंदना

**। रायगड । वार्ताहर ।**

जिल्ह्याचे श्रध्दास्थान आणि रोह्याचे ग्रामदैवत श्री धाविर महाराजांच्या पालखी सोहळ्यास दरवर्षी रायगड पोलीस दलामार्फत सशस्त्र मानवंदना देण्यात येते. हि परंपरा ब्रिटिश काळापासून सुरु आहे.

ही मानवंदना अतिशय भव्य आणि दिमाखदार स्वरूपात करण्याचे निर्देश पालकमंत्री उदय सामंत यांनी मागील वर्षी दिले होते. त्यानुसार यंदा रायगड पोलिसांनी धावीर महाराजांना अतिशय भव्य आणि दिमाखदार सशस्त्र मानवंदना दिली.

कुंडलिका नदीच्या तीरावर वसलेल्या रोहा शहराला ऐतिहासिक पार्श्वभूमी आहे. ब्रिटीशांच्या काळापासून धावीर महाराज देवस्थानास पोलिसांची सशस्त्र मानवंदना देण्याचा बहुमान दिला आहे. मागील वर्षी पालकमंत्री उदय सामंत या सोहळ्यात सहभागी झाले होते. या सोहळ्यानंतर झालेल्या पत्रकार परिषदेत महाराष्ट्राच्या अस्मितेचा मानबिंदू असलेल्या या धावीर महाराज पालखी सोहळ्याला रायगड पोलिसांच्यावतीने देण्यात येणारी मानवंदना भव्य स्वरूपात आणि दिमाखदार असेल. देवस्थानाला दिली जाणारी पोलिस वंदना हे देवस्थानाचेच नव्हे तर आपल्या राज्यासाठी देखिल कायम स्वरूपी वैशिष्ट्यपूर्ण असेल असे जाहीर केले होते. त्यांनुसार रायगड पोलीस दलाने पालकमंत्री उदय सामंत यांच्या निर्देशांनुसार यंदा अतिशय भव्य सशस्त्र मानवंदना दिली आहे.

सकाळी साडेसहाच्या सुमारास रायगड पोलीस दलाचे पोलीस निरीक्षक विजय बाविस्कर यांच्या नेतृत्वाखाली रायगड पोलीस दलाने श्री धावीर महाराजांना सशस्त्र सलामी दिली. यावेळी रायगड पोलीस दलाचे बँड पथक यांचेही संचलन झाले.

रायगड पोलीस दलाचे श्री धावीर महाराजांना सशस्त्र म ानवंदना झाल्यानंतर श्री धावीर महाराज की जय असा एकच जयघोष श्री धावीर महाराज मंदिर पटांगण परिसरात दुमदुमलला. श्री धावीर महाराज पालखीमध्ये विराजमान झाल्यानंतर श्री धावीर महाराज पालखी सोहळयाला सुरुवात झाली. सोहळा डोळ्यात साठवण्यासाठी मोठ्या संख्येने भाविक मंदिर परिसरात उपस्थित होते. त्यांनी धावीर महारांजाचे दर्शन घेतले.

निवडक

## मुलाच्या नातेवाईकांचा शोध

**पनवेल** : पनवेल तालुका पोलीस ठाण्याच्या हद्दीतील आपटा फाटा साई गाव येथे एक १३ वर्षीय अल्पवयीन मुलगा सापडला आहे. त्याच्या नातेवाईकांचा शोध पनवेल तालुका पोलीस करीत आहेत. हा अल्पवयीन मुलगा आपले नाव लालू नंदू असे सांगत असून वर्ण सावळा, उंची ५ फुट, बांधा मध्यम, केस काळे आहेत. या मुलाबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी पनवेल तालुका पोलीस ठाणे (२७४५२४४४) किंवा पोलीस उपनिरीक्षक विष्णू टोणे (९६९६९१३६०७) यांच्याशी संपर्क साधावा.

## चौघांविरोधात गुन्हा दाखल

**पनवेल** : ओढणीच्या सहाय्याने गळफास घेऊन आत्महत्या केल्याप्रकरणी पनवेल तालुका पोलीस ठाण्यात चौघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. संगीता विकास यादव (२७) असे या महिलेचे नाव असून या नेरे येथील रहिवाशी होत्या. त्यांचे पती रमेश यादव यांचे दुसऱ्या स्त्रीसोबत प्रेम संबंध असून संगीता यांचा शारीरिक व मानसिक छळ करायचा. या त्रासाला कंटाळून संगीता यादव यांनी गळफास घेऊन आत्महत्या केली. या प्रकरणी विकास, रमेश, सीता व कविता यादव यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## छातीवर ब्लेडने वार

**पनवेल** : संजय यादव हा धारावी येथे नातेवाईकांकडे राहतो. रोहिंजण येथे त्याचा गावाचा लवंकुश टीहूल तनोजिया यांच्याकडे तो आला होता. रात्रीच्या सुमारास लवंकुशच्या भंगाराच्या दुकानासमोर त्याने कामाचे पैसे मागितले व मी गावी जातो असे सांगितले. या गोष्टीचा राग आल्याने लवंकुश याने शिवीगाळ व धमकी देऊन हातात ब्लेड घेत संजयच्या छातीवर मारून जखमी केले. याप्रकरणी लवंकुश तनोजिया याच्या विरोधात तळोजा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## विविध घटकांचा सन्मान

**नागोठणे** : येथील चांद्रसेनीय कायस्थ प्रभू समाजाच्या श्री सिद्धीविनायक मंदिरात दर मंगळवारी होणाऱ्या आरतीचे स्वरुप महाआरतीत बदलण्यात येणार असून, यानिमित्ताने वेगवेगळ्या घटकांचा सन्मान करण्यात येणार असल्याची माहिती मुख्य विश्वस्त सुभाष गरुडे यांनी दिली. मंगळवारी (दि.१५) होणाऱ्या या पहिल्या महाआरतीला नागोठणे पोलीस ठाण्याचे अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना निमंत्रित करण्यात आले आहे. दर मंगळवारी नियमितपणे हा उपक्रम सुरू राहणार असल्याची माहिती गरुडे यांनी दिली.

## देवाच्या काठीची परंपरा

**नेरळ** : कर्जत तालुक्यातील हालिवली गावाची भैरवनाथ देवाच्या काठीची परंपरा गेली अनेक वर्षे चालू आहे. 'भैरवनाथाच्या नावानं चांगभलं' या गजरात हालिवली गावातील सर्वच भक्तांकडून संपूर्ण गावांमध्ये मिरवणूक काढून भजन कीर्तनाच्या गजरात उत्सव साजरा करतात. यावेळी भैरवनाथ देवाच्या काठीला रंगीबेरंगी कापड गुंडळून मोर पिसाचे तुरे लावून घंटी बांधून भजन कीर्तनाच्या संगीतमय वातावरणामध्ये गावाच्या बाहेर पडतात. यानंतर आपट्याच्या झाडाकडे दसऱ्याला सोन आणण्यासाठी हालिवली गावातील नागरिक जातात.

# युट्यूब पत्रकारांचा धुमाकूळ

**। नागोठणे । वार्ताहर ।**

**नागोठणे शहर व परिसरात गेले काही महिने अनधिकृत यूट्यूब न्युज चॅनेल वाल्यांनी शांतता घेतली होती. मात्र, आता पुन्हा एकदा खासगी यूट्यूब न्युज चॅनेलला नव्याने निर्माण झालेले पत्रकार व त्यांना जोड मिळालेले काही जुने पत्रकार यांची मिलिजुळी सरकार निर्माण झाली आहे. यामुळे नागोठणे परिसरात पुन्हा एकदा युट्यूब न्युज चॅनेल वाल्यांचा 'रात्रीस खेळ चाले' हा प्रकार सुरू झाला आहे. त्यांच्या डोक्यावर कोणत्या नेत्याचा हात आहे, यावर नागोठणे परिसरात चर्चा रंगू लागली आहे.**




युट्यूब न्युज चॅनेल्सनी सध्या नागोठणे परिसरासह सर्वत्रच धुमाकूळ घातलेला आहे. याच युट्यूब न्युज चॅनेल्सचे प्रतिनिधी त्या-त्या जिल्ह्यातील जिल्हा माहिती विभागाच्या अधिकाऱ्यांकडे पत्रकारांसाठी आवश्यक असणाऱ्या सुविधांची वारंवार मागणी करीत असतात. याबाबतचे स्पष्टीकरण राज्याच्या माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाकडून करण्यात आलेले आहेत. या संदर्भात मंत्रालयातील माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या अधिकाऱ्यांसोबत १ मे, २०२० रोजी झालेल्या ई-मीटिंग मध्ये असे स्पष्ट करण्यात आले आहे की, अशा युट्यूब चॅनेल्सची शासनाकडे कोणतीही नोंद होत नसल्याने ती अधिकृत समजण्यात येऊ नये. तसेच, या संदर्भात माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या कार्यालयाला पुन्हा विचारणा करण्यात येऊ नये, अशी सक्त ताकीदही उपसंचालक डॉ. गणेश मुळे यांनी रायगड, ठाणे, रत्नागिरी व पालघर या चारही जिल्ह्यांच्या जिल्हा माहिती अधिकाऱ्यांना आपल्या लेखी आदेशान्वये दिली आहे.

असे असतानाही नागोठणे परिसरात युट्यूब न्युज चॅनल वाल्यांचा सध्या विविध प्रकारे 'रात्रीस खेळ' चालत आहे. युट्यूब वाल्यांचे हे पथक रात्री ८ नंतर बाहेर पडतात. विशेष करून मुंबई-गोवा महामार्गालगत असणारे हॉटेल्स, त्यासमोर उभी राहणारी वाहने, महामार्गावर मालवाहतूक करणारी वाहने, रेशनिंगचे धान्य पुरवठा करणारी वाहने यांच्यात काहीतरी दोष हेरून व कायद्याची त्रुटी शोधून त्याचाच आधार घेत त्यांना सावज करून लुबाडण्याचे प्रकार सुरु आहेत. असे असतानाही राज्य शासनाच्या माहिती महासंचालनालयाकडून पूर्णता अनधिकृत असल्याचा शिक्का बसलेल्या या युट्यूब न्युज चॅनेल वाल्यांना पोलीस प्रशासनाचा व इतर कुणाचाही धाक नाही. स्थानिक पोलिसांनाही याची कल्पना नसल्याची तसेच या युट्यूब चॅनेल वाल्यांना कुणाचा आशिर्वाद आहे, याची उलट सुलट चर्चा होत आहे.

दरम्यान, परिसरातील काही राजकीय पुढारी व हितसंबंधीय अशा तोतया युट्यूब पत्रकारांना आपल्या क्षुल्लक स्वार्थासाठी किंमत देत असतात. याबाबत येथील मूळ स्थानिक पत्रकारांकडून सरकारी यंत्रणेबद्दल तीव्र संताप व्यक्त करण्यात येत आहे.



## गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान

**। रसायनी । वार्ताहर ।**

सामाजिक बांधिलकी व शिक्षण क्षेत्रामध्ये विद्यार्थ्यांनी चांगली प्रगती करून आपले आयुष्य यशस्वी करावे या उद्देशाने निर्मला फाउंडेशन गुळसुंदे यांच्यावतीने एसएससी परीक्षा २०२४ मधील प्रथम तीन क्रमांक प्राप्त २७ गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी रसायनी परिसरातील गुळसुंदे हायस्कूल, आपटे विद्यालय, सावळे विद्यालय, चावणे विद्यालय, वाशिवली विद्यालय, जनता विद्यालय मराठी माध्यम व इंग्रजी माध्यमिक विद्यालय, रिलायन्स फाउंडेशन स्कूल या शाळांतील विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी रमाकांत मोकल, डॉ. अनिल पालवे, डॉ. अनुजा पाटील, डॉ. जीवन भोजने, विश्वास कोरडे, निर्मला पाटील, पांडुरंग पाटील, जितेंद्र गाताडे, संदीप माळी, सुनील पाटील, चंद्रकांत पाटील, मुख्याध्यापक कांबळे, झिंगे आदी उपस्थित होते.

## रोजगार मेळाव्याला उत्स्फुर्त प्रतिसाद

**। रसायनी । वार्ताहर ।**

लायन्स क्लब ऑफ पनवेल व जे.एम. म्हात्रे चॅरिटेबल संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने जनता विद्यालय मोहोपाडा-रसायनी येथे भव्य रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या रोजगार मेळाव्यामध्ये ३५० उमेदवारांनी ऑनलाईन रजिस्ट्रेशन केले होते. त्यांच्या प्रत्यक्ष मुलाखती घेण्यात आल्या. यापैकी ६५ मुलांची निवड करण्यात आली असून १५ ते १७ मुलांना लगेचच कामावर रुजू होण्यासाठी सांगण्यात आले आहे.



यावेळी जे.एम. म्हात्रे चॅरिटेबल संस्थेचे अध्यक्ष प्रितम म्हात्रे यांनी आपल्या वक्तव्यात सांगितले की, गावोगावी फिरत असताना असे लक्षात आले की, 'आम्हाला फक्त नोकरी द्या' हा एकच शब्द सगळ्यांच्या तोंडी होता. यामुळे येथील प्रत्येक तरुणाला रोजगार व नोकरी मिळाली पाहीजे, हा प्रामाणिक हेतू हा रोजगार मेळावा भरवण्यामागे होता. तसेच, लायन्स क्लब पनवेलचे अध्यक्ष एस.जी. चव्हाण यांनी आपल्याला एकूण ४०० जागा उपलब्ध करून दिल्या आहेत. त्यादृष्टीतने हा रोजगार मेळावा आपल्याला फायदेशीर ठरेल. तसेच, नवी मुंबईतील एअरपोर्टवर नोकरीसाठी त्यांच्यामार्फत मोफत प्रशिक्षण केंद्र देखील सुरु करण्यात आले आहे. मी फक्त माध्यम आहे, मेहनत तुम्हाला करायची आहे, असेही प्रीतम म्हात्रे म्हणाले.

यावेळी जे.एम. म्हात्रे, नारायण घरत यांच्यासह बाळाराम म्हात्रे, प्रदीप पाटील, दत्ता शिंदे, रमेश पाटील, चंदू पाटील, रंजना गायकवाड, दत्तात्रेय जांभळे, राम चंद्र गायकवाड, बाळाराम कुरंगळे, जगदीश पवार, भालचंद्र राऊत, नाना म्हात्रे, मनीष गायकवाड, ओकांसाहेब, अनिल कुरंगळे, डॉ. स्वप्नील, संगीता म्हात्रे, एकनाथ खाने, गुरुनाथ माळी, संतोष मालकर, अनंत गाताडे, लायन्स क्लबचे अध्यक्ष एस. जी. चव्हाण, विजय गणत्रा, नयन कवले, अशोक गिल्डा, नागेश देशमाने, मनोज म्हात्रे, के.एस. पाटील, अलका चव्हाण, प्रमोद गझहंस, शिवानी जंगम, किशोर शेळके, मोनिका चौलकर आदी उपस्थित होते.

## विविध कार्यक्रमांचे आयोजन

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

दरवर्षीप्रमाणे यावर्षीही माणगावातील ढालघर येथील गोरक्षनाथ मंदिरात नवरात्रोत्सव दि. ३ ते १२ ऑक्टोबर दरम्यान साजरा करण्यात आला. यावेळी या उत्सवात दैनंदिन पूजा, होमहवन, श्रीमद भगवतगीतेवर प्रवचने, भजन यांसारखे पारमार्थिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. उत्सवकाळात वयक्तिक नामसाधना, ध्यानधारणा, देवदेवतांची विधिवत पुजा व देवी यज्ञ विधी याचबरोबर शुक्रवारी (दि.११) सन २०२३-२४ शैक्षणिक वर्षातील माध्यमिक, उच्च माध्यमिक परीक्षा उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा दादा शिंदे, खाडे महाराज, खेमचंद मेथा यांच्या हस्ते संपन्न झाला.



## पोलादपूरमध्ये आदिवासी आदिशक्ती मेळावा

**। पोलादपूर । प्रतिनिधी ।**

महाड आणि पोलादपूर तालुक्यातील आदिवासी कातकरी समाजातील महिला व पुरूषांसाठी वैयक्तीक तसेच सामाजिक विकासासह आदिवासी वाड्यांच्याही विकासासाठी संघटितपणे प्रयत्न करण्याची गरज असल्याचे मत महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे कोकण विभागीय अध्यक्ष शैलेश पालकर यांनी व्यक्त केले आहे.

श्रमजिवी जनता सहाय्यक मंडळ आणि सावित्री आदिवासी सहकारी पतसंस्थेतर्फे आदिवासी आदिशक्ती वार्षिक संमेलन मेळाव्याचे आयोजन येथील कॅप्टन विक्रमराव मोरे सभागृहामध्ये करण्यात आले होते. यावेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून शैलेश पालकर बोलत होते.





यावेळी पालकर यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, आदिवासींसाठी निर्लोभी भावनेने काम करणाऱ्यांची संख्या कमी असल्यानेच सध्या आदिवासी बांधव भगिनींना विकासापासून वंचित असल्याचे पाहावे लागत आहे. पोलादपूर तालुक्यातील आदिवासी शिक्षण, आरोग्य, रस्ते, निवारा आणि रोजगारापासून वंचित असताना गेली १०-१५ वर्षे श्रमजिवी जनता सहायक मंडळाने केलेल्या कामामुळे आदिवासी संघटितपणे एकत्र येऊ लागला आहे. आश्रमशाळा, कनिष्ठ महाविद्यालय, नामांकित निवासी शाळांमध्ये आदिवासी पाल्यांना शिक्षण, पंडीत दिनदयाल उपाध्याय स्वयम योजना, आहार, वाहनचालक प्रशिक्षण, आदिवासी सेवक व संस्था पुरस्कार तसेच ठक्कर बाप्पा आदिवासी वस्ती सुधारणा अशा विविध योजनांची माहिती पालकर यांनी सांगीतली.

यावेळी पांडुरंग वाघे, सुनिता हिलम, विठ्ठल कोळेकर, कुंदा जगताप, सुरेश हिलम, काशी वाघमारे, वत्सला जगताप, जयराम जाधव, संदीप वाले, सुरेखा जाधव, जना जाधव, मेघा कदम आदी मान्यवर उपस्थित होते.




## नामवंत व्यक्तींचा सन्मान सोहळा

**। पनवेल । वार्ताहर ।**

ब्लु पँथर संघटनेतर्फे पनवेल तालुक्यातील बौद्ध समजातील डॉक्टर, वकील, सरपंच, उपसरपंच तसेच आंबेडकरी चळवळीला योगदान देणारे कार्यकर्ते यांचा सन्मान करण्यात आला. समजातील नामवंत व्यक्तीने समजातील प्रत्येक व्यक्तीचा सन्मान करावा, या उद्दिष्टाने एक नवीन संकल्पणा आमलात आणून यावेळी समजातील ३० वकील, ६ डॉक्टर, २ सरपंच, १४ ग्रामपंचायत सदस्य, ४७ आंबेडकर चळवळी साठी योगदान देणारे कार्यकर्ते तसेच २५ दिवंगत आंबेडकर चळवळीसाठी योगदान देणाऱ्यांचा प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी शिरीष भटांगे, कुमार मेटोंगे, नंदकुमार गायकवाड, के. के. गायकवाड, नरेंद्र गायकवाड, विजय गायकवाड, प्रभाकर कांबळे, ॲड. राजेश खंडागळे, राज सदावर्ते, प्रवीण खंडागळे, विजय बाबरे, जयवंत बाबरे, शंकर वायदंडे, सुभाष वाघपंजे आदी मान्यवर उपस्थित होते.

## सेवानिवृत्त गोदी कामगारांचा मेळावा

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

भारतातील बंदर व गोदी कामगारांसाठी जानेवारी २०२२ पासून पाच वर्षासाठी लागू होणारा भरघोस पगारवाढीचा वेतन करार मुंबईत संपन्न झाल्यानंतर, पुणे जिल्ह्यामधील सेवानिवृत्त गोदी कामगारांचा आनंदोत्सव मेळावा मोठ्या उत्साहात संपन्न झाला. मुंबई गोदी कामगारसेवानिवृत्तसंघाच्यावतीने १२ ऑक्टोबर रोजी जुन्नर तालुक्यातील माई वडेवाले सभागृहात सेवानिवृत्त गोदी कामगारांचा आनंदोत्सव मेळावा मुंबई पोर्ट ट्रस्ट डॉक अँड जनरल एम्प्लॉईज युनियनचे प्रसिद्धीप्रमुख मारुती विश्वासराव यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला.



यावेळी मुंबई पोर्ट ट्रस्ट रिटायर्ड असोसिएशनचे अध्यक्ष सी.जे. मेंडोसा यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात सांगितले की, मुंबई येथे झालेल्या गोदी कामगारांच्या वेतन करारात नोकरीत असलेल्या कामगारांना भरघोस पगारवाढ मिळाली असून, पेन्शनर्सना देखील चांगली पेन्शनवाढ झाली आहे. या वेतन करारात पेन्शनवाढीचा कायदेशीर समावेश करण्यात आला आहे. सेवानिवृत्त कामगारांच्या प्रलंबित मागण्या या वेतन करारात मान्य झाल्या असून, याचे सर्व श्रेय सहा गोदी कामगार महासंघांच्या नेत्यांना व इंडियन पोर्ट असोसिएशनचे चेअरमन राजीव जलोटा यांना आहे. या सभेला मोहम्मद अली, मुंबई पोर्ट ट्रस्ट रिटायर्ड एम्प्लॉईज असोसिएशनचे सरचिटणीस डी. एच. डिंग्रेजा, गोवेकर, माईकल कोलॅसो, वसंत गावडे आदी मान्यवर उपस्थित होते.

## धम्मचक्र प्रवर्तन दिन साजरा

**। पनवेल । वार्ताहर ।**

प्रबुद्ध सामाजिक संस्था करंजाडे-पनवेल तर्फे ६८ वा धम्मचक्र प्रवर्तन दिन संस्थेचे अध्यक्ष कुणाल लोंढे यांच्या अध्यक्षतेखाली साजरा करण्यात आला. यावेळी गौतम अहिरे बापू सावंत, राजेंद्र घोडके, दिगंबर साळवे, महादेव कांबळे, यशपाल कांबळे, गणेश डोळस, धनंजय ताटे, प्रविण ढगे, अर्जुन भगत, नितीन कांबळे, सचिन सोनावणे, प्रदिप वाघमारे, मुकूंद सोनावणे, कमलाकर कांबळे, आर. डी. गमरे, स्वप्नील पवार, अनिकेत लोंढे, नितीन जाधव, दर्शक सावंत, उज्वला सोनावणे, शैला सोनावणे, आरती लोंढे, नैना देव्हारे, सविता सावंत आदींनी हा कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता विशेष परिश्रम घेतले.

## विद्यार्थ्यांसाठी करिअर मार्गदर्शन शिबीर



**। पोलादपूर । प्रतिनिधी ।**

आकार प्रतिष्ठानतर्फे पोलादपूर तालुक्यातील विद्यार्थ्यांसाठी करिअर मार्गदर्शन शिबिराचे आयोजन पोलादपूर येथील कॅप्टन विक्रम राव मोरे सभागृहामध्ये करण्यात आले होते. यावेळी तालुक्यातील असंख्य विद्यार्थ्यांचा या शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या शिबिराचे उद्‌घाटन महाड येथील ज्येष्ठ साहित्यिक सुधीर शेठ यांच्या हस्ते करण्यात आले. पोलादपूर तालुक्यातील माध्यमिक आणि उच्च माध्यमिक प्रशालांच्या इयत्ता दहावी आणि बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी विवेक मेहेत्रे यांचा 'चला यशस्वी होऊ या' कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी संगणकाद्वारे प्रोजेक्टरवरून मोठ्या पडद्यावर व्हिडीओ क्लीप्स आणि पॉवरपॉईंट प्रोजेक्टद्वारे विद्यार्थ्यांमध्ये अभ्यास व शैक्षणिक तसेच जीवनातील यशासाठी प्रोत्साहनपर मार्गदर्शन विवेक मेहेत्रे यांनी केले.

## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- वर्कशॉपमध्ये मशिन ऑपरेटर आणि सुपरवाईझर पाहिजेत शिक्षण १५ वी पास प्रशिक्षण दिले जाईल. ठिकाण बामणसुरे, चोंढी नंबर - ९१४५४५०२९७/९५७९२५८८९२.
- वर्कशॉपमध्ये कामाला मुले पाहिजेत १० वी १२ वी पास/ नापास पगार १२००० रूपये १२ तास ड्युटी ठिकाण-बामणसुरे, चोंढी नंबर-९१४५४५०२९७/९५७९२५८८९२
- नागाव येथे कामासाठी बाई ची आवश्यकता. घरकाम व मुलाला सांभाळणे. पगार- १२,०००/- संपर्क- ७८७५८६६५५५
- अलिबाग एसटी स्टॅन्डजवळ दुकान गाळा विक्री करणे आहे. ९७६४५४८६७९
- Freshers पाहिजेत : रायगड जिल्ह्यातील अनअनुभवी / नवोदित पुरुष शिक्षकांना अलिबाग येथे पूर्ण वेळ नोकरीची संधी. पात्रता : BA / MA B.Ed, BSc / MSc B.Ed, B.E. / B.Tech पगार : रु. २०,०००/- पर्यंत. अर्ज करा- honestefforts1012@gmail.com
- अलिबाग रेवस रोड येथे चायनीज/हॉटेल त्वरीत स्वरूपात चालवायला देणे आहे. ७५०७३०१३५१, ९२७०४९८०९९

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

## कृष्णा आय सेंटरची पत्रकार परिषद

# कॉन्टरा व्हिजन यंत्राचे अनावरण

**। उरण । वार्ताहर ।**

**कृष्णा आय सेंटर ग्रुप ऑफ हॉस्पिटलच्या युनिटद्वारे सोमवारी (दि.१४) रुग्णांच्या सेवेसाठी आपल्या नवीनोत्तम कॉन्टरा व्हिजन लेसर यंत्राचे अनावरण करण्यात आले आहे. याद्वारे नेत्ररोग, कॉर्निया, काचबिंदू, बालरोग, डोळ्यातील पडदा आणि तिरळेपणा यासह नेत्रविज्ञानातील सर्व उप-विशेषांवर उपचार देण्यास सज्ज झाले असल्याची माहिती डॉ. सोनिया आणि डॉ. गुल ननकानी यांनी आयोजित पत्रकार परिषदेत दिली.**



कृष्णा आय प्रा. लि. सेंटरने आतापर्यंत भारतासह परदेशातील १ लाखाहून अधिक रुग्णांची सेवा केली आहे. चष्म्यावरील अवलंबित्व दूर करणाऱ्या प्रीमियम इंट्रा ऑक्युलर लेन्ससह प्रगत मोतीबिंदू शस्त्रक्रियांसाठी हे केंद्र प्रसिद्ध आहे. कृष्णा आय सेंटरने आता कॉन्टरा तंत्रज्ञानासह अत्याधुनिक लॅसिक यंत्रही विकत घेतले आहे, ज्याचा फायदा मुंबईतील लोकांना उत्कृष्ट दर्जाच्या दृष्टीसह चष्मापासून स्वातंत्र्य देण्यासाठी होऊ शकतो.तब्बल ७ हजार चौरस फुटाचा एरिया असलेल्या या केंद्रात इनहाऊस ऑप्टिकल शोरूम आणि औषधांचे देखील शॉप आहे. डॉ. ननकानी यांनी कृष्णा आय सेंटरमध्ये उपचारासाठी येणाऱ्या सर्व वर्गातील रुग्णांना अत्याधुनिक यंत्रांच्या सहाय्याने सेवा देण्याचा आणि 'बघणे म्हणजे विश्वास ठेवणे' या ब्रीदवाक्यानुसार योग्य दृष्टीकोनाची माहिती माध्यमांना दिली.

### कॉन्टरा शस्त्रक्रियेचे फायदे

पारंपारिक लॅसिक शस्त्रक्रिया चष्म्याचा नंबर काढून टाकते, तर कॉन्ट्रा स्पष्ट दृष्टीचा अनुभव देखील वाढवते. कॉन्टरा डोळ्याच्या बहुतीचे २२ हजार बिंद्र मोजते. यांनतर बोटांच्या ठशांप्रमाणे डोळ्यांची ३ प्रतिमा तयार करते. लेसर निवडकपणे या बिंदूंना पॉलिश करते आणि डोळ्यांची बाहुली गुळगुळीत करते. यामुळे रूग्णाला पारंपारिक उपचारांच्या तुलनेत खूप चांगली दृष्टी मिळते. ही मशीन संपूर्ण प्रक्रिया १० मिनिटांत पूर्ण करू शकते. रूग्ण बरा होण्याचा वेळ फक्त २४-४८ तास आहे.

### कॉम्प्युटर व्हिजन सिंड्रोमवर उपचार

अधिकाधिक लोक डिजिटल मीडियावर वेळ घालवत आहेत. डिजिटल माध्यमांचा वापर करणाऱ्या ७०% लोकांमध्ये डोकेदुखी, डोळ्यांचा ताण, थकवा, लालसरपणा, पाणी येणे इत्यादी समस्या होण्याची शक्यता आहे. अशावेळी कृष्णा आय सेंटरमध्ये आलेल्या रुग्णाचे कॉम्प्युटर व्हिजन सिंड्रोमच्या लक्षणांसाठी तपासणी केली जाते.

# तळा बसस्थानकाचे भूमीपूजन

। तळा । वार्ताहर ।

तळा शहरातील तळा बसस्थानकाचे महिला व बाल विकास मंत्री आदिती तटकरे यांच्या हस्ते ऑनलाइन पद्धतीने भूमीपूजन करण्यात आले. तळा बसस्थानकाचे काही महिन्यांपूर्वी मंत्री आदिती तटकरे यांच्या आमदार निधीतून दहा लाख रुपये मंजूर करून दुरुस्तीचे काम करण्यात आले होते. मात्र, या बसस्थानकाचे संपूर्ण काम करण्यासाठी परिवहन विभागाकडून निधी उपलब्ध व्हावा यासाठी मंत्री आदिती तटकरे यांच्याकडून एसटी महामंडळाकडे १ कोटी ७१ लाखांचा प्रस्ताव सादर करण्यात आला होता. त्याला मंजुरी मिळाली असून, जवळपास ७६ लाखांचा पहिला टप्पा वर्ग करण्यात आला आहे.

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, मौजे आक्षी, ता. अलिबाग, जि.रायगड येथील खालील वर्णन केलेल्या बागायत मिळकतीचे विद्यमान मालक नंदकिशोर शंकर पाटील रा. आक्षी, ता. अलिबाग, जि. रायगड यांच्या नांवे असलेली बागायत मिळकत माझे स्नेही संजय विष्णू फणसगांवकर व मनिषा संजय फणसगांवकर दोघे रा. ५०१, प्लॉट नं. ६३५, रानडे रोड, शिवाजी पार्क, दादर, मुंबई ४०० ०२८ यांनी कायम स्वरूपात विकत घेण्याचे ठरविले आहे. तशी बोलणी विद्यमान मालकांबरोबर झालेली आहे.

मिळकतीचे वर्णन

| मौजे | भूमापन क्र. व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| आक्षी ता. अलिबाग | ३८१/क | ०-७२-३० पो.ख. ०-०७-०० एकूण ०-७९-३० | २८.०० |

या बागायत मिळकतीपैकी श्री. नंदकिशोर शंकर पाटील यांचे मालकीचे ०-३६-१५ हे. आर. पो.ख. ०-०३-०० हे. आर. आकार रु.१४.०० पैसे या मिळकतीपैकी ०-०५-१० हे. आर. मिळकतीचे

सदर मिळकत निर्वेध असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी दिलेला आहे. सबब सदरहू मिळकतीवर अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, कुळ वहिवाट, ताबा कब्जा, इजमेंट, साठे करार, गहाण, दान, बोजा व अन्य कोणत्याही प्रकारचा हितसंबंध असल्यास त्यांनी या नोटीशीच्या तारखेपासून सात दिवसांचे आत प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह त्यांच्या लेखी हरकती खाली पत्त्यावर समक्ष वा रजिस्टर पोस्टाने दाखल कराव्यात. याप्रमाणे सदर मिळकत निर्वेध व बोजारहित आहे असे गृहीत धरुन माझे स्नेही वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित व्यवहार पुर्ण करतील व विहित मुदतीच्या नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकती माझे स्नेही यांचेवर बंधनकारक राहणार नाहीत. याची कृपया संबंधितांनी नोंद घ्यावी.

दिनांक : १४/१०/२०२४ सही/-
**जयवंत दत्तात्रेय म्हात्रे**
पत्ता : रा. थेरोंडा (धाकलीवाडी),
पो. चौल ता. अलिबाग, जि. रायगड

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे थळ, ता. अलिबाग, जि. रायगड येथील १) सर्व्हे नं. २६१/६/अ, एकूण क्षेत्र ०-०१-०० हे. आर., आकार ०.४२ रू.पै. २) सर्व्हे नं. २६१/६/ब, एकूण क्षेत्र ०-०१-०० हे. आर., आकार ०.४२ रू. पै. ३) सर्व्हे नं. २६१/५, क्षेत्र ०-०७-६० हे. आर., पो. ख. ०-०१-५० हे. आर., एकूण क्षेत्र ०-०९-५० हे. आर., आकार ३.१२ रू. पै. या बागायत मिळकती तसेच गट ग्रामपंचायत थळ हद्दीतील मौजे थळ, मालमत्ता क्र. ६४०, क्षेत्र १६६.३६ चौ.मीटर ही घरमिळकत, या मिळकतीचे विद्यमान मालक चेतना हेमंत मायदेव व हेमंत अरूण मायदेव दोघेही रा. ४०३/४०२, हर्षीता, लिबर्टी गार्डन, क्रॉस रोड नं. ४, फ्लॅग हॉल जवळ, मालाड पश्चिम मुंबई ४०००६४ यांच्याकडून आमच्या अशिलांनी सर्व हक्कांसह विकत घेण्याच्या ठरविलेल्या आहेत. सदरहू मिळकती निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे विद्यमान मालक यांनी आमचे अशिल यांस दिला आहे. याउपरही सदरहू मिळकतीत कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, साठेकरार, कब्जा, बोजा, वहिवाटीचे हक्क, वारसाहक्क व हितसंबंध वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार खरेदीदार यांचे वकिल यांजकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कुणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास मिळकत निर्वेध आहे, असे समजून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग, **(ॲड. संजय द. म्हात्रे)**
तारीख १४/१०/२०२४ पत्ता - श्रुती सारंग को. ऑप. हौ. सो., ए विंग,
रूम नं. ५, युनियन बँकेच्या समोर, ब्राम्हण आळी,
अलिबाग, ता. अलिबाग जि. रायगड.

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की मौजे दामत ता. कर्जत जि. रायगड येथील खालील वर्णनाची शेतजमीन मिळकत आमचे अशिलानी तिचे विद्यमान मालक १. असमान अहमद नजे २. आरीफ अहमद नजे ३. नजमुन्नीस रशीद नजे यांचे कडुन खरेदी घेण्याचे ठरविले आहे.

| गट नं. | हि. नं. | क्षेत्र हे. आर. पॉ | आकार रू.पै. |
|---|---|---|---|
| १२५ | —— | १.३५.०० पैकी ०.२१.०० मिळकती बाबत | १.५६ |

तरी वरील मिळकती संदर्भात कोणाचाही करार विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, बक्षिस, वारस हक्क, पोटगी, लीन, चार्ज, ताबा, वहिवाट अथवा कोणत्याही स्वरूपाचा कसलाही हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५ (पंधरा) दिवसांचे आत खालील सही करणार यांचे पत्त्यावर प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात हरकत घ्यावी. वरील मुदतीत कोणाचीही लेखी हरकत न आल्यास सदरील मिळकतीमध्ये कोणाचाही हक्क हितसंबंध नाही व असल्यास त्यांनी तो सोडून दिला आहे असे समजून सदरील मिळकती निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचे खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाहीत हे सर्वास कळावे.

ठिकाण : कर्जत **ॲड. प्रदिप मोतीराम सुर्वे**
दिनांक : ११/१०/२०२४ ए २०२ स्वप्ननगरी को. ऑप. हौ.
सोसायटी मुद्रे खुर्द कर्जत रायगड
फोन. नं. २२०१२६/९८५०१३५६५९

दिनांक : १५ ऑक्टोबर २०२४

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टा मध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकाकडुन कायमचे खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यारपत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदी व्यवहार पुर्ण करतील. मुदत बाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

परिशिष्ट
**मौजे - कोठींबे, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.-पॉ. | आकार रुपये | आकार पैसे |
|---|---|---|---|---|---|
| रितेश रमेश भालेराव रेश्मा रमेश भालेराव | ६० | २/ब | ०-२६-०० | १ | ७६ |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे. सही / -
कार्यालयीन पत्ता :- मु. पो. कशेळे, **ॲड. भुपेश तानाजी पेमारे**
कर्जत-मुरबाड रोड, सरकारी दवाखान्यासमोर, दिनांक :-१५/१०/२०२४
ता. कर्जत, जि. रायगड. ४१०२०१ मो. नं. ९१५८२७७७२८

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि. चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

-मुख्य संपादक

**ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन**

*१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग दागिने-नविन डिझाइन्स*



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस कळविण्यात येते की, माझे अशिल सौ. वृषाली योगेश पाटील रा. केगांव दांडा, उरण, तालुका-उरण, जिल्हा-रायगड यांनी खालील वर्णनाची निवासी सदनिका सदर सदनिकेचे विद्यमान मालक श्री. योगेश हरकिशन शहा रा. पेण, पेण- रायगड यांचेकडून रजिस्टर कराराने विकत घेण्याचे ठरविले आहे व तशी बोलणी सुरु आहेत.

मिळकतीचे वर्णन- जिल्हा रायगड, तालुका पेण, मे. दुय्यम निबंधक पेण, मौजे पेण (बाजारपेठ) मधील गणलक्ष्मी सहकारी गृहनिर्माण सोसायटीतील अे विंग मधील दुसऱ्या मजल्यावरील निवासी सदनिका क्र. २०१ त्यासी क्षेत्र ७१५ चौरस फुट बिल्ट-अप ही सदनिका या जाहीर नोटीसीचा विषय आहे.

तरी वरील निवासी सदनिकेचे खरेदी-विक्री संदर्भात जर कोणाचा साठेकरार, गहाण, दान, जप्ती, लिन, लीज, चार्ज, जामिनकी, कब्जा, वारसाहक्क अगर कायदेशिर हितसंबंध असल्यास त्यांनी आपल्या लेखी हरकती प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह ही नोटीस प्रसिद्ध झाले दिवशी पासून ८ (आठ) दिवसांचे आंत खाली सही करणार ॲडव्होकेट यांचे पत्त्यावर रजिस्टर्ड पोस्टाने कळवाव्यात.

जर वरील मुदतीत कोणाचीही लेखी हर-हरकत न आल्यास सदरची सदनिका ही निर्वेध व बोजाविरहित आहे व त्यावर इतर दुसरे कोणाचाही, कसल्याही प्रकारचा हक्क अगर हितसंबंध नाही असे समजुन माझे अशिल कराराचा व्यवहार पूर्ण करतील व वरील मुदती नंतर येणारी कोणतीही हरकत ही माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी. येणेप्रमाणे जाहीर नोटीस असे.

पेण- रायगड. सही
दि. १५/१०/२०२४ **ॲड. संजय भास्कर पाटील**
परमार प्लाझा, शॉप नं. १६,
तळ मजला, शिवाजी पथ.
पेण-रायगड. ४०२१०७.
मोबा. ९८८१९१५२१९

१४/१०/२०२४

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील नमुद केलेली मिळकत कायम खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदरच्या मिळकतीच्या विक्री संबंधीत बोलणी विद्यमान मालक श्री. सुहास आत्माराम पाटील यांचेसोबत झालेली आहे. सदरच्या मिळकती या निर्वेध व बोजा विरहित असल्याचा भरवसा आमचे अशिलांस विद्यमान मालक यांनी दिला असून सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास कोणाचीही कसलीही हरकत असल्यास त्याची खातरजमा करणेकामी जाहिर नोटीस प्रसिद्ध करण्याचे काम आमचेकडे दिलेले आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे,

-: मिळकतीचे वर्णन :-

| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र | आकार (रू.पैसे) |
|---|---|---|---|
| वाघोली ता. अलिबाग | १७/३ | ०-११-४० पो.ख. ०-००-५० एकुण ०-११-९० | २.८१ |

वर वर्णन केलेली मिळकत ही या जाहीर नोटीसीचा विषय आहे.

तरी वरील मिळकतींचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, लिज, फरोक्त, पोटगी, साठेकरार, वहिवाटीचे जाण्यायेण्याचे मार्ग, वारसा हक्क आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास व त्यांची वरील मिळकतींच्या विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या मुळ सही शिक्याची कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून होणाऱ्या ७ दिवसांचे मुदतीत खालील सही करणार याजकडे कळवावी. येणेप्रमाणे विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदरचे मिळकतीचा विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची तमाम जनतेने नोंद घ्यावी हे कळावे.

**ॲड. आशिष नरेंद्र म्हात्रे**
मु. पेझारी (पळी-आंबेघर) पो. पोयनाड
ता. अलिबाग, जि. रायगड.
मोबा. नं. ९२७३२७३८४३/९६३७२७००१९

दिनांक : १५ ऑक्टोबर २०२४

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टा मध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालका कडुन कायमचे खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यारपत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदी व्यवहार पुर्ण करतील. मुदत बाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

परिशिष्ट
**मौजे - कोठींबे, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.- पॉ. | आकार रुपये | आकार पैसे |
|---|---|---|---|---|---|
| प्रतिभा उर्फ कल्पना विष्णु ढाके संदेश विष्णु ढाके | ६० | २/क | ०-२६-०० | १ | ७६ |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे. सही / -
कार्यालयीन पत्ता :- मु. पो. कशेळे, **ॲड. भुपेश तानाजी पेमारे**
कर्जत-मुरबाड रोड, सरकारी दवाखान्या समोर, दिनांक :-१५/१०/२०२४
ता. कर्जत, जि. रायगड. ४१०२०१ मो. नं. ९१५८२७७७२८

# पनवेल महानगरपालिका

ता. पनवेल, जि. रायगड

**कार्यालय**:- उपायुक्त मुख्यालय, १ ला मजला, देवाळे तलावाच्या समोर. गोखले हॉलच्या शेजारी, पनवेल ४१०२०६. दूरध्वनी क्र. ०२२-२७४५८०४०/४१/४२

Email Id panvelcorporation@gmail.com Website: www.panvelcorporation.com

## जाहीर आवाहन

वातावरणातील बदलांमुळे मुंबई महानगर प्रदेशातील हवेच्या गुणवत्तेवर परिणाम होत आहे. याचा परिणाम म्हणून हवेतील प्रदूषणात वाढ होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

या पार्श्वभूमीवर पनवेल शहरातील वायू प्रदूषण नियंत्रणासाठी पनवेल महानगरपालिकेच्या वतीने बांधकाम विकासकांना मार्गदर्शक तत्वे जारी करण्यात आली आहेत सर्व संबंधित यंत्रणासाठी ही मार्गदर्शक तत्वे अनिवार्य आहेत, त्यांचे अत्यंत काटेकोरपणे पालन केले जावे, तसेच याबाबत कोणत्याही प्रकारची अनियमितता आढळून आल्यास संबंधितांवर सक्त कारवाई केली जाईल, अशा सूचना पनवेल महानगरपालिकेतर्फे देण्यात आल्या आहेत. सर्व प्रभागांच्या प्रभाग अधिकाऱ्याच्या स्तरावर भरारी पथके गठीत करून बांधकाम ठिकाणांची पाहणी करणेकामी तातडीने नेमणूक करण्यात आली आहे.

दिवाळी सण तोंडावर असून हिवाळ्यामध्ये वाढणाऱ्या धूळीकणांची संख्या लक्षात घेता प्रदूषण कमी करण्यासाठी बांधकाम व्यवसायिकांना त्यांच्या बांधकाम/ विकासकाम कामांची मार्गदर्शक तत्वांनुसार बारकाईने तपासणी करण्याची व बांधकाम / विकासकाम साईटभोवती हवेची गुणवत्ता राखण्यासाठी आवश्यक उपकरणे खरेदी करणे आणि आवश्यक उपाययोजना करणेबाबत निर्देशित करण्यात आले आहे. सद्यस्थितीत पावसाळा संपत येत असल्यामुळे महानगरपालिका क्षेत्रात सुरू असलेली बांधकामे, विकासकामे, वाहनांची वाढती संख्या यामुळे शहरातील धुळीचे प्रमाण वाढीस लागून हवा प्रदूषणासाठी धूळ हा घटक प्रामुख्याने कारणीभूत ठरत आहे.

आता पावसाळा संपताच खबरदारी म्हणून मा. उच्च न्यायालयाने दिलेले निर्देश व महाराष्ट्र शासन स्तरावरून निर्गमित करण्यात आलेल्या सूचनांची तात्काळ प्रभावाने अंमलबजावणी करण्याचा निर्णय पनवेल महानगरपालिकेतर्फे घेण्यात आला आहे.

### मार्गदर्शक तत्वे

१. सर्व विकासकांनी बांधकाम प्रकल्पांच्या भोवती किमान २५ फूट उंचीचे धातूचे पत्रे लावणे आवश्यक आहे.
२. बांधकाम चालू असणाऱ्या सर्व इमारतींच्या भोवती ओल्या हिख्या कापडाने ओल्या तागाच्या कापडाने / ताडपत्रीने बंदिस्त करणे आवश्यक आहे. सर्व बांधकामच्या ठिकाणी वॉटर स्प्रिंकलर / स्मॉग गन द्वारे सतत फवारणी करावी.
३. पाडण्यात आलेल्या सर्व बांधकामांना वरपासून खालीपर्यंत ताडपत्री / ओल्या हिरव्या कापडाने / ओल्या ज्यूटच्या कापडाने झाकलेले असावे. संरचना पाडण्याच्या प्रक्रियेदरम्यान सतत पाणी शिंपावे / फवारणी करणे आवश्यक आहे.
४. बांधकामाच्या ठिकाणी मोबाईल अँटी स्मॉग गन च्या सहाय्याने लोडिंग / अनलोडिंग दरम्यान पाणी फवारणी करणे बंधनकारक असेल.
५.बांधकाम जागेवरील हवेमध्ये प्रदूषण करणाऱ्या भंगार/पाडकाम साहित्यावर पाणी शिंपणे बंधनकारक असेल.
६. बांधकाम साहित्य तसेच रेडी मिक्स कॉंक्रीट वाहून नेणारी सर्व वाहने पूर्णपणे वरच्या बाजूने व सर्व बाजूंनी पूर्ण झाकलेली असावीत. वाहनातून कोणत्याही प्रकारे गळती होऊ नये तसेच ओव्हरलोड होऊ नये, ह्याची दक्षता घेणे बंधनकारक असेल.
७.सर्व बांधकामाच्या ठिकाणी सी. सी. टी. व्ही कॅमेरे बसवावेत.
८. सर्व बांधकामाच्या ठिकाणी सेन्सर आधारित वायू प्रदूषण मॉनिटर्स लावणे बंधनकारक असेल, प्रदूषणाची पातळी ओलांडणार नाही याबाबत उपाययोजना कराव्यात. याबाबतची माहिती महानगरपालिका अधिकाऱ्यांना वेळोवेळी मागणीनुसार पाहणीकरिता उपलब्ध करावी.
९. सर्व बांधकामाच्या ठिकाणी ग्राईडिंग, कटिंग, ड्रीलिंग, सोईंग आणि ट्रिमिंग ची कामे बंदिस्त भागात करावी व हवेचे प्रदूषण कमी करण्यासाठी पाण्याचे स्प्रिंकलर वापरून सतत फॉगिंग करावी.
१०. सर्व बांधकामाच्या ठिकाणी तयार होणाऱ्या बांधकाम व पाडकाम (C & D कचरा) नेमून देण्यात आलेल्या अनलोडींग साईट वर टाकणे बंधनकारक असेल. सदरचा मलबा उतरवल्यानंतर वाहन पूर्ण स्वच्छ करणे बंधनकारक असेल.
११. सर्व बांधकाम कर्मचारी व संबंधित व्यवस्थापकांनी अनिवार्यपणे वैयक्तिक संरक्षणात्मक उपकरणे जसे की मुखवटे, गॉगल, हेल्मेट इत्यादी परिधान करणे आवश्यक आहे.
१२. बांधकाम साहित्य आणि C & D वेस्ट साहित्य वाहून नेणारी वाहने ह्यांच्यावर वाहन ट्रेकिंग यंत्रणा बसवणे बंधनकारक असेल व सदरच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्याचे तसेच ओव्हरलोड वाहतूक करणाऱ्यांचे वाहन तत्काळ जप्त करण्याबाबत पोलीस विभागाकडून कारवाई करण्यात येईल ह्याची नोंद घ्यावी.
१३. साहीत्य वाहून नेणाऱ्या सर्व वाहनांकडे वैध PUC प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.
१४. बांधकामाच्या ठिकाणी असणारी माती, वाळू, बांधकाम साहित्य हे बंदिस्त भागामध्ये साठविण्यात यावे व ते पूर्णपणे झाकलेले असावे. सदरचे साहित्य कोणतेही सार्वजनिक रस्ते, पदपथ, फुटपाथ आणि मोकळ्या जागेवर साठवले जाणार नाही ह्याची खात्री करावी. त्या सदर बाबींवरती नियमाप्रमाणे कारवाई करण्यात येईल.
१५. कुठल्याही प्रकारे उघड्यावरती कोणत्याही प्रकारचा कचरा जाळण्यास पूर्णपणे बंदी आहे याची नोंद घ्यावी, सदर बाबींचे उल्लंघन करणाऱ्यांवर कारवाई करण्यात येईल याची नोंद घ्यावी.
१६. महानगपालिकेद्वारा तपासणी करण्यासाठी मोबाईल स्कॉड (फिरते पथक) निर्माण केले असून वरील सूचनांचे पालन न करणाऱ्या विकासकांवर तत्काळ कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

जा.क्र.प.महा/२८२३/प्र.क्र.२०/२६६/२०२४ सही/-
दिनांक १४/१०/२०२४ **आयुक्त तथा प्रशासक**
**पनवेल महानगरपालिका, पनवेल**

दि. ११/१०/२०२४

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील नमुद केलेली विद्यमान मालक अरविंद्र चांगदेव पाटील व सुरेश धर्माजी थळे यांच्या मालकीची मिळकत कायम खरेदी करण्याचे ठरविले असून तशा आशयाची बोलणी विद्यमान मालक व आमचे अशिल यांचे दरम्यान झालेली आहेत. सदरची मिळकत ही निर्वेध व बोजा विरहित असल्याचा भरवंसा आमचे अशिलांस विद्यमान मालकांनी दिला असून सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास कोणाचीही कसलीही हरकत असल्यास त्याची खातरजमा करणेकामी जाहिर नोटीस प्रसिद्ध करण्याचे काम आमचेकडे दिलेले आहे. त्या मिळकतींचे वर्णन खालीलप्रमाणे.

मिळकतीचे वर्णन

| मौजे | भुमापन क्र. व उपविभाग क्र | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू. पैसे) |
|---|---|---|---|
| पोयनाड ता. अलिबाग | १०८/२ | ०-१४-०० पो.ख. ०-०२-०० एकूण ०-१६-०० | ०.२८ |

वर वर्णन केलेल्या मिळकतीपैकी अरविंद्र चांगदेव पाटील व सुरेश धर्माजी थळे यांच्या नावे असलेले एकुण क्षेत्र ०-१२-०० हे.आर., आकार ०.२० रु. पैसे हि नमुद केलेली मिळकत या जाहीर नोटीसीचा विषय आहे.

तरी वरिल मिळकतीच्या संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, लिज, फरोक्त, पोटगी, साठेकरार, वहिवाटीचे जाण्यायेण्याचे मार्ग, वारसा हक्क आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसबंध असल्यास व त्यांची वरील मिळकतीच्या विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी हि नोटीस प्रसिद्ध झालेपासून होणाऱ्या ७ दिवसांचे मुदतीत खालील सही करणार याजकडे कळवावी. येणेप्रमाणे विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदरचे मिळकतीचा विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची तमाम जनतेने नोंद घ्यावी हे कळावे.

अलिबाग **ॲड. आशिष नरेंद्र म्हात्रे**
दिनांक : ११/१०/२०२४ मु.आंबेघर (पेझारी), पो.पोयनाड
ता. अलिबाग, जि.रायगड.
मोबा. नं. ९६३७२७००१९

## तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे न्यायालय
**(तहसिलदार कार्यालय, अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड)**

## जाहिर नोटीस

ज.म. र अर्ज ६४/२०२४

प्रति,
श्री. जनार्दन सिताराम भोईर
मु. पो. चौल, सराई, अर्जदार
ता. अलिबाग, जि. रायगड

विरुध्द

ग्रुप ग्रामपंचायत चौल,
ता. अलिबाग, जि. रायगड सामनेवाला

सदर या जाहिर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की,
१. अर्जदार हे मौजे चौल, सराई येथील कायमचे रहिवाशी आहेत. अर्जदार यांचे वडील कै. सिताराम गणपत भोईर यांचा मृत्यु दि. २५/१०/१९९३ रोजी मौजे चौल, सराई, ता. अलिबाग येथील राहत्या घरी झाला होता.
२. मात्र त्यांच्या मृत्युची नोंद ग्रामपंचायत चौल येथे केलेली नसल्याने त्यांचा मृत्यु दाखला मिळण्यासाठी मृत्यू नोंदीचे आदेश जन्म-मृत्यु नोंदणी अधिकारी ग्रामपंचायत चौल यांना करणेकरीता न्यायालयीन आदेशाची आवश्यकता असल्याचे अर्जदार यांना तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी अलिबाग यांच्याकडे अर्ज दाखल केला आहे.

तरी सदर आदेश देण्यास कोणाचीही हरकत/तक्रार असल्यास यांनी नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून दि.२१/१०/२०२४ रोजी पर्यंत मे. तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी अलिबाग यांचे न्यायालयात हजर राहून आपली हरकत/ तक्रार नोंदवावी. मागाहून आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही. व उपलब्ध असलेल्या कागदपत्रानुसार निकार/निर्णय देणेत येईल. यांची कृपया नोंद घ्यावी.

आज दि.२४/०९/२०२४ रोजी माझी सही न्यायालयाचे शिक्क्यासह दिली.

ठिकाण : अलिबाग सही/-
तारिख : २४/०९/२०२४ **(विक्रम पाटील)**
**तहसिलदार अलिबाग**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकार यांनी मौजे वंजारवाडी, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाच्या मिळकतीचे मालक १.मनोहर रघुनाथ काळोखे व प्रविणा पंढरीनाथ सासे यांचेकडून मिळकत विकत घेणेचे ठरविले आहे.

| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्रफळ हे. आर. पॉ | आकार रु. पै. |
|---|---|---|---|
| ५ | ३ | एकुण क्षेत्र ०-८६-७० पैकी विकत देणार यांचे मालकीचे क्षेत्र ०-२२-३५ | ०-९१ |

सबब सदर व्यवहाराबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झाले पासून १४ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकत हि निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून वरील मिळकतीचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

कर्जत
दिनांक :-१५/१०/२०२४ **ॲड.समीर आर. सावंत**
बी.कॉम.एल.एल.बी.
पत्ता-गाळा नं.०९,कोर्ट व्ह्यू बिल्डींग,
तळ मजला, दिवाणी व फौजदारी
न्यायालयासमोर, कर्जत,
ता. कर्जत, जि. रायगड
मो.नं ९१५८३१३७३३

## जाहिर नोटीस

तमाम जनतेस या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यांस येते की तलाठी सजा जोहे हद्दीतील मौजे कोपर, ता.पेण, जि.रायगड येथील खालील वर्णनाच्या मिळकती माझे अशिल यांनी त्यांचे नमुद विद्यमान मालक पद्मिनी हासुराम पाटील यांच्याकडून रजिस्टर खरेदी खतान्वये विकत घेण्याचे ठरविले आहे. त्याचे वर्णन खालील प्रमाणे

| गाव | सर्व्हे नं./गट नं./हि.नं. | क्षेत्र हे.आर. | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|
| कोपर | ७१/२ | ०.३६.०० पो.ख.०.००.०० एकुण क्षेत्र ०.३६.०० | ५.६३ |

वरील संपुर्ण क्षेत्रापैकी ०.१६.०० हे.आर.इतके क्षेत्र आमचे अशिल हे नोंदणीकृत खरेदीखताने खरेदी करणार होते याबाबत दैनिक कृषीवल या वृत्तपत्रात दिनांक २२/०९/२०२४ रोजी व दिनांक १७/०९/२०२४ रोजी पंधरा दिवसाची नोटीस प्रसिद्ध केलेली होती, तरी सदर नोटीस ही रद्द समजण्यात यावी.

तरी वर नमुद मिळकतीवर व मिळकतीचे मुळ मालक खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करणार नाही. याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.
टिपः सदर नोटीस ही मिळकतीचे मुळ मालक यांच्या सांगण्यावरून देण्यात येत आहे.

सही
ठिकाण: पेण **ॲड हेमा ज. पाटील (घोडिंदे)**
दि.१५/१०/२०२४ साई श्रध्दा सबुरी बिल्डिंग बी-विंग,
ब्लॉक नं. ००२ प्रभु आळी, पेण





● (छायाचित्र : समीर मालोदे)

# परिवर्तनाची लढाई जिंकण्यासाठी सज्ज व्हा

## साम्या कोरडे यांचे महिलांना आवाहन

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

निवडणुका समोर आल्यावर या सरकारला बहिणींची आठवण आली. परंतु, अडीच वर्षात बहिणींची आठवण का आली नाही, असा संतप्त सवाल उपस्थित करत साम्या कोरडे म्हणाल्या, जिजाऊ, आहिल्यादेवी होळकर, माता रमाई, सावित्रीबाई फुले यांचा वारसा या महाराष्ट्राला लाभला आहे. ही परिवर्तनाची लढाई आहे. ही लढाई जिंकण्यासाठी आम्हाला लाडकी लेक नको, तर शिवबाची लेक हवीय. चित्रलेखा पाटील यांच्या रुपाने महिला म्हणून त्या विधानसभेच्या सभागृहात प्रश्न मांडतील. समस्यांचे निराकरण करण्यासाठी तसेच नव्या नेतृत्वासाठी चित्रलेखा पाटील यांना निवडून देण्यासाठी सज्ज व्हा, असे आवाहन शेकाप राज्य विद्यार्थी संघटनेच्या अध्यक्षा साम्या कोरडे यांनी केले.

त्या पुढे म्हणाल्या, महिलांना व्यासपीठ मिळवून देणारा शेतकरी कामगार पक्ष आहे. लेक शिवबाची अंतर्गत एक चांगला कार्यक्रम आज किहीम या ठिकाणी साजरा होत असल्याचा आनंद आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी महिलांना चांगला सन्मान दिला. त्यांची आई जिजाऊ यांच्याकडून त्यांनी प्रेरणा घेतली. सर्व जाती जमातीला एकत्र घेऊन कल्याणकारी राज्य निर्माण केले. परंतु, सध्याच्या सरकारच्या राज्यात महिला सुरक्षा, रोजगाराचा प्रश्न आहे. सर्वसामान्यांमध्ये भीती निर्माण झाली आहे. वाईट विचारांचे लोक सत्तेत आहेत. अलिबागमधील आमदारांची भीती व दहशत आहे. या तालुक्यातील पाणी, रस्ता, विजेचा प्रश्न आहे. अनेक विकासाची कामे रखडली आहेत.

सरकारने लाडकी बहिण योजना आणली. दर महिन्याला पंधराशे रुपये खात्यात जमा केले जात आहेत. परंतु, महागाईचे संकट प्रचंड आहे. रोज दैनंदिन व्यवहारातील वस्तूंच्या किमतीमध्ये भरमसाठ वाढ केली आहे. महागाईमुळे सर्वसामान्य माणूस त्रस्त आहे. महिलांना घरखर्च चालविताना कसरत करावी लागते. हे चिंताजनक आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचे विचार नसलेल्या, लोकांचे हित न जाणणाऱ्या या सरकारला आगामी निवडणुकीत जागा दाखविण्याची वेळ आली आहे, असे साम्या कोरडे म्हणाल्या.

### महिलांचा सन्मानपत्र देऊन गौरव

**महिला संवाद मेळाव्याच्या निमित्ताने पंचक्रोशितील कर्तृत्ववान महिलांचा सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला. राजकीय, शैक्षणिक, क्रीडा, सांस्कृतिक, सामाजिक, व्यावसायिक अशा विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विभागातील तीसहून अधिक महिलांना सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले.**










# मुंबईने टेकले बडोद्यासमोर गुडघे

## ८४ धावांनी केला दारुण पराभव

**। मुंबई । वृत्तसंस्था ।**

रणजी करंडक एलिट २०२४-२५ या स्पर्धेतील गट अ सामन्यात मुंबई आणि बडोद्याचा संघ आमनेसामने होते. या सामन्यात बडोद्याने ४२ वेळा रणजी चॅम्पियन असलेल्या मुंबई संघाचा ८४ धावांनी दारुण पराभव केला. या सामन्यात बडोद्याने पहिल्या डावात २९० धावा केल्या होत्या. प्रत्युत्तरात मुंबईचा संघ २१४ धावांच करु शकला. यानंतर ७६ धावांची आघाडी घेतल्यानंतर दुसऱ्या डावात बडोद्याने १८५ धावा केल्या होत्या. प्रत्युत्तरात मुंबईचा संघ ११७ धावात गारद झाला. अशा प्रकारे बलाढ्य मुंबई संघाविरुद्ध बडोद्याने दणदणीत विजय नोंदवला.

भार्गव भट्टने १० विकेट्स घेत बडोद्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावली. तिसऱ्या दिवशी पृथ्वी शॉ आणि हार्दिक तमोरच्या विकेट्स गमावल्यानंतर मुंबईने २ बाद ४२ धावा केल्या होत्या. यानंतर भार्गव भट्टनेअजिंक्य रहाणेआणि आयुष म्हात्रे यांच्या महत्त्वपूर्ण विकेट घेत धावांचा पाठलाग करणाऱ्या मुंबईला अडचणीत आणले. भारतीय संघात पुनरागमन करण्याच्या प्रयत्नात असलेला श्रेयस अय्यर, सिद्धेश लाडसह मुंबईचा डाव पुन्हा रुळावर आणण्यात यशस्वी ठरला. भट्टने गतविजेत्याला पुन्हा एकदा अडचणीत आणण्यापूर्वी या दोघांनी ४१ धावांची भर घातली. यानंतर श्रेयस अय्यर ३० धावा काढून फिरकीपटूचा बळी ठरला. त्यानंतर भट्टने अनुभवी शम्स मुलाणी आणि शार्दुल ठाकूर यांच्या विकेट्स घेत मुंबईच्या डावाला खिंडार पाडली. मात्र, दुसरीकडे लाडने चमकदार कामगिरी करणे सुरूच ठेवले आणि अखेरीस सामना निकराच्या लढतीकडे वळला. मुंबईच्या या फलंदाजाने ९४ चेंडूत ५९ धावा करत गतविजेत्या संघाला विजयाच्या वाटेवर नेऊन ठेवले. चौथ्या दिवशी सकाळचे सत्र निकालाच्या आशेने वाढविण्यात आले. मात्र, तनुष कोटियन आणि मोहित अवस्थी प्रभाव पाडण्यात अपयशी ठरल्याने लाडला दुसऱ्या टोकाकडून कोणतीही साथ मिळाली नाही. यानंतर भट्टने सामन्यातील शेवटची विकेट लाडच्या रूपात घेत बडोद्याच्या शानदार विजयावर शिक्कामोर्तब केला.




- भार्गवने घेतल्या १० विकेट्स,
- मुलाणी, ठाकूर यांच्या विकेट्स घेत मुंबईला पाडले खिंडार.
- लाडची चमकदार कामगीरी, ९४ चेंडूत ५९ धावा कुटल्या.
- १८५ धावांचा पाठलाग करताना मुंबईचा संघ ११७ धावांवर गारद

### एक कोटींनी मानधन होणार कमी

**नवी दिल्ली :** बीसीसीआयच्या नियमानुसार फ्रँचायझी जास्तीत जास्त दोन अनकॅप्ड खेळाडूंना प्रत्येकी ४ कोटी रूपये देऊन संघात कायम ठेवू शकतात. जर यश दयालने भारतीय संघात पदार्पण केले असते तर, बीसीसीआयच्या नियमानुसार यश दयालला संघात कायम ठेवण्यसाठी आरसीबीला १८ कोटी, १४ कोटी किंवा ११ कोटी मोजावे लागले असते. मागील हंगामातील आयपीएलमध्ये यश दयालसाठी आरसीबीने ५ कोटी रूपये मोजले होते. परंतु, नव्या नियमानुसार यशला आता ४ कोटी रूपये द्यावे लागतील. त्यामुळे आरसीबीची आता १ कोटी रूपयांची बचत होणार आहे, तर खेळाडूंना तब्बल एक कोटींचा फटका बसला.

### १४ वर्षाखालील जिल्हा क्रिकेट कर्णधारपदी

# पृथ्वीराज जवके याची निवड

**। नागोठणे । वार्ताहर ।**

रायगड जिल्हा १४ वर्षाखालील क्रिकेट संघाच्या कर्णधारपदाची निवड नुकतीच करण्यात आली आहे. १४ वर्षाखालील क्रिकेट स्पर्धेसाठी रायगड संघाच्या कर्णधारपदी नागोठण्याजवळील कुहिरे (ता.पेण) येथील कु. पृथ्वीराज उदय जवके याची निवड करण्यात आली आहे.



रायगड जिल्ह्याच्या १४ वर्षाखालील क्रिकेट संघाच्या निवडीमध्ये रायगड जिल्हा क्रिकेट असोशिएशनचे सर्व पदाधिकारी, प्रशिक्षक रोहित काळे (माणगाव) व शेखर भगत (पेण ) तसेच सर्व फायटर्स क्रिकेट अकॅडमी आणि सर्वात महत्वाचे म्हणजे कुहीरे येथील जय भवानी क्रीडा मंडळाचे सदस्य यांचे मोलाचे सहकार्य मिळाल्याचे कु. पृथ्वीराज जवके व उदय जवके यांनी सांगितले. महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या आगामी काळात होणाऱ्या लीग क्रिकेट स्पर्धेत कु. पृथ्वीराज जवके हा १४ वर्षाखालील क्रिकेट स्पर्धेत रायगड संघाचे नेतृत्व करणार आहे.

# धानकान्हे आदिवासीवाडी संघ विजेता



**। खांब । वार्ताहर ।**

भाले पहूर येथे संपन्न झालेल्या जिल्ह्यास्तरीय कबड्डी स्पर्धेत रोहा तालुक्यातील गावदेवी आदिवासीवाडी धानकान्हे हा संघ विजेता ठरला आहे. आदिवासी समाजातील तरूणांना कबड्डी खेळाची आवड निर्माण व्हावी या उद्देशाने सदरील स्पर्धा आयोजित करण्यात आल्या असल्याची माहिती आयोजकांनी दिली. तर अंतिम सामन्यात अतिशय अटीतटीच्या झालेल्या लढतीत गावदेवी धानकान्हे आदिवासीवाडी संघाने आमदेवळी सुधागड -पाली या संघाचा पराभव करीत अंतिम विजेतेपद पटकावले. गावदेवी धानकान्हे आदिवासीवाडी संघाच्या या यशाबद्दल समाजातील सर्वच स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. या संघाने कबड्डी क्षेत्रात कायमच आपले वर्चस्व कायम राखून विविध स्तरांवर मोठ्या प्रमाणात पारितोषिके पटकावली आहेत.

# इमर्जिंग आशिया चषक १८ ऑक्टोबरपासून

**। मुंबई । वृत्तसंस्था ।**

पुरुषांच्या -२० इमर्जिंग आशिया चषकासाठी तिलक वर्माला भारत-अ संघाचे कर्णधारपद देण्यात आले आहे. तिलक वर्मा यांनी भारताकडून चार एकदिवसीय आणि १६ टी-२० सामने खेळले आहेत. त्याच्याशिवाय भारताकडून खेळलेले अभिषेक शर्मा आणि राहुल चहर यांनाही इंडिया-अ मध्ये स्थान देण्यात आले आहे. १८ ऑक्टोबरपासून या स्पर्धेला सुरुवात होणार आहे.

आयपीएल २०२४ मध्ये कामगिरी करणारे युवा खेळाडू आयुष बडोनी, नेहल वढेरा, प्रभसिमरन सिंग, अनुज रावत आणि आर साई किशोर यांचाही उदयोन्मुख आशिया कपसाठी भारत अ संघात समावेश करण्यात आला आहे. देशांतर्गत क्रिकेटमध्ये चांगली कामगिरी करणाऱ्या निशांत सिंधू या युवा खेळाडूंसोबतच वेगवान गोलंदाज अंशुल कंबोज आणि वेगवान गोलंदाज आकिब खान यांनाही संधी देण्यात आली आहे. याशिवाय आयपीएल खेळलेले हृतिक शोकिन आणि वैभव अरोरा यांनाही संघात स्थान देण्यात आले आहे. भारताचा पहिला सामना १९ ऑक्टोबरला पाकिस्तानविरुद्ध होणार आहे. या गटात ओमान आणि संयुक्त अरब अमिरातीचाही समावेश आहे. ही स्पर्धा पहिल्यांदाच टी-२० फॉरमॅटमध्ये खेळवली जाणार आहे.

# बाबर कसोटीतून बाहेर?

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

पाकिस्तानचा स्टार फलंदाज बाबर आझम गेल्या काही काळापासून अत्यंत खराब फॉर्मातून जात आहे. त्याच्या कामगिरीत सातत्याने घसरण होत असून त्याची बॅट शांत आहे. तो संघासाठी सर्वात मोठी डोकेदुखी बनला असून संघ त्याच्या खराब फॉर्मची किंमत सामना गमावून चुकवत आहे. एका वृत्तानुसार बाबर आझमला दुसऱ्या कसोटी सामन्यात प्लेइंग इलेव्हनमधून वगळले जाण्याची शक्यता आहे. पाकिस्तानच्या फलंदाजीतील महत्त्वाचा भाग असलेल्या बाबरची बॅट शांत असल्याने संघाला याचा फटका बसत आहे.

पाकिस्तान क्रिकेट मोठा निर्णय घेणार असल्याची चर्चा आहे. इंग्लंडविरुद्धच्या मालिकेत तो फार काळ क्रिजवर टिकला नाही.

### दक्षिण अफ्रिकेने बांगलादेशला ७ विकेट राखून लोळवलं

# उपांत्य फेरीच्या दिशेने कूच

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

वुमन्स वर्ल्डकप स्पर्धेतील बांगलादेशचं आव्हान संपुष्टात आलं आहे. पहिल्या सामन्यात विजय मिळवल्यानंतर आशा पल्लवित झाल्या होत्या. मात्र, त्यानंतर सलग तीन सामन्यात पराभवाचं तोंड पाहावं लागलं आहे. दक्षिण अफ्रिकेविरुद्धच्या सामन्यात विजय मिळवून शेवट गोड करण्याचा बांगलादेशचा प्रयत्न होता. पण तसं काही झालं नाही. नाणेफेकीचा कौल जिंकल्यानंतर बांगलादेशने प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. हा निर्णय अगदी दक्षिण अफ्रिकेच्या मनासारखा झाला होता. तसंच काही पुढे सामन्यात घडलं. बांगलादेशने प्रथम फलंदाजी करताना २० षटकात ३ गडी गमवून १०६ धावा केल्या आणि विजयासाठी १०७ धावांचं आव्हान दिलं. दक्षिण अफ्रिकेने हे आव्हान १७.२ षटकात पूर्ण केलं. दक्षिण अफ्रिकेने बांगलादेशवर ७ विकेट आणि १६ चेंडू राखून विजय मिळवला. बांगलादेशची कर्णधार निगार सुलतानाने सामन्यानंतर आपल्या भावना व्यक्त केल्या. 'पॉवरप्लेमध्ये आम्ही ज्या पद्धतीने सुरुवात केली ती चांगली नव्हती. जेव्हा तुम्हाला पॉवरप्लेमध्ये चांगली सुरुवात मिळत नाही, तेव्हा ते कठीण होत. आम्ही भागीदारी बनवण्याचा प्रयत्न केला, परंतु आम्ही बरेच डॉट खेळलो. दक्षिण अफ्रिकेची कर्णधार लॉरा वोल्वार्ड हीने सांगितलं की, "विजय मिळवणे खरोखर चांगले आहे, आम्ही ज्या पद्धतीने चेंडूने सुरुवात केली ती उत्कृष्ट होती. आम्हाला त्याचा पाठलाग जरा लवकर करायला पाहीजे होता.



# मुंबई विभागीय शालेय धनुर्विद्या स्पर्धा

**। पनवेल । वार्ताहर ।**

१४ व १५ ऑक्टोबर २०२४ या कालावधीमध्ये द्रोणा आर्चरी अकॅडमी कर्नाळा स्पोर्ट्स अकॅडमी न्यू पनवेल येथे धनुर्विद्या स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. सदर स्पर्धेमध्ये मुले व मुली (वयोगट १४, १७ आणि १९ ) या गटांमध्ये एकूण ३६६ धनुर्दर खेळाडू उपस्थित होते. सदर खेळाडू हे आपापल्या जिल्ह्यातील प्राविण्य प्राप्त खेळाडू आहेत. ही स्पर्धा अगदी अटीतटीची अशी होत पार पडली. सदर स्पर्धेसाठी राज्य क्रीडा मार्गदर्शक जिम्नास्टिक भक्ती तिवारी उपस्थित होत्या. सदर स्पर्धेचे आयोजन मुकेश गुरदाळे मार्गदर्शक धनुर्विद्या द्रोणा आर्चरी अकॅडमी पनवेल यांनी केले होते.






कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ. चित्रलेखा पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)